ग्रा. व्या. १४६०

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ग्रा. व्या.
दा. क्र. ३६५०

IRBK-0103649
IRBK-0103649

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

10 JUN 1976

अ. उ. २९२००
आ. ना.
१२६८
१-४-६७

नाथ-वाङ्मय-माला पुस्तक-८

# हेमचंद्र-रोहिणी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
अ. क्र. ३६२४८ नों. दि ...........
वि. आ. ना. क्र. ...........

लेखक,

नाथ माधव

IRBK-0103649
IRBK-0103649

नवभारत प्रकाशनसंस्था, मुंबई ४

: प्रकाशक :
रघुनाथ दिपाजी देसाई,
नवभारत प्रकाशन संस्था,
६, केळेवाडी, मुंबई ४.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

आवृत्ती १ ली १९०८
आवृत्ती २ री १९४३
आवृत्ती ३ री १९५१

किंमत २ रुपये

मुद्रक:
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी, मुंबई नं. ४.

# प्रस्तावना

या पुस्तकाचा मुख्य उद्देश इतकाच आहे कीं, सुदैवानें ज्यांना दोन अक्षरें प्राप्त झालीं आहेत; सद्यःस्थितीवर विचार करण्याची ज्यांना हौस आहे; प्राणिमात्राची, विशेषतः मनुष्यांची आणि त्यांतल्या त्यांत स्वदेश बांधवांची विपत्ती कमी व्हावी अशी ज्यांची इच्छा आहे त्यांनीं कोठल्या मार्गानें गेलें असतां अधिक श्रेयस्कर होईल, नाहीं तर आपणांस अमुक दिशेनें अमुक ठिकाणीं जावयाचें आहे, असा संकेत करून ठेवल्याशिवाय जे कोणी ह्या चालू चळवळीच्या—मग ती चळवळ राजकीय, सामाजिक अथवा धार्मिक असो—अफाट समुद्रांत आपला पडाव घालतात, त्यांची कशी स्थिति होते, वाऱ्याच्या प्रत्येक झुळकेनें त्यांच्या पडावास कसे हेलकावे बसतात, ते दिशा चुकून कसे भलत्याच दिशेस लागतात आणि दुर्दैवानें सोसाट्याच्या वाऱ्यांत सांपडून एखाद्या अनपेक्षित खडकावर आदळून आंतील उतारूंसह जलसमाधि घेण्याचा प्रसंग त्यांच्यावर कसा गुदरतो हें ह्या पुस्तकांत थोडक्यांत कादंबरीच्या रूपानें दाखविलें आहे.

प्रथम हें पुस्तक बऱ्याच विस्तृत प्रमाणावर लिहिलें होतें, परंतु कांहीं मित्रांच्या सांगण्यावरून त्यांत बरीच छाटाछाट करावी लागली; त्यामुळें मूळ कथानकांत बराच फरक पडून तें विस्कळित झाल्यामुळें पुनः सुधारण्याकरितां एकंदर आठ प्रकरणें कमी करावीं लागलीं.

लेडी जमशेटजी रोड,<br>दादर, मुंबई<br>डिसेंबर १९०८

नाथ माधव.

# आमचें प्रकाशन

| | |
|---|---|
| रंगो बापूजी | १०-०-० |
| सदा बंदिवान ( नाटक ) | १-८-० |
| स्वयंसेवक | २-०-० |
| माझ्या कलेसाठीं | १-०-० |
| सारस्वत | १-०-० |
| कोरडी करामत | १-०-० |
| न मागतां | १-०-० |
| करीन ती पूर्व | २-०-० |
| सत्तेचे गुलाम | २-०-० |
| चला लढाईवर | १-८-० |
| घराबाहेर | २-०-० |
| [illegible]ांचा संसार | २-०-० |
| लग्नाची वेडी | २-०-० |
| अरे बाबा जाहिरात | १-४-० |
| ( विनोदी लेख ) | |
| तुमच्याकरितां | २-८-० |
| ब्रँडीची बाटली | २-४-० |

| | |
|---|---|
| पूर्णिमा ( कादंबरी ) | ३-१२-० |
| प्रणय | ३-८-० |
| तोंड मिळवणी | ४-०-० |
| ध्रुवाचा तारा | २-०-० |
| झेंडूचीं फुलें ( कविता ) | २-०-० |
| आशा आणि आशिर्वाद | १-५-० |
| वत्सराज उदयन | १-०-० |
| ,, ,, शालेय | ०-१२-० |
| ठिणग्या आणि टिकल्या | १-१२-० |
| आजच्या स्त्रियांचें आरोग्य | ३-०-० |
| बातमीदार | २-०-० |
| अर्घ्यप्रदान | १-८-० |
| आहार शास्त्र | ३-०-० |
| न्याय अन्याय | १-०-० |
| वामन मल्हार वाङ्मयदर्शन | ४-०-० |

**नवभारत प्रकाशन संस्था — मुंबई नं. ४.**

# १ प्रणयी जोडपें

" तूं सांगितल्याप्रमाणें आज कॉलेजमधून मी मुद्दाम लवकर आलों मग आतां व्यर्थ वेळ कां ? "

" गडे, माझी हकीकत ऐकून आपणाला वाईट आटेल ! कदाचित् आपलें मजवरचें प्रेमहि कमी—"

" नलिनी, हें तूं काय म्हणतेस ! माझें प्रेम कमी होईल ! तर मग अद्यापि तूं माझी परीक्षा केली नाहींस हेंच खरें ! "

" तसें नाहीं–मी कांहीं त्या अर्थानें नाहीं म्हणत ! परंतु मी गरीब आहें, निराश्रित–अनाथ आहें, शिवाय माझे आईबाप कोण हें देखील मला माहीत नाहीं. तर अशा निराश्रित कुलशील माहीत नसलेल्या मुलीवर प्रेम—"

" बस्स्–बस्स् नलिनी " असें म्हणून तो तरुण अस्ताचलावर चाललेल्या सहस्ररश्मि भगवान् सूर्यनारायणाकडे बोट दाखवून म्हणाला, " त्या सर्वसाक्षी प्रभाकरासमक्ष शपथ घेऊन सांगतों–लग्न करीन तर तें तुजबरोबरच—"

नलिनीनें त्या तरुणाच्या चेहेऱ्याकडे पाहिलें तों तिला त्याच्या चेहऱ्यांत त्यानें केलेल्या भाषणाची पूर्ण सत्यता दिसली.

वरील प्रणयी जोडपें अनाथबालिकाश्रमाच्या कंपौंडच्या बागेंत एका कोंपऱ्यांत आम्रवृक्षाखालीं बसलें होतें. नलिनी त्यावेळीं पांढरें स्वच्छ पातळ नेसली होती. तिच्या त्या सोनचाफ्यासारख्या गोऱ्या वर्णाला तें वस्त्र फारच खुलत होतें. तिची अंगकांति सतेज, डोळे पाणीदार असून एकंदर चर्या मोठी मोहक दिसत होती. तिनें बाल्यावस्थेचा त्याग करून तारुण्याचा आश्रय

केल्यामुळें तिचें स्वाभाविक सौंदर्य शतगुणित अधिक वाढलेलें होतें. पांच वर्षांची असतांना तिला एका बाईनें अनाथबालिकाश्रमांत आणून ठेविलें. त्या वेळीं त्या आश्रमाची नुकतीच स्थापना झाली होती. तिला आश्रमांत ठेवणाऱ्या बाईनें तिच्या नांवें पांच हजार रुपये व्यवस्थापकांच्या हवालीं केले होते. अनाथ आश्रमांत येणाऱ्या मुलीच्या पालकानें इतकी मोठी रक्कम ठेवलेली पाहून व्यवस्थापकांना आश्चर्य वाटलें, परंतु त्यावेळीं त्यांना पैशाची फारच गरज असल्यामुळें त्यांनींही नलिनीबद्दल जास्त चौकशी केली नाहीं. नलिनी आश्रमांत आली त्यावेळीं आश्रमांत तीच पहिली मुलगी होती. आतांच नलिनीची जास्त माहिती देण्यापेक्षां हेमचंद्रबाबूची-तिच्याबरोबर भाषण करणाऱ्या तरुणाची—वाचकांबरोबर थोडीशी ओळख करून कथानकाकडे वळूं म्हणजे क्रमाक्रमानें सर्व गोष्टी वाचकांच्या लक्षांत येतील.

हेमचंद्र बाबू फर्ग्यूसन कॉलेजमध्यें बी. ए. च्या क्लासांत होता. त्याचा बाप दिनेशचंद्र बोस अकरा वर्षांपूर्वी आपल्या मुलासह कलकत्त्याहून पुण्यांत येऊन राहिला होता. वीस वर्षें विधुरावस्थेंत काढून दिनेशचंद्र बाबूनें दोन वर्षांपूर्वी द्वितीय संबंध केला. तो कलकत्ता सोडून पुण्यांत येऊन कां राहिला होता ? हें एक कोडें आहे तें वाचक जसजसें पुढें वाचीत जातील तसतसें सुटत जाईल. त्याप्रमाणें पुण्याच्या दक्षिणेस अनाथबालिकाश्रमांत वंग बालिका नलिनी कशी आली हें देखील कोडें वरील कोड्याबरोबर सुटेल इतकेंच येथें सांगून वाचकांनीं अनाथबालिकाश्रमांतील बागेच्या कोपऱ्यांत बसलेल्या त्या प्रणयी जोडप्याच्या भाषणाकडे लक्ष द्यावें अशी त्यांस विनंती करितों.

नलिनीनें आपल्या कपाळावरील केस मागें सारून पदरानें तोंड पुसलें आणि प्रेमदृष्टीनें हेमचंद्र बाबूकडे पहात ती म्हणाली, " माझा किनई आपल्या शब्दांवर पूर्ण विश्वास आहे. पण गडे, हें मेलं वेडं मन—" असें म्हणून लज्जेनें ती खालीं पाहूं लागली

" माझ्यावर विश्वास आहेना ? मग सांग तर. "

क्षणभर विचार करून नलिनी म्हणाली, " मला जेव्हां ह्या आश्रमांत आणिलें त्यावेळीं मी फार लहान होतें. त्या वेळचें मला कांहींच आठवत नाहीं. थोड्या दिवसांपूर्वी येथली माझी मैत्रीण कुमारी यमुनाबाई जोशी आपल्या पालकाबरोबर येथून गेली, त्यावेळीं मला फार वाईट वाटलें. मला

देखील आतां माझे पालक घरीं घेऊन जातील असें वाटून मी आमच्या मोठ्या बाईस विचारलें. तिनें जें मला सांगितलें तेंच आतां मी आपल्याला सांगतें. कारण त्याशिवाय जास्त कांहीं मला माहिती नाहीं."

"ह्या आश्रमांत तुला कोणी आणिलें तें देखील तुला आठवण नाहीं ?"

"थोडं थोडं आठवतं. मला बाबांनीं 'शाळेंत जातेस का ?' म्हणून विचारलें—"

"मग तुला तुझे बाबा कोण हें माहीत आहे तर ?"

"थांबा तेंच सांगत्यें. मी 'होय' म्हणाल्यावर त्यांनीं मला कलकत्त्याहून बाई बरोबर—"

"ही बाई कोण ?"

"हें काय गडे, मधें मधें विचारतां ? मला जसं आठवतं तसं मी सांगत्यें." आपली हकिकत ऐकण्यासाठीं उतावीळ झालेल्या आपल्या प्रियकराकडे पाहून ती गालांतल्या गालांत हसूं लागली.

"सांग. सांग."

"लहानपणापासून मी त्याच बाईजवळ वाढलें. मला आश्रमांत आणून ठेवल्यावर परत जातांना त्या बाईनें मला जें सांगितलें त्यावरूनच मघां मी म्हटलें कीं, 'आईबाप, कुलशील नाहीं म्हणून'—"

"पण त्या बाईनें काय सांगितलें तें सांग ना ?" उतावीळ होऊन हेमचंद्र बाबूनें मध्येंच विचारलें.

"ती म्हणाली, 'बाळे' तुला आतां ह्या आश्रमांत एकटेंच रहावें लागेल. तुला एकटीला येथें सोडून जाण्याचें माझ्या जिवावर आलें आहे परंतु काय करूं—माझा नाइलाज आहे. ज्या मनुष्यानें आजवर तुझें पालन केलें त्याला फार दूरच्या गांवीं जावयाचें आहे. शिवाय तूं येथेंच रहावेंस अशीही त्याची इच्छा आहे. मग मी तिला विचारलें कीं मी 'बाबा म्हणून ज्याला आज-पर्यंत हांक मारीत होतें तो कोण ?' तेव्हां ती म्हणाली, 'तो मनुष्य कांहीं तुझा खरा बाप नव्हे. तुझी आई तूं अगदीं लहान असतांना वारली तेव्हांपासून या मनुष्याच्या सांगण्यावरून मी तुझा आजवर प्रतिपाळ केला. तुझा बाप कोण हें कांहीं मला माहित नाहीं. आतां मी जातें. तूं चांगला अभ्यास कर. मी कांहीं दिवसांनीं येऊन तुला भेटेन.' पुढें ती बाई निघून गेली. त्या

दिवसांनंतर ती कधींहि मला पाहण्याकरितां आली नाहीं. मलाहि त्याबद्दल कांहीं वाटलें नाहीं; कारण आश्रमांत मजवर सर्वजणी फार प्रेम करितात. त्यामुळें त्या बाईची आठवण मी लवकरच विसरलें—त्या दिवसानंतर मी पूर्वीच्या सर्व गोष्टी पार विसरलें. परंतु थोड्या दिवसांमागें यमुनाबाईला तिच्या पालकांनीं येथून नेलें त्यावेळीं मात्र पूर्वीच्या सर्व गोष्टींची एकदम आठवण होऊन मला फार वाईट वाटलें. त्या दिवशीं मला हिरमुसलेली पाहून आमच्या बाईनें मला जवळ बोलावून ' तूं आज चिंताक्रांत कां ? म्हणून विचारलें. माझें कारण ऐकून ती म्हणाली ' नलिनी तूं आतां कांहीं लहान नाहींस, तेव्हां मी जें कांहीं तुला सांगतें तें नीट लक्षांत ठेव. नाहींतर मला चार महिन्यां-नंतर तें तुला सांगावें लागणारच होतें. आज अनायासें हा प्रश्न निघाला हें एका अर्थी ठीकच झालें. तुला ह्या आश्रमांत येऊन आज जवळजवळ बारा वर्षें झालीं. आमच्या आश्रमांतील पहिली मुलगी तूंच. हा आश्रम जानुआरी १८९६ त स्थापन झाला आणि तूं मे महिन्यांत येथें आलीस. त्या वेळीं तुझें वय चार पांच वर्षांचें असेल. आश्रमांत टिपण करण्या-करितां तुझा जन्म वेळ मिळाला नाहीं तरी तुला येथें आणणाऱ्या बाईच्या सांगण्यावरून तुला आतां सोळावें वर्ष चालू आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्या बाईनें तुला येथें आणलें तिनें मोहरबंद केलेली एक पेटी आणि सील केलेलें एक पत्र आमच्या स्वाधीन केलें आहे. तें पत्र ता. १ मे १९०८ रोजीं तुझ्या स्वाधीन करण्याचा आम्हां व्यवस्थापकांना त्या बाईचा सक्तीचा हुकूम आहे. "

" मग नलिनी तें पत्र तुझ्या ताब्यांत येण्याला आतां अगदीं थोडे दिवसांचा अवधी आहे म्हणायचा ! आजची ता. ६ फेब्रुआरी—आणखी तीन महिने आहेत. "

" होय, पण त्या बाईनें असें सांगितलें आहे कीं, तें पत्र जरी ता. १ मेला माझ्या स्वाधीन केलें तरी पुढें पांच दिवस तें उघडण्याची मला मनाई आहे. कारण त्या पांच दिवसांत माझ्या पालकांपैकीं कोणी तरी येऊन मला येथून घेऊन जाण्याचा संभव आहे. जर कोणी त्या पांच दिवसांत आलें नाहीं तर ता. ५ मे १९०८ रोजीं मी तें पत्र फोडावें व मला योग्य दिसेल त्याप्रमाणें करावें. परंतु त्या मोहोरबंद केलेल्या पेटींत जें एक पत्र माझ्या

पालकानें ठेविलें आहे त्या पत्राबरहुकूम मी वागावें अशी माझ्या पालकाची इच्छा आहे."

"ती पेटी तूं पाहिली आहेस काय?"

"होय. ती पेटी फार मोठी आहे. शिवाय फारच जड आहे. गेल्या वर्षी आश्रमाची दुरुस्ती चालली होती त्यावेळीं ती पेटी उचलण्याकरितां सहा नोकर लागले असें बाई सांगत होती."

नलिनीनें सांगितलेली हकीकत ऐकून हेमचंद्रबाबू बराच वेळ विचारांत मग्न होता. आपली हकीकत ऐकून बाबूचें मन उद्विग्न झालें हें पाहून विषय बदलण्याच्या उद्देशानें नलिनी म्हणाली, "पण गडे, तुम्हीं, वडिलांपासून वेगळे का निघालां?"

"वेगळा कुठें निघालों आहें त्यांनीं दुसरें लग्न केलें त्यापूर्वी दोन महिने कॉलेजच्या रेसिडेन्सीमध्यें रहात होतों पण तेथें मला फार त्रास होऊं लागला. म्हणून त्याना विचारून तेथेंच जवळ एक स्वतंत्र घर घेतलें. पुढें पिताजी कलकत्त्यास गेले आणि लग्न करून आले तेव्हांपासून मी त्या स्वतंत्र घरांतच राहूं लागलों, घर घेतलें तेंही एका अर्थी ठीक केलें. कारण सापत्न मातेचें आणि माझें कांहीं पटणार नाहीं, असें आतां दिसून आलें—ती जरा अल्लड स्वभावाची असून एककल्ली आहे."

"वाः मग आपणाला दुसऱ्याच्या स्वभावाची बरीच पारख आहे म्हणायची! सांगा पाहूं गडे, माझा स्वभाव कसा आहे तो?"

"तुझा का?" हेमचंद्र बाबूनें आजुबाजूला पाहिलें आणि नलिनीला आपल्या जवळ ओढून तिच्या गालाचें चुंबन घेऊन तो पुढें म्हणाला "जसं हें गोड आहे, तसाच तुझा स्वभाव."

नलिनी त्याच्याकडे तिरक्या नजरेनें पाहून स्मित वदन करून म्हणाली, "पण तुम्ही माझी हकीकत ऐकून मला काय सांगणार होतां?"

क्षणभर विचार करून हेमचंद्रबाबू म्हणाला, "तुझी हकीकत ऐकून मी पूर्वी केलेला माझा विचार आतां बदलला. मी आतां दुसराच विचार केला आहे."

"कुठला?" उत्कंठेनें नलिनीनें विचारलें.

"तें पत्र तुझ्या ताब्यांत आल्यावर पांच दिवसपर्यंत तुला सांगितल्या-

प्रमाणें तुझा कोणी पालक येतो कीं काय, याची तूं वाट पहावीस; आणि जर कोणी आलें नाहीं तर मग मी तुला घेऊन जाईन. मी तुझा पालक-तुझा जन्माचा मित्र व्हावें अशी तुझी इच्छा आहे का ? ”

“ हा कांय मेला भलताच प्रश्न ! आपण माझे जन्माचे मित्र व्हाल इतकी मी भाग्याची कुठें आहे. मजसारख्या निराश्रित मुलीबद्दल आपल्या वडिलांची संमति तरी—”

“ नलिनी तुझी संमति असल्यावर माझी खात्री आहे कीं, पिताजी माझ्या सुखाआड कधींहि येणार नाहींत—मग नलिनी, उद्यां तुझ्या व्यवस्थापक बाईला विचारूं ना ? ”

“ काय ? ”

“ कीं, ता. ता. १ मे पासून ५ मे पर्यंत जर कोणी पालक तुला नेण्याकरितां आला नाहीं तर पालक या नात्यानें मी तुला घरीं घेऊन जावें. ”

“ बरें. ”

हेमचंद्रबाबूनें आपल्या खिशांतील घड्याळ काढून पाहिलें. त्यांत साडेसहा वाजले होते. तें पाहून तो म्हणाला, “ बरं तर नलिनी, आतां फार वेळ झाला मला जाण्याची परवानगी ? ”

नलिनीनें त्याच्याकडे प्रेमयुक्त नजरेनें पाहिलें आणि त्याला जाण्याची परवानगी आपल्या नेत्रखुणानीं दिली.

दुसऱ्या दिवशीं हेमचंद्र बाबू अनाथबालिकाश्रमाच्या व्यवस्थापक बाईला भेटला आणि नलिनीविषयीं आपले पुढले सर्व विचार तिला सांगितले. हेमचंद्र बाबूसारखा विद्वान नलिनीचा पालक होऊं इच्छितो हें पाहून व्यवस्थापक बाईला फार आनंद झाला. कारण अलीकडे नलिनीविषयीं तिला फार काळजी लागली होती. इतकीं वर्षे आश्रमांत राहिलेल्या त्या प्रेमळ मुलीला कोणी पालक असूं नये; याचें राहून राहून तिला फार वाईट वाटे. नलिनीला आश्रमांत ठेवतांना तिच्या बरोबर ठेवलेल्या त्या मोहोरबंद पेटीचा आणि सील केलेल्या त्या पत्राचा विचार करितां नलिनीबद्दल कांहींतरी गूढ असावें असें सर्व आश्रमांतील मंडळींना वाटे. नलिनी ह्यावर्षी युनिव्हर्सिटीच्या प्रवेश परीक्षेला जाणार होती. ती खात्रीनं पास होऊन आश्रमाचें नांव रंगरूपाला आणील अशी सर्व आश्रमवासी मंडळींना खात्री होती परंतु मध्यंतरी सील

२२२९६

पत्राची भानगड असल्यामुळें मे महिन्यांत तें पत्र वाचून त्यांत जर कांहीं प्रतिकूल गोष्टीचा उलगडा झाला तर कदाचित् ती परीक्षेला बसणार सुद्धां नाहीं अशी जी काळजी त्यांना वाटत होती, ती हेमचंद्र बाबूंमुळें आतां दूर झाली. कारण हेमचंद्र बाबूसारखा विद्वान् पालक जर तिला [illegible] जाईल; तर तो त्या पत्रांत जरी प्रतिकूल गोष्टी असल्या तरी खात्रीनें तिजकडून प्रवेश परीक्षा करवील अशी आशा होती.

व्यवस्थापक बाईकडून आपल्या म्हणण्याला रुकार मिळेल किंवा नाहीं याची हेमचंद्र बाबूला शंकाच होती. कारण किती झालें तरी तो परका!' परंतु त्याच्या म्हणण्याला लवकर रुकार मिळून शिवाय त्यानें एका निराश्रित मुलीला आश्रय देण्याचें दाखविलेल्या धैर्याबद्दल आश्रमाच्या व्यवस्थापक बाईकडून झालेल्या गौरवामुळें त्याला फार आनंद झाला. तो उल्हासितवृत्तीनें बाईचा निरोप घेऊन खोलीबाहेर पडला. नलिनी दरवाजाजवळ उभी राहून आडून आंतील सर्व भाषण ऐकत होती. हेमचंद्र बाबू बाहेर येतांना पाहून तिनें किंचित् हास्यवदनानें त्यांच्याकडे पाहिलें. व्यवस्थापक बाईबरोबर आपलें काय भाषण झालें त्याची नलिनीजवळ पुनरावृत्ति करण्याची हेमचंद्र बाबूला जरूरी पडली नाहीं.

———

हेमचंद्र बाबूला अनाथ बालिकाश्रमांतील व्यवस्थापकांनीं नलिनीचा पालक होण्यास रुकार दिल्यास अडीच महिने लोटले होते. आज आम्हीं वाचकांस विश्रामबागेजवळ नेण्याचा विचार केला आहे. बाबू दिनेशचंद्र बोस ज्या घरांत रहात होता तें घर दुमजली असून घरासभोंवतीं बरींच वर्षें ओसाड पडलेल्या कंपौंडामध्यें शीतलाबाईनें—दिनेशचंद्र बाबूच्या द्वितीय पत्नीनें— मनोहरसा बगिचा तयार केला होता. घरांत सर्वत्र झकपक् असून अनोळखी मनुष्यास प्रथमदर्शनीं तें घर कोणातरी युरोपियन गृहस्थाचें असावें असें वाटे. दिनेशचंद्र बाबू पुण्यांत आल्यापासून अडतीचा धंदा करीत असे. त्या धंद्यांत तो बराच गबर झाला होता. अगदीं नाहीं तरी त्याच्याजवळ कलकत्त्याहून येतांनाच मुळीं तीस चाळीस हजारांची माया होती. यावेळीं तो पन्नाशीच्या घरांत होता. त्याच्या लांब दाढीमुळें त्याचा चेहरा विशेष गंभीर दिसत असे.

दिनेशचंद्र बाबूला सर्व सुख अनुकूल होतें. हेमचंद्रासारखा सुशिक्षित मुलगा, शीतलाबाईसारखी सुन्दर प्रेमळ बायको आणि मुबलक पैसा ! अशा मनुष्याला जर सुखी म्हणूं नये तर काय म्हणावें ? पण छे ! वाचकहो ! आमचा ग्रह चुकला—ती पहा ! शीतलाबाई, आपल्या चिंताग्रस्त मनांत नानाप्रकारचे तर्क वितर्क व आपल्या पतिराजावर काय संकट आलें आहे याबद्दल कल्पना विकल्पना करीत अस्वस्थपणें सगळ्या घरभर घिरट्या घालीत आहे. पुष्कळ वेळां आपल्यावर आलेल्या संकटाचें पूर्ण स्वरूप दिसून आलें नाहीं, तरी मनाची अशी साक्ष पटत असते कीं, आपणावर खरोखरच कांहींतरी भयंकर संकट कोसळणार ! त्याचप्रमाणें शीतलेची स्थिति झाली होती. ती वरचेवर दरवाजाकडे जाई, पुनः निराश होऊन दिवाण-खान्यांत फिरे. असें तिचें आपल्या पतीच्या वाटेकडे सारखें लक्ष होतें. दिनेशचंद्र बाबू सकाळीं बाहेर गेला होता; तो अद्यापि परत आला नव्हता. नोकरानें दोन चारदां जेवणाची वर्दी दिली परंतु पति जेवून गेला नसल्यामुळें

बिचाऱ्या शीतलेला सबंध दिवस उपवास पडला होता. तिच्या मनाची ही अशी सारखी तळमळ चालण्याचें कारण समजण्याची वाचकांना घाई झाली असेल हें आम्ही जाणून आहों, परंतु आमचा नाइलाज आहे. कारण दिनेशचंद्र बाबू घरीं आल्याशिवाय शीतलेच्या चिंतेचें खरें कारण समजणें अगदीं अशक्य.

इकडे संध्याकाळ झाला. दिवसाचा प्रकाश कमी कमी होत जाऊन जों जों एक क्षण अधिक अधिक होऊं लागला तों तों काळजीचा वेढा जास्त पडत जाऊन शीतलेच्या काळजाला पीळ पडत चालला. ती भ्रमिष्ठासारखी दिवाणखान्यांत फिरतां फिरतां आपल्या पतीच्या खासगी खोलींत गेली. त्याबरोबर तिच्या मनाला लागणाऱ्या दुसऱ्या एका गोष्टीची तिला एकाएकीं आठवण झाली. कारण दिनेशचंद्र बाबूला आपल्या खासगी खोलींत असलेल्या टेबलाच्या खणांत ठेवलेल्या कांहीं एक वस्तूकडे पाहून लांबच लांब सुस्कारे टाकतांना तिनें पुष्कळदां पाहिलें होतें. आपल्या पतीला दुःख देणारी अशी काय वस्तु टेबलाच्या खणांत आहे तें पाहण्याचा तिनें पुष्कळदां प्रयत्न केला होता. परंतु दिनेशचंद्र बाबू त्या खणाला कुलूप लावून त्याची किल्ली नेहमीं आपल्याजवळ बाळगीत असे, त्यामुळें त्या खणांत काय आहे तें अद्यापपर्यंत शीतलेला कळलें नव्हतें. वरील गोष्टीची आठवण होतांच तिला सकाळीं घडलेल्या दुसऱ्या एका गोष्टीची आठवण झाली. दिनेशचंद्र बाबूला सकाळीं एक पत्र आलें होतें. त्या वेळीं ती त्याच्या जवळच उभी होती. पत्रावर तांबड्या शाईनें एका कोपऱ्यांत '१ मे १९०८' अशी स्पष्ट तारीख लिहिली होती. त्याकडे लक्ष जातांच दिनेशचंद्र बाबूचें तोंड काळें ठिक्कर पडलें. त्यानें 'हाय' म्हणून आपल्या कपाळावर जोरानें हात मारून घेतला आणि तडक आपल्या खासगी खोलीची वाट धरली. हें सर्व शीतलेनें पाहिलें होतें. तीहि त्याच्या मागून खोलींत जाऊं लागली. परंतु त्यानें तिला आंत येण्याची मनाई केली. खोलीच्या दरवाजाला आंतून कडी लावून बराच वेळ तो आंत बसला होता. शीतला दरवाजाच्या फटींतून कानोसा घेत होती. टेबलावर जोरा जोरानें हात आपटल्याचा आवाज ऐकून ती घाबरली आणि तेव्हांपासून पतीविषयीं चिंतेनें तिच्या हृदयांत घर केलें. शिवाय पंधरा दिवसांपासून त्याच्या वृत्तींतहि बराच फरक पडला होता.

अलीकडे तो आपला बराच वेळ खासगी खोलींत बसून घालवीत असे. शिवाय पूर्वीप्रमाणें तिच्या बरोबर तो धड बोलतहि नसे. असा हा त्याच्या वृत्तींत फरक पडण्याचें कारण तिनें पुष्कळदां त्याला विचारलें, परंतु उडवाउडवीचीं उत्तरें देऊन तो तिला गप्प बसावयास लावी.

शीतला खोलींत गेल्यावर टेबलावर किल्ली असलेली तिच्या दृष्टीस पडली. आज दिनेशचंद्र बाबू बाहेर जातांना किल्ली खिशांत टाकण्याला विसरला होता. तिनें लवकर लवकर खोलीचा दरवाजा आंतून बंद करून पहिल्यानें टेबलाचा खण उघडला, त्यांत तिच्या दृष्टीस काय पडलें ? फक्त दोनच वस्तु ! एका मोठ्या कागदावर मोठ्या अक्षरांत ' १ मे १९०८ ' व बाजूला एक लहानशी चोपडी. ह्या दोन वस्तु त्या खणांत होत्या. आंत काय लिहिलें आहे ते पहाण्याच्या उद्देशानें तिनें घाईघाईनें चोपडी उघडली. पहिल्या पानावर ' १ मे १८९६ ' ही तारीख लिहिली होती. आणि पुढें त्या तारखेंतून एक एक दिवस वजा केला होता. हें काय गौडबंगाल आहे याची तिला कांहीच कल्पना होईना. पतीला आलेल्या सकाळच्या पत्रावर कोंपऱ्यांत ' १ मे १९०८ ' तारीख आणि टेबलाच्या खणांतही तीच तारीख असून त्या तारखेकडे पाहतांच आपला पती इतका कष्टी कां झाला ? असें ह्या तारखेंत काय गूढ आहे ? तें तिला कळेना. ती त्या चोपडीकडे पहात विचार करीत स्तब्ध उभी होती. सकाळीं पत्र येतांच दिनेशचंद्र बाबूच्या झालेल्या स्थितीचें चित्र तिच्या डोळ्यांपुढें येतांच तिच्या विचारांचा ओघ बदलला त्या तारखेंत कांहीं तरी गूढ—भयंकर गूढ असावें असें तिला वाटूं लागलें. पत्रावरील ' १ मे १९०८ ' तारीख वाचून पतीनें आपल्या कपाळावर मारून घेतलेल्या हाताची आठवण होतांच आपल्या पतीवर कांहींतरी अनिवार संकट आलें असावें आणि संकटाचा संबंध बारा वर्षांपूर्वींपासून म्हणजे चोपडींत लिहिलेल्या ' १ मे १८९६ ' बरोबर खात्रीनें असला पाहिजे असेंहि तिचें मन तिला सांगूं लागलें. इतक्या वर्षांपूर्वी दिनेशचंद्रावर काय संकट आलें होतें तें कळण्याला तिला कांहींच मार्ग नव्हता; करण तिचें त्याच्या बरोबर लग्न होऊन सारीं दोनच वर्षें झालीं होतीं. ' १ मे १८९६ ' ची हकीकत कळली कीं, आतां काय संकट आलें आहे तें आपोआप कळेल, परंतु ती बारा वर्षांपूर्वीची हकीकत कळण्याला काय उपाय योजावा हेंच तिला कळेना. ती बराच वेळ

टेबलावर डोकें टेंकून विचारांत बसली होती. शेवटीं कांहींच विचार सुचेना, तेव्हां तिचें मन तिला आवरेनासें झालें. ती हळु हळु हुंदके देऊं लागली.

रात्रीचे नऊ वाजले. शीतला अश्रू गाळीत त्या खासगी खोलींत बसली होती. त्याच वेळीं दिनेशचंद्र बाबू परत घरीं आला. दिवाणखान्यांत कोणी नाहीं असें पाहून तो तडक माडीवर गेला. तेथें खोलींत शिरतांच टेबलावर अगदीं मंद जळत असलेल्या दिव्याचा उजेड त्याच्या दुःखव्याप्त चेहऱ्यावर पडला. त्याचें तोंड अगदीं निस्तेज दिसत होतें. आंत येतांच तेथेंच असलेल्या कोचावर त्यानें धाडकन् अंग टाकिलें आणि दोन्ही हातांनीं डोळे बंद करून बराच वेळ तो अगदीं स्तब्ध पडला होता. थोड्या वेळानें तो उठला आणि कोचावर सारखें बसून आपल्या खिशांतील एक पत्र त्यानें बाहेर काढलें. त्या पत्रांतील मजकुरानेंच तो इतका चिंतातुर झाला असावा असें वाटतें ! कारण कपाळाला आंठ्या घालून तीन तीनदां तो त्या पत्रांतील मजकूर वाची. पुनः तें पत्र खालीं टाकून त्यावर विचार करी. पुनः तें पत्र उचलून आपल्या हातांत घेई. मध्येंच एकदम उठून इकडे तिकडे हिंडे. मध्येंच खिडकीजवळ जाऊन क्षणभर तेथें उभें राहून शून्यदृष्टीनें इकडे तिकडे पाही. ह्या त्याच्या वर्तनावरून त्या पत्रानें कांहींतरी फारच त्रासदायक अशी काळजी त्यास उत्पन्न झाली असावी, हें तर खास. शेवटीं त्यानें पुनः तें पत्र लक्ष देऊन वाचलें आणि त्याच्या चिंधड्या करून टाकण्याच्या उद्देशानें त्यानें त्या पत्राचे दोन तुकडे केले, परंतु तितक्यांत त्याच्या मनांत काय आलें असेल तें असो, त्यानें ते दोन तुकडे तसेच पुनः पाकिटांत घालून तें पाकीट आपल्या खिशांत घालूं लागला, इतक्यांत शीतला आंत आली. तिला पाहतांच चटकन् तें पाकीट त्यानें आपल्या खिशांत टाकिलें. आणि किंचित् हास्य करून म्हणाला, " कां आज तोंड उतरलेलंसं दिसतं ? "

दिनेशचंद्र बाबूचा प्रश्न ऐकतांच शीतलेला अनावर हुंदका आला. तिनें हुंदके देत देत आपलें डोकें त्याच्या खांद्यावर ठेविलें. बराच वेळ दोघेंहि स्तब्ध होतीं. शोकाचा पहिला वेग कमी होतांच ती दीनवाण्यासारखी दिनेशचंद्र बाबूच्या तोंडाकडे पाहून म्हणाली, " मी-मी-तुमच्या पायां पडतें—मला तुमच्या चिंतेचें कारण सांगा. आज इतके दिवस तुम्हीं उडवा-उडवी करतां परंतु माझी खात्री झाली आहे कीं, आपणां सर्वांवर कांहीं तरी

भयंकर संकट ओढवलं आहे. सकाळचें तें पत्र येतांच तुम्हीं 'हाय हाय' करीत कपाळावर कां हात मारून घेतला—हें काय आहे ? सांगाहो सांगा, मला असें संशयांत नका ठेवूं—तुमचें दुःख तेंच माझें दुःख ना !—"

क्षणभर त्यानें शीतलेच्या केविलवाण्या चेहऱ्याकडे पाहिलें. खरी गोष्ट तिला सांगावी कीं नाहीं याचा तो आपल्याशीं विचार करीत होता. आपणावर आलेलें संकट जर हिला सांगितलें तर हिची काय स्थिति होईल ! फक्त आपल्या वृत्तींत पडलेल्या फरकामुळें जर तिची अशी स्थिति झाली आहे; तर मग हिला खरी गोष्ट सांगितल्यावर हिची स्थिति कोठल्या थराला जाईल ! असा विचार त्याच्या मनांत येऊन शांतपणें तिचा हात धरून तो म्हणाला, शीतले, तूं अशी हवालदील काय झाली आहेस ! अग, माझं दुःख तुला मी सांगणार नाहीं असं कसं होईल ? मी आतां सर्व सांगणारच आहें आणि तेवढ्याकरितां हेमबाळाला देखील येथें बोलाविलें आहे. तो आतां इतक्यांतच येथें येईल." क्षणभर थांबून तो पुढें म्हणाला, "मला उद्यां जावयाचें आहे."

"कुठें ?" भयभीतच होऊन शीतलेनें एकदम विचारलें.

"बांकपुरांत. सकाळीं मला जें पत्र आलें होतें तें बांकपूरच्या एका सावकाराचें आहे. ह्या पंधरा दिवसांत माझे सर्व ग्रह प्रतिकूल होऊन मला सर्वत्र तोटाच तोटा येऊं लागला आहे. त्या बांकपूरच्या सावकाराचें मला फार मोठें देणें आहे आणि त्याची तडजोड करण्याकरितां त्यानें मला मुद्दाम बांकपुरास बोलाविलें आहे."

इतक्यांत हेमचंद्र बाबू आंत आला. त्याच्याकडे पाहून दिनेशचंद्र बाबू म्हणाला, "हेमबाळ, आलास ! कांरे इतकी रात्र केलीस ?"

"आज 'आर्यमंडळांत' प्रो * * चें 'स्वदेश जागृति' वर लेक्चर् होतें, तेथेंच मला फार वेळ झाला त्यामुळें तुमचा निरोप फार उशिरां पोहोंचला."

"अरेरे ! तुझ्याहि डोक्यांत ह्या 'स्वदेशी' बद्दल वेड आहे का ?—पण कां नसावं ! असाच प्रयत्न आम्ही चालू ठेविल्यास केव्हांना केव्हां तरी आमचे मनोरथ खात्रीनें पूर्ण होऊन स्वराज्यरवीच्या शीतल छायेंत आम्ही बसूं—पण तें जाऊं दे. मी तुला आज येथें बोलाविलें आहे त्याचें कारण फारच महत्त्वाचें आहे." दिनेशचंद्रबाबू उसनें अवसान आणून गंभीरपणाचा आव घालून बोलत होता. वास्तविक त्याच्या मनांत जें भयंकर काहूर

चाललें होतें तें त्याचें त्यालाच माहित. " मी तुला येथें बोलाविण्याचें कारण, उद्यां मला येथून कलकत्त्यास जाण्याकरितां निघावयाचें आहे. तर मी परत येईपर्यंत अगर मी तेथून तुम्हांला लिहीपर्यंत तूं घर सोडून कोठेंहि जाऊं नयेस. बांकपूरच्या एका सावकाराचें मला आज सकाळीं फार निकडीचें पत्र आलें आहे. तेथें मला तारीख १ मेला पोहोंचलेंच पाहिजे. म्हणून उद्यां सकाळीं मी येथून निघणार. आपल्याकडे ' पत्रिका ' पत्र येत असतें. त्या पत्रांत तुम्ही पुढें काय करावयाचें तें दुसऱ्या तारखेला लिहीन. मी कुठें आहें, काय करीत आहें वगैरे सर्व त्या पत्रावरून तुम्हांला कळेल. कदाचित् ता. २ ला माझें पत्र त्या वर्तमानपत्रांत नच आलें तर ता. ५ ला मी खात्रीनें परत येणार असें समजा. मी ह्या सेफ्मध्यें माझीं सर्व कागदपत्रें ठेविलीं आहेत. वर्तमानपत्रांत माझें पत्र येतांच ह्या सेफ्मधून कागद काढून त्यांतील तुझ्या आणि शीतलेच्या नांवाचीं पत्रें तुम्ही घ्या. आणि मी —मी परत येईपर्यंत त्यांत लिहिल्याप्रमाणें व्यवस्था करा. "

'मी परत येईपर्यंत' हे शब्द उच्चारतांना दिनेशचंद्र बाबू बराच अडखळला. बोलतांना त्याच्या तोंडावर होत असलेला फरक शीतला लक्ष देऊन पहात होती. आपल्या पतीनें सांगितलेली हकिकत खरी आहे किंवा खोटी आहे याचा ती आपल्या मनाशींच निर्णय करूं लागली. शेवटीं पतीनें सांगितलें त्यांत कांहीं खरें व कांहीं खोटें आहे असें तिला वाटूं लागलें. इतक्यांत चोपडींत लिहिलेल्या ' १ मे १८९६ ' तारखेची तिला आठवण झाली. ' पंधरा दिवसांपासून व्यापारांत तूट येत आहे ' हें जें पतीनें सांगितलें तें निव्वळ खोटें सांगितलें, कारण ' १ मे १९०८ ' बरोबर ' १ मे १८९६ ' चा निकट संबंध आहे, असें तिच्या मनानें पूर्ण घेतलें होतें. तेव्हां आतां पतीनें जें सांगितलें तें केवळ आपली समजूत करण्याकरितां असें वाटून ती म्हणाली, " नाहीं, नाहीं, तुम्हांला बांकपुरास जावयाचें आहे तें खरें, परंतु तेथें सावकाराला भेटण्याचें जें निमित्त तुम्हीं सांगतां तें मात्र अगदीं खोटें. माझें मन मला पूर्ण साक्ष देत आहे कीं, खात्रीनें आपणावर कांहींतरी भयंकर संकट येणार आहे. "

सापत्न मातेचें भाषण ऐकून हेमचंद्र बाबू क्षणभर घोंटाळ्यांत पडला. त्यानें आपल्या पित्याकडे दृष्टि फिरविली तों त्याच्या छातींत धस्स् झालें. शीतलेचें भाषण ऐकून दिनेशचंद्र बाबूचा चेहरा चिंतेनें व्यापून निस्तेज

पडला होता. पित्याच्या चेहऱ्यांतील हा फरक पाहून त्याचें मन कचरलें. पित्यावर कांहीं तरी संकट आलें आहे असेंहि त्याला वाटलें. तो बोलणार इतक्यांत शीतला त्याच्याकडे पाहून म्हणाली, " हेमचंद्रा, त्यांच्या तोंडाकडे पाहून तुला देखील नाहीं कांरे कांहीं कल्पना होत !" पुनः ती आपल्या पतीकडे वळून म्हणाली, " सांगा हो सांगा, असं काय करतां ! ' १ मे १९०८ ' चा आणि ' १ मे १८९६ ' चा कांहीं संबंध खात्रीनें—"

शीतलेच्या तोंडून ' १ मे १८९६ ' हे शब्द ऐकतांच दिनेशचंद्र बाबूच्या अंगावर भीतीचे शहारे उठले. त्यानें आश्चर्यानें पण भीत भीत मध्येंच विचारिलें, " तु–तु तुला क–कसं कळलं ? "

" सगळं सांगत्यें. पण पहिल्यानें तुम्हीं सां—"

" सांग, सांग, पहिल्यानें तूं सांग. "

" आज मी आपल्या खाजगी खोलींत गेलें होत्यें. टेबल उघडेंच होतें त्यांत मी पाहि—"

" बस्स्, बस्स्, बस्स्, कळलं–कळलं " असें म्हणून त्यानें दोन्ही हातांनीं तोंड झांकून घेतलें.

सर्व खोलींत एकदम सामसूम झाली. बराच वेळ ते तिवेहि अगदीं स्तब्ध होते. पित्याची ती हृदयविदारक स्थिति पाहून हेमचंद्र बाबू अगदीं गळून गेला. पित्याला कोठल्या रीतीनें धीर द्यावा हेंच त्याला कळेना. थोड्या वेळानें तो उठला आणि दिनेशचंद्र बाबूच्या जवळ जाऊन सौम्य स्वरानें म्हणाला, " पिताजी, माता म्हणते तसेंच जर कांहीं आपणावर खरोखरच संकट आलें असेल तर आम्हांला देखील त्या दुःखाचे वाटेकरी होऊंद्या. "

उत्साहयुक्त खऱ्या प्रेम कळकळीनें हेमचंद्र बाबूनें उच्चारलेलें एकच वाक्य ऐकून दिनेशचंद्र बाबूनें डोळ्यांवरील हात काढले आणि क्षणभर त्या दोघांकडे पाहून तो कांपऱ्या आवाजांत म्हणाला, " हेमबाळा, मी आतां तुम्हांला जें सांगितलं त्यापेक्षां मला कांहींच जास्त सांगतां येत नाहीं. तूं–तुझी माता—तुम्हीं दोघेंहि चांगलें सुशिक्षित आहांत. "

दोघांनीं त्याच्याकडे पाहिलें तों त्याची चर्या बरीच सौम्य दिसली. दिनेशचंद्रबाबू पुढें म्हणाला, " चला, फार रात्र झाली. मला अद्यापि उद्यांची तयारी करावयाची आहे. "

मुलाचें एकच प्रेमी वाक्य ऐकून दिनेशचंद्रबाबूच्या मनानें विलक्षण उचल घेतली. त्याच्या मनावर विद्युत् परिणाम झाला. क्षणापूर्वी जो भीतीनें गांगरून गेला होता त्याच दिनेशचद्र बाबूची चिंताग्रस्तता हेमचंद्र बाबूच्या एका खऱ्या कळकळीनें उच्चारलेल्या वाक्यानें एकदम नाहींशी होऊन त्याच्या मनाला पुढें येणाऱ्या संकटाला तोंड देण्याचें धैर्य आलें. तो शीतलेच्या निस्तेज चेहऱ्याकडे पाहून म्हणाला " अशी तूं कशी अगदींच वेडी, संकट संकट करून कां उगाच आपल्या जिवाला त्रास करून घेतेस ! चल, "
हेमचंद्रबाबूकडे वळून तो पुढें म्हणला " हेमबाळा चल ऊठ पाहूं तूं. "

जेवतांना दिनेशबाबू बराच खुषींत होता. त्याच्या आतांच्या आणि एका तासापूर्वीच्या वर्तनांत जमिनअस्मानाचा फरक पडला होता. ज्याची थोड्या वेळापूर्वी अगदीं केविलवाणी स्थिति झाली होती तोच आतां आपल्या मुलाबरोबर चालू चळवळीवर मोठ्या आनंदानें भाषण करीत होता. वाचक हो ! हें असें त्याच्या वृत्तींत फरक पडण्याला काय बरें कारण असेल ! हेमचंद्र बाबूनें आणि शीतलेनें त्याच्या दुःखाचे वाटेकरी होण्याची आपली इच्छा प्रदर्शित केली म्हणून त्याच्या वृत्तींत फरक पडला असेल काय ? अर्थात्. त्याशिवाय दुसरें काय कारण ? आपल्या मुलानें—आपल्या पत्नीनें आपणावर आलेल्या संकटाची किंचित्हि कल्पना नसतांना मोठ्या प्रेमानें, कळकळीनें आणि एकदिलानें त्या संकटाचा वांटा मागावा आणि तेंच संकट स्वतः भोगण्यास आपणाला जड जावें ह्या आपल्या मनाच्या निर्बलतेची त्याला लाज वाटून त्याच्या मनानें उचल खावी यांत काय नवल ! अहाहा ! आपल्या आप्तजनांच्या सहानुभूतीच्या प्रेमी शब्दांत अशी काय ईश्वरानें जादू भरून ठेविली आहे बरें !

जेवण झाल्यावर दिनेशचंद्र बाबू आपल्या खोलींत जाऊन बसला. दुसरा दिवस उजाडेपर्यंत तो सारखा लिहित होता. दिनेशचंद्र बाबू प्रमाणें त्याच्यापासून सवाशें मैलांवर मुंबईत—भायखळ्यावर एका लहानशा खोलींत एक मनुष्य आपल्यापुढें एक पत्र ठेवून कपाळावर हात देऊन सारखा विचार करीत स्तब्ध बसला होता. त्या मनुष्यालां देखील दिनेशचंद्र बाबूप्रमाणें संकटांत टाकणारें एक पत्र आलें होतें.

---

ए. पी. सं. ग्रंथ. भाचनालय गाव.
वा. क्र. ३६४९ नों. दि ......
वि. ... ग्रा. वा. ... क्र. .....

# २ बारा वर्षांपूर्वींचें वचन

प्रभाकर क्षितिजावर येऊन तीन साडे तीन घटका झाल्या होत्या. त्यानें आपलीं सुवर्णकिरणें दिनेशचंद्र बाबूच्या खिडकींतून आंत सोडलीं. अद्यापि दिनेशचंद्रबाबू लिहीतच होता. शेवटीं इतका वेळ श्रम करून लिहिलेले कागद त्यानें निरनिराळ्या दोन पकिटांत घातले आणि तीं पाकिटें बंद करून त्यांवर सील केलें. एका पत्रावर हेमचंद्र बाबूचें आणि दुसऱ्यावर शीतलेचें नांव लिहिलें होतें. सील करून झाल्यावर त्या पत्राकडे पहात तो आपल्याशींच म्हणाला, " झालं ! इथलं सर्व काम आटोपलं ! हीं दोन पत्रें, एक हेमबाळाकरितां आणि एक माझ्या लाडकीकरितां—यदाकदाचित् आमच्या इच्छेप्रमाणें न होतां आमचे खून पडले तर आमच्या खुनाची बातमी ' पत्रिका ' पत्रांत जरूर छापली जाईल. ती—माझ्या खुनाची दुःखव्यापक बातमी माझा हेमबाळ—माझी लाडकी वाचील. अरेरे ! देवा, काय हा मजवर बिकट प्रसंग ! हीं बारा वर्षें बारा दिवसांप्रमाणें क्षणांत निघून गेलीं. आणि हा संकटाचा दिवस येऊन ठेपला. हाय, हाय ! पण—पण—संकटाचा कां ? मी वचन दिलं आहेना ! मग आतां शोक करून काय अर्थ ! बारा वर्षांपूर्वींच हा प्रसंग यावयाचा पण माझें नशीब बलवत्तर ! देवा त्या दिवसाप्रमाणें हाही दिवस चुकेल काय ? त्या वेळीं माझा वेळ आला होता पण काळ आला नव्हता. परंतु आतां—आतां काय ? काळ, वेळ दोन्ही एकदमच आले आहेत. हा प्रसंग मला धीरानेंच सहन केला पाहिजे. त्याशिवाय गत्यंतरच नाहीं. माझा हस्तलेख—माझें वचन अडकलें आहे—मी शपथ घेतली आहे ती मला पाळलीच पाहिजे. पण—पण—हा धक्का माझी लाडकी कसा सहन करील तो करो—माझ्या नंतर हेमबाळ तिला दुःख—छे, हेमबाळाविषयीं असा संशय ! छे, छे, तो मोठा दयाळू अंतःकरणाचा आहे. तो कधींहि तिला अंतर देणार नाहीं. मी आतां केली आहे तीच व्यवस्था योग्य केली आहे. माझे सर्व हेतु तो खात्रीनें पूर्ण करील. "

इतक्यांत घड्याळांत सहांचे टोले पडले. ते ऐकतांच दिनेशचंद्र बाबू

खडबडून आपल्या विचार सृष्टींतून जागा झाला. त्यानें तीं दोन पत्रें आपल्या टेबलाच्या खणांत ठेवून त्याला दोन स्वतंत्र कुलुपें लाविलीं. थोड्या वेळानें त्यानें टेबलाखालीं फाडून तुकडे केलेल्या सर्व रद्दी आणि खासगी कागदांना एकत्र करून काडें पेटवून आग लाविली. हां हां म्हणतां त्या रद्दी कागदांची राख रांगोळी झाली. क्षणभर त्या राखेच्या ढिगाकडे पाहून तो उठला. सर्व खोलीभर दृष्टी फेंकून त्यानें दरवाजा उघडला तों शीतला तेथेंच दरवाज्यांत बसलेली त्याच्या दृष्टीस पडली. सर्व रात्र बिचारी शीतला आपल्या पतीची संकटांतून मुक्तता व्हावी म्हणून तेथेंच दरवाजांत बसून अनन्यभावें ईश्वराची करुणा भाकीत होती. आपल्या पतीवर आतां कांहीं तरी अनिष्ट प्रकार गुदरणार असा तिचा दृढ समज झाला होता. ती आपल्या बावरलेल्या मनाला धीर देण्याचा पुष्कळ प्रयत्न करी परंतु तिचे सर्व यत्न निष्फळ होत. तिला दरवाजांत अश्रू गाळतांना पाहून दिनेशचंद्र बाबू म्हणाला, " वेडे, तूं हें काय मांडलें आहेस ! इतकं भांबावून जाण्याला तुला झाल तरी काय ? "

पतीकडे पाहून तिनें एकदम त्याच्या गळ्याला मिठी मारिली. तिची छाती शोकानें अगदीं भरून गेली होती. तिच्यानें स्पष्टपणें बोलवत देखील नव्हतें. ती अस्पष्ट आवाजांत स्फुंदत स्फुंदत म्हणाली—" नकाहो असं करूं ! तुमच्या-वर–तुमच्यावर कांहीं तरी खात्रीनें भयंकर प्रसंग आला आहे—माझं मन मला सांगतं—तुम्हीं आज कलकत्त्याला जाऊं नका. तुमच्यापुढें मी पदर पसरतें. टेबलाच्या खणांत ती बारा वर्षांपूर्वीची तारीख वाचून माझं मन सारखं धडधडत आहे. मला कालपासून एकसारखी तळमळ लागून राहिली आहे. तुम्हीं माझी कितीहि समजूत केलीत तरी तुमचा जीव सध्यां धोक्यांत आहे. मला सांगा— मी तुमच्या पायां पडतें. आजपर्यंत कधींहि नाहीं आणि आजच कां बरं असे निष्ठूर होतां सांगा—तुम्हांला माझ्या गळ्याची—"

दिनेशचंद्र बाबूनें चटकन् तिच्या तोंडावर हात दिला आणि तिच्या बोल-ण्यांत अडथळा आणिला. इतक्यांत बाहेर टांग्याचा आवाज ऐकूं येऊं लागला थोड्या वेळानें हेमचंद्र बाबू आंत आला. त्याच्याकडे पाहून दिनेशचंद्र बाबू म्हणाला, " टांगा आला वाटतं ! चला तर, गाडीचा वेळ भरत आला ना ! हें पहा—हेमबाळा हिला धर, थोडा वेळ सांभाळ, हिचें

डोकें कांहीं आज ठिकाणावर नाहीं " असें म्हणून कशीबशी त्यानें शीतलेच्या हातून आपली सुटका करून घेतली.

खरोखरच त्यावेळीं शीतलेची स्थिति फारच शोचनीय झाली होती. हेमचंद्र बाबूंनें तिचा हात धरून जवळच असलेल्या एका आराम खुर्चीवर तिला बसविलें. थोडया वेळानें दिनेशचंद्र बाबू निघण्याच्या तयारीनें कपडे करून तेथें आला. पतीची ती जाण्याची तयारी पाहून शीतलेला हुंदके आवरेनासे झाले. ती मोठमोठ्यानें हुंदके देऊं लागली. तिच्या त्या शोचनीय स्थितीकडे पाहून दिनेशचंद्रबाबूचा इतका वेळ जुलमानें धरलेला धीर खचूं लागला. त्यानें चटकन् तोंड फिरवून हेमचंद्रबाबूला बाजूला येण्याची खूण केली. दोघे पितापुत्र बाहेर दिवाणखान्यांत आले. आपल्या खिशांतील किल्लया काढून त्या हेमचंद्र बाबूच्या स्वाधीन करून तो म्हणाला, " हेमबाळा ह्यापैकीं एक किल्ली तिजजवळ दे आणि एक तूं आपल्याजवळ ठेव. ता. २ च्या 'पत्रिकें' त माझें पत्र आल्यावर तुम्हीं दोघें मिळून टेबल उघडा. त्यांत तुमच्या नांवाचीं पत्रें तुम्हांला मिळतील. त्याप्रमाणें व्यवस्था करा. आणि तुला दुसरें एक सांगावयाचें आहे, जर 'पत्रिकें' त माझें पत्र आलें नाहीं तर कोठल्याहि सबबीवर तुम्हीं टेबल उघडूं नये आणि तूंहि घरांतून कोठें जाऊं नये. तुला आतां विशेष सांगण्याची जरूरी नाहीं, पण इतकेंच सांगतों कीं, तूं स्वतःला ह्या सध्यांच्या स्वदेशी चळवळीबद्दल नीट जप. भलतेंच वेड डोक्यांत भरवून घेऊन कांहीं भलतंच करूं नको. कारण सध्यां आपल्या कलकत्त्यांत ह्या स्वदेशीचं फारच प्रस्थ माजलें आहें. बरं— तिला—तुझ्या मातेला नीट जप बरं. जातों बरं मी आतां. " असें म्हणून त्यानें प्रेमानें हेमचंद्र बाबूच्या पाठीवरून हात फिरविला. क्षणभर तो गोंधळल्यासारखा तेथेंच उभा राहिला, नंतर तडक खालीं उतरून बाहेर उभा असलेल्या टांग्यांत जाऊन तो बसला.

दिनेशचंद्र बाबूजवळ अंगावरच्या कपडयाशिवाय एका खिशांत कलकत्त्याहून येण्याजाण्यापुरतें रेल्वे हाशील आणि एका खिशांत घड्याळ व त्याला संकटांत टाकणारें तें पत्र होतें. गाडींत बसतांच गाडी चालू झाली. आपलें अवसान खचूं नये म्हणून तो निघतांना शीतलेला भेटला नाहीं. परंतु घरापासून गाडी थोडी दूरवर गेल्यावर शीतलेला न भेटल्याबद्दल त्याला

पश्चात्ताप वाटूं लागला. जिचें आपणावर इतकें अकृत्रिम प्रेम—इतकी उत्कट भक्ती कीं, ज्या भक्तीमुळें कांहींहि मागमूस नसतां आपणावर येणाऱ्या संकटाची तिनें खरी कल्पना केली. जिनें आजपर्यंत आपल्या सुखासाठीं काडी इतकीहि कसूर केली नाहीं अशा त्या आपल्या प्रेमी पत्नीची—शीतलेची आपण शेवटची—होय शेवटचीच भेट घेतली नाहीं याबद्दल त्याचें मन त्याला खाऊं लागलें.

## '१ मे १९०८'

दिनेशचंद्रबाबू वर लिहिलेल्या तारखेला दुपारीं तीन वाजतां बांकपुराच्या स्टेशनवर उतरला. गाडींतून उतरतांना त्याचीं पावलें जड झालीं. तो शून्यमनानें स्टेशनच्या बाहेर पडला. नियमीत ठिकाणीं जाण्याला त्याला अद्यापि दोन तासांचा अवकाश होता. एखाद्या छाकट मनुष्याप्रमाणें तो हळुहळू चालला असतां पाठीमागून त्याच्या पाठीवर कोणी तरी हलकेंच स्पर्श केल्याचा त्याला भास झाला. त्यानें मागें वळून पाहिलें.

"दिनेशचंद्रा, मित्रा तूं ह्या हतभागी प्राण्याला ओळखलें नाहींस काय ?"

"को–ण–चंद्र–"

"होय मीच तो हतभागी शशिभूषण."

"कोण शशिभूषण ! अहाहा ! आज बारा वर्षांनीं ही आपली भेट !"

असें म्हणून दोघांनीं एकमेकांला गाढालिंगन दिलें. वाचकहो ! तुम्ही शशिभूषणाला ओळखलें काय ? चार दिवसांमागें मुंबईत—भायखळ्यावर रात्रींच्या उत्तरप्रहरीं एक पत्र पुढें ठेऊन त्या पत्रावर अस्वस्थमनानें विचार करीत बसलेला शशिभूषणच होता. दिनेशचंद्र आणि शशिभूषण ह्या दोघांना एकाच कामाकरितां बांकपुरास त्या विलक्षण संकटांत टाकणाऱ्या पत्रानें बोलावून आणलें होतें. एकमेकाला आलिंगन देऊन झाल्यावर ते एकमेक स्तब्ध उभे राहून एकमेकांकडे पाहूं लागले, तों त्यांना आपल्या मूळच्या ऐक्याची परस्परांस खूण पटूं लागली. अशा रीतीनें एकमेकांकडे पाहणें म्हणजे तें तत्वपरिज्ञानच होय. त्यावेळीं एक अंतःकरण दुसऱ्या अंतःकरणाशीं ऐक्य पटवून घेत होतें. परस्परावलोकनानें नेत्रांच्या द्वारें एक मन दुसऱ्या मनास "आपण कोण होतों ? आतां कोण आहों ? आपली पूर्वी काय स्थिति होती ? आतां काय आहे ? आपण कोठें जातों ? आपणावर काय बिकट प्रसंग आला आहे ?" वगैरे

एकमेकांचीं मनें एकमेकांला सांगत होतीं. व एकमेकांचीं मनें तें ग्रहण करीत होतीं. अशा रीतीनें मनाच्या ऐक्यभावाची साक्ष पूर्ण पटल्यावर शशिभूषणानें दिनेशचंद्र बाबूच्या खांद्यावर हात ठेविला आणि म्हणाला, " दिनेशचंद्रा, मित्रा, तुझ्याकडे पाहतांच तूं मोठा निश्चयी मनाचा दिसतोस पण माझी स्थिति मात्र अगदींच उलट. माझ्या दुबळ्या मनाला कुठल्या रीतीनें धीर द्यावा हेंच मुळीं मला कळत नाहीं अशी माझी विलक्षण स्थिति झाली आहे. मला जर सुबोधचंद्र पालचें पत्र आलें नसतें तर मी कधींहि येथें आलों नसतों. येथें येऊं नये असें मला पुष्कळदां वाटलें, परंतु ज्या अर्थीं त्यानें न चुकतां बरोबर वेळेवर आपणांस पत्र पाठविलें त्या अर्थीं त्याला टाळाटाळ करणें म्हणजे स्वेषांत भर घालण्यासारखें आहे. जर आपण त्याला चुकविलें तर तो आपलीं पाळें मुळें साफ खणून काढील अशी माझी पूर्ण खात्री आहे. मी त्याला पूर्ण—पूर्ण ओळखून आहें. बरं पण तुझा हेमबाळ कसा आहे ? तें मला पहिल्यानें ऐकूं दे. आणि—आणि तूं मला बारा वर्षांपूर्वीं दिलेल्या वचनाप्रमाणें सर्व व्यवस्था केलीच असशील ? कीं विसरलास ! "

शशिभूषण बाबूचें पहिलें वाक्य ऐकून त्यावर दिनेश बाबू विचार करीत होता. शशिभूषणाच्या म्हणण्याप्रमाणें खरोखरच कां आपण निश्चयी मनाचे आहों हाच एक प्रश्न तो आपल्या मनाशीं पुनः पुनः विचारी. त्यामुळें शशिभूषणाचें पुढलें भाषण त्याच्या लक्षांतहि आलें नाहीं. परंतु त्याच्या शेवटल्या वाक्यांत उच्चारलेलें ' बारा वर्षांपूर्वीं दिलेल्या वचनाप्रमाणें ' हे शब्द चुटपुटते त्याच्या कानावर आले तसा तो चपापला. त्यानें शंकायुक्त नजरेनें शशिभूषणाकडे पाहून विचारलें.

" काय ? तूं आतां ' बारा वर्षांपूर्वीं वचनाचें ' असें काय म्हटलेंस ? "

" तुझ्या हेमबाळाविषयीं तूं दिलेलें वचन— "

" हं समजलों, समजलों. त्या विषयीं तूं अगदीं बेफिकीर रहा. त्याची सर्व व्यवस्था मी उइलमध्यें करून आलों आहें. पण—पण कायरे शशिभूषण आपणाला ज्या ठिकाणीं जावयाचें तें ठिकाण तुला माहित आहे का ? "

" हो तुला नाहीं का माहीत ? सुशील छापखान्याच्या मागल्या पडक्या घरांत—तुला नाहींका आठवत आपली बैठक त्या घरांत झाली होती ती ! मला वाटतं आज देखील तेंच घर नेमण्याचें कारण असें असेल कीं,

ज्या ठिकाणीं आपल्या मित्रमंडळाची स्थापना झाली त्याच ठिकाणीं तिचा शेवट करावा असा सुबोधचंद्राचा बहुतकरून हेतु असावा. "

बोलतां बोलतां ते दोघेजण माणिक स्ट्रीटमध्यें आले. जसें जसें तें पडकें घर जवळ येऊं लागलें तसें तसें त्यांच्या प्रत्येक पावलाबरोबर त्यांच्या छातींत भीतीचा एक एक भयंकर आघात होत होता. दोघेजण आतां मुकाट्यानें चालले होते. पडक्या घराच्या मोठ्या दरवाज्यावर एक काळा धिप्पाड मनुष्य उभा होता. आमचे दोन मित्र दरवाजाजवळ जातांच त्यानें "कोण आहे ?" असा दरडावून प्रश्न केला. शशिभूषणानें पुढें होऊन त्याच्या कानांत 'बारा वर्षांपूर्वीचें वचन' असे खुणेचे शब्द उच्चारले. खूण पटतांच एकवेळ त्याच्याकडे चौकसदृष्टीनें पाहून त्या रखवालदारानें दरवाजा उघडला. बाहेरून जरी तो दरवाजा ओबडधोबड आणि कमकुवत दिसत होता तरी आंतून त्याला लोखंडी पट्या मारून मारून बराच मजबूत केला होता. आमचे दोन मित्र आंत गेल्यावर त्या मनुष्यानें खाडकन् तो दरवाजा बंद केला. त्या आवाजाबरोबर दोघांच्याही छातींत चर्र झालें. आतां आपण खास मृत्यूच्या जबड्यांत येऊन पडलों असें त्यांना वाटूं लागलें. त्या मनुष्याच्या मागून जातांना त्यांच्या चालण्याच्या गतीवरून असें वाटत होतें कीं, दोघानींहि आपलें सर्व धैर्य दरवाजाबाहेर ठेविलें होतें. त्यांचीं शरीरें लटलट कांपत होतीं. दोन दालनें टाकल्यावर त्या मनुष्यानें त्यांना एका ओसाड पण भव्य खोलींत आणून उभें केलें. तेथें असलेल्या एका टेबलावर त्यांची दृष्टी जातांच त्या दोघांच्या तोंडून भीतियुक्त अस्पष्ट किंकाळी ऐकूं आली. दोघांची भीतीनें गाळण उडाली. त्यांच्या अंगावर भीतीचे रोमांच उभे राहिले. टेबलावर असलेल्या वस्तुंकडे एकवेळ पाहून दोघांनीं एकमेकांकडे पाहिलें. ती वस्तु पाहून परस्परांची काय स्थिति झाली आहे तें परस्परांना कळलें. दोघांचीं तोंडें अगदीं कळाहीन झालीं. इतकी भीति वाटण्यासारखें त्या टेबलावर होतें तरी काय ? दुसरें काय ह्या नश्वर जगाचा संबंध तोडणारीं तीन पिस्तुलें होतीं.

टेबलाशिवाय त्या खोलींत तीन मोडक्या खुर्च्या अव्यवस्थित रीतीनें टेबलासभोंवतीं मांडल्या होत्या. खोलीला मजबूत गज मारलेल्या सहा भक्कम खिडक्या होत्या. त्यावेळीं त्या सर्व बंद होत्या. खोलींत जो कांहीं

उजेड पडला होता. तो फक्त खिडक्यांवर असलेल्या झरोक्यांतून येणारा अंधुक प्रकाश होता. शिवाय समोरासमोर दोन दरवाजे होते. पैकीं एकाला आंतून मोठें कुलूप लाविलें होतें. आणि दुसऱ्या दरवाजानें त्या मनुष्यानें आमच्या दोन मित्रांना आंत आणलें होतें, दोघांपुढें दोन खुर्च्या करून तो मनुष्य म्हणाला, ,' बाबूसाहेब, माझा धनी आतां इतक्यांत येईल. आपणांस कांहीं पाहिजे असल्यास तें आणून देण्याचा मला माझ्या धन्यानें हुकूम दिला आहे. मी आपणाकरितां काय करूं ? " दोघांपैकीं एकानेंहि उत्तर दिलें नाहीं. त्याचें भाषण ऐकून त्यांनीं एकमेकांकडे शून्यदृष्टीनें पाहिलें. बराच वेळ ते एखाद्या पुतळ्याप्रमाणें स्तब्ध बसले होते. त्यावेळीं त्यांच्या मनांत काय विचार चालले होते तें समजणें फार कठीण होतें. रखवालदार मात्र खोलींत इकडून तिकडे फिरत होता. थोड्या वेळानें दिनेशचंद्र बाबूनें आपलें घड्याळ काढून त्यांत किती वाजले तें पाहिलें. त्यांत नुकतेच साडेचार वाजले होते. त्यानें घड्याळ काढलेलें पाहून शशिभूषण बाबूनें त्याच्याकडे प्रश्नार्थ दृष्टीनें पाहिलें. त्याच्या मनांतील भाव ओळखून दिनेशचंद्रानें आपलें घड्याळ त्याच्या बाजूला फिरविलें. इतके ते दोघे संज्ञाशून्य झाले होते. इतक्यांत बाहेर मोठा गलबला झाला. बाहेर काय झालें तें पाहण्याच्या उद्देशानें रखवालदारानें हळूच दरवाजा उघडला, व बाहेर डोकावून पाहिलें. बाहेर त्याच्या दृष्टीस काय पडलें असेल तें असो त्यानें चटकन् आपलें डोकें आंत करून एकदम दरवाजा बंद करून घेतला. हळु हळू वाढतां वाढतां त्या गलबल्याला दंग्याचें स्वरूप आलें. थोड्या वेळानें एक मोठा भयंकर आवाज झाला. सर्व बाजूंनीं मोठमोठ्या आरोळ्या ऐकूं येऊं लागल्या. बाहेर काय गडबड चालू आहे तें कळण्याला त्या दोघांना कांहींच मार्ग नव्हता. बराच वेळ लोटला. पत्रांत मुक्रर केलेला पांचाचा वेळ टळला. अद्यापि बाहेरचा गलबला बंद न होतां उलट जास्तच वाढत होता. दिनेशचंद्र बाबूनें पुनः आपलें घड्याळ काढून पाहिलें आणि कितीं वाजले तें पाहण्याकरितां शशिभूषणाकडे त्यानें घडयाळ फिरविलें. साडेपांच वाजून गेले आहेत असें पहातांच शशिभूषण बाबू खुर्चीवरून ताडकन् उठला आणि पहाऱ्यावर असलेल्या मनुष्याला जोरानें म्हणाला, चल, उघड दरवाजा, आतां आम्हीं सुबोधचंद्राचें तुझ्या धन्याचें कांहीं लागत नाहीं. आम्हांला नेमून दिलेल्या

वेळीं आम्हीं हजर होतों. तो आला नाहीं, आतां आम्हीं त्याच्या वचनांतून मुक्त झालों. उघड दरवाजा.' आपणा करितां नेमलेली वेळ चुकल्यामुळें शशिभूषण बाबूला बराच धीर आला होता. सुबोधचंद्र आतां जरी आला तरी आपण त्याच्या वचनाला कोठल्याहि रीतीनें बांधलेले नाहीं, असें दोघांनाहि वाटूं लागलें. इतक्यांत बाहेरच्या दरवाजावर कोणी धक्का मारल्याचा आवाज झाला. त्याबरोबर पुनः दोघांचीं तोंडें खर्रकन उतरलीं. थोड्या वेळापूर्वी जो त्यांना उसना धीर आला होता, तो जाऊन पुनः त्यांची छाती धडधडूं लागली. पहारेवाल्यानें हळूच दरवाजा उघडला, आतां आपल्या दृष्टीस सुबोधचंद्ररूपी यमाचा चेहेरा पडणार असें दोघांना वाटलें. त्यांचे हातपाय लटलट कांपत होते. सर्व शरीरांतून भीतीमुळें रक्त आटून त्याचें पाणी घामाच्या रूपानें बाहेर पडत होतें. त्यांचें सर्व शरीर भिजून चिंब झालें परंतु सुबोधचंद्राऐवजीं दुसराच एक मनुष्य घाबऱ्या घाबऱ्या आंत आला आणि एक फाटक्या कागदाचा तुकडा त्यांच्या पुढें केला. ही काय गडबड आहे याचा त्यांना कांहींच समज पडेना. बराच वेळ ते चौघेजण एकमेकांकडे टकमकां पहात होते. शेवटीं तो मनुष्य म्हणाला, "महाशय हा घ्या, हा कागद बाबूसाहेबांनीं दिला आहे." शशिभूषणानें तो कागद घेतला आणि वाचला. कागद वाचतांच त्याच्या चर्येत विलक्षण फरक पडला. त्यानें एकदम दिनेशचंद्र बाबूच्या खांद्यावर चापट मारून म्हटलें, "मित्रा, चल, झालों बुवा एकदांचे वचनांतून मुक्त—" दिनेशचंद्र बाबूनें त्याच्या म्हणण्याकडे कांहींच लक्ष दिलें नाहीं. त्याच्या हातांतून कागद घेऊन तो वाचूं लागला—

'नेमलेल्या वेळीं येत असतां मध्यंतरी विघ्न आलें. कोणी दुष्टानें बांब गोळा फेकला. मी जखमी झालों आहें तुम्ही आतां जा.

सुबोधचंद्र पाल.'

'तुम्ही आतां जा.' हें एकच वाक्य, परंतु ह्या एकाच तीन शब्दांच्या वाक्यानें त्या दोघांना नवा जीव आला. दोघेही परस्परांकडे पाहूं लागले. क्षणभरानें त्यांच्या तोंडावर हास्य चमकूं लागलें. शशिभूषण बाबू चटकन् दरवाजाकडे वळला तें पाहून तो मनुष्य म्हणाला "महाशय, तुम्हाला आतां ह्या पुढल्या दरवाजानें जातां येणार नाहीं. कारण बाहेर पोलिसच

गराडा पडला आहे. मी तुम्हांला दुसऱ्या वाटेनें नेतों चला" असें म्हणून तो चिठो घेऊन येणारा मनुष्य पुढें झाला. त्यानें दक्षिणेकडील भिंतीजवळ जाऊन कोंपऱ्यांतील कळ दाबली, त्याबरोबर भुयाराचा चोर दरवाजा उघडला. त्या गुप्त मार्गानें ते तिघेजण बाहेर पडले.

सुबोधचंद्र पाल कोण ? तो कशानें जखमी झाला ! पोलीसचा गराडा कां पडला ? वगैरे बरेच प्रश्नांचें वाचकांस गूढ पडलें असेल. तर त्यांची जिज्ञासा तृप्त करण्यासाठीं येथें थोडीशी हकीकत लिहिणें इष्ट आहे. पैकीं पहिला प्रश्न—सुबोधचंद्र पाल कोण ? हें वाचकांना, इतका वेळ जसे ते थांबले तसेंच पुढें थोडा वेळ थांबतील तर आम्हीं न सांगतां सुबोधचंद्र पाल स्वतःच आपली हकीकत त्यांना सांगील. बांब गोळा कोण्या दुष्टानें फेकल्या-मुळें तो जखमी झाला हें त्याच्याच पत्रावरून वाचकांना समजलें आहे. परंतु तो कोणी फेंकला ? का फेंकला ? हें मात्र आम्हांला माहित नाहीं. तरी देखील इतकी गोष्ट खरी कीं, त्या बांब गोळयापासून गरीब बिचारे दोन युरोपियन पोलिस इन्स्पेक्टर भयंकर जखमी झाले. शिवाय तीन पोलिस आणि सुबोधचंद्र पाल साधारण जखमी झाले. सुबोधचंद्र पाल नेमलेल्या ठिकाणीं येण्यापूर्वीं सुशील छापखान्यावर जप्तीचें वारंट सुटलें होतें. तें बजावण्याकरितां दोन युरोपियन पोलिस इन्स्पेक्टर आणि चोवीस हत्यारबंद शिपाई आले होते. छापखान्याच्या सर्व बाजूनीं पोलिसचा गराडा पडल्यामुळें सुबोधचंद्र पालला आंत जाण्यास मार्ग मिळेना. तेव्हां त्यानें नेमलेल्या वेळीं आंत पोहोंचण्यासाठीं बळजबरीनें आंत जाण्याचा प्रयत्न केला म्हणून त्याला शिपायांनीं कैद करून आपल्या इन्स्पेक्टर जवळ नेलें. इतक्यांत त्यांच्यामध्यें बांब गोळा येऊन पडला.

---

# ४ हेमचंद्र बाबूची निराशा

आनंदातिशयानें देहभानरहित ते दोघे मित्र बाहेर मोकळ्या हवेंत आल्यावर पहिल्यानें क्षुधाशमनार्थ एका उपहारगृहांत जाऊन त्यांनीं यथेच्छ फराळ केला. जगांतील सर्व आनंद आज त्यांच्या चेहऱ्यावर एकवटला होता. त्यांच्या आनंदाचें वर्णन कल्पनेशिवाय करणें म्हणजे मृगजलाला खऱ्या जलाची उपमा देण्यासारखें आहे. आपणावर आज काय प्रसंग आला होता. आतां आपण कोठल्या स्थितींत आहों? सुशील छापखान्यावर जप्तीचें वारंट आल्यामुळें सुबोधचंद्राचा मार्ग बंद झाला, त्या कारणानें आपल्या जिवावरचें संकट कसें टळलें? वगैरे विचार दिनेशचंद्र बाबूच्या मनांत येतात न येतात तों शीतलेची मूर्ति त्याच्या डोळ्यांपुढें आली. आपणावरचें आजचें संकट टळण्याला जर कांहीं कारण असेल तर तें आपल्या लाडक्या पत्नीची निःसीम पतिनिष्ठा हेंच होय, असें त्याला वाटूं लागलें. तिच्या उत्कट पतिनिष्ठेमुळेंच ईश्वर तिचा सहाय्यकर्ता झाला असला पाहिजे आणि त्याचमुळें आजचें संकट टळून सुबोधचंद्राच्या मार्गांत अनेक अडथळे आले. वगैरे विचार त्याच्या मनांत चालले होते. अद्यापि ते उपहारगृहांत फराळ करून स्तब्ध मनानें थोड्या वेळापूर्वी अनुभवलेल्या गोष्टीचा आपल्या मनाशीं विचार करीत बसले होते. शशिभूषण बाबूच्याहि मनांत विचारांची कमी गर्दी उडाली होती असें नाहीं. पण ते विचार एका निराळ्याच मार्गानें चालले होते. संकटांतून आपण खरोखरच मुक्त झालों किंवा नाहीं याचीच त्याच्या भित्र्या मनाला राहून राहून शंका वाटे. पुष्कळ वेळ विचार केल्यावर शेवटीं त्याला वाटूं लागलें कीं खरोखरच आपण ह्या संकटांतून पूर्ण मुक्त झालों नाहीं. तो दिनेशचंद्र बाबूकडे वळून म्हणाला, " दिनेशचंद्रा, आपण सुबोधचंद्राच्या वचनांतून मुक्त झालों असें तुला वाटतें काय? "

" होय. पण–नाहीं–मी अद्यापि त्या गोष्टीचा विचारच मुळीं केला नाहीं. कां बरं? तुला काय वाटतं? "

" मला वाटतं, आपण अद्यापि त्याच्या वचनांतून मुक्त झालों नाहीं. "

“ कारण ? ”

“ आपले प्रतिज्ञालेख त्याच्याजवळ आहेत ना ! जोंपर्यंत ते कागद त्याच्याजवळ आहेत तोंपर्यंत आपण त्याच्या वचनांत आहोंत. त्याचें आपणावर पूर्वीप्रमाणें स्वामित्व आहे. त्या कागदांची अंमलबजावणी त्याला वाटेल तेव्हां तो करूं शकेल. ”

“ हो, असं तर खरंच. ” बराच वेळानें डोकें खाजवीत खाजवीत दिनेशचंद्र बाबूनें उत्तर दिलें, “ बरं पण आतां ते कागद आपणाजवळ येण्याला काय उपाय आहे ? ”

“ तेंच तर मुळीं मला कळत नाहीं. मी मघापासून एकसारखा विचार करीत आहे पण एकहि विचार सुचत नाहीं—”

“ मग—मग आपण दोघेहि जाऊन त्याला भेटूं आणि ते कागद—”

“ छे, छे, अगदीं नांव नको काढूस—त्याच्यापुढें जाण्याला आपल्याला तर नाहीं बुआ धैर्य ! ”

शशिभूषणानें इतक्या तांतडीनें हात वर करून म्हटलें कीं, त्या ‘ छे, छे, आणि अगदीं ’ दोन शब्दांवरून त्याच्या भित्र्या मनाची पूर्ण साक्ष पटली. वरील शब्द उच्चारीत असतां त्याच्या हातांतील कांचेचा पेला खालीं पडून फुटला त्याचें भान देखील त्याला राहिलें नाहीं. थोड्या वेळानें दिनेशचंद्र म्हणाला, “ मग मी जाऊन त्याच्या जवळून ते—आपल्या सहीचे—कागद घेऊन येतों. ”

आपला प्रतिज्ञालेख ह्यापुढें सुबोधचंद्र पालजवळ ठेवणें आतां धोक्याचें आहे, असें शशिभूषणाच्या भाषणावरून त्याला वाटूं लागलें. आजचा दिवस जरी टळला तरी त्या कागदांचा उपयोग केव्हांही संधी येतांच सुबोधचंद्र करील असें त्याला वाटूं लागलें. एवढ्याकरितां आजच हरप्रयत्न करून येथें आल्यासारखे तितका कागद आपल्या हस्तगत करून घेण्याचा त्यानें विचार केला. तो परत घरीं जाण्याविषयीं फार उतावीळ झाला होता तरी त्या कागदाचें महत्त्व ऐकून आपलें मन त्याला आवरून धरावें लागलें. आपल्या बरोबर शशिभूषणानेंहि यावें अशी त्याची इच्छा होती परंतु त्याच्या भाषणावरून त्याला वाटलें कीं, आपण कितीहि जरी प्रयत्न केला तरी सुबोधचंद्राच्यापुढें तो कधींहि जाणार नाहीं.

“ तुझा झाला तर मग विचार ? ” भीत भीत शशिभूषणानें विचारलें.

" हो—य. झाला. पण—पण—कायरे शशिभूषणा आजच्या दिवसांतून आपण पार पडूं असें तुला वाटलें होतें का ? "

" बस् ! बाबा आतां त्या गोष्टीचें नांव देखील काढूं नको. तेवढे कागद एकदां आपल्या हातीं आले कीं मग सर्व मिळवलं ! "

दोघे मित्र उपाहारगृहांतून बाहेर पडले. शशिभूषण बाबूनें दिनेशचंद्र बाबूचा प्रेमानें निरोप घेऊन स्टेशनचा रस्ता धरला. तो दृष्टीआड होईपर्यंत दिनेशचंद्र त्याच्याकडे पहात होता. नंतर तो पुन्हां मागें वळला. सुबोधचंद्र पालचा त्यानें पुष्कळ शोध केला परंतु त्याचा कोठेंच पत्ता लागेना. शेवटीं सुशील छापखान्याच्या मागील पडक्या घरांत जाऊन एक वेळ शोध करून पहावा, या उद्देशानें तो माणिक स्ट्रीटमध्यें वळला. छापखान्याच्या कंपौंडांत अद्यापि पोलिसचा पहारा होताच. दिनेशचंद्र बाबूनें छापखान्याच्या कंपौंडाला दोन वेळा चक्कर मारिली परंतु आंत जाण्याला त्याला मार्ग मिळेना. दिनेशचंद्र बाबू पहिल्यानें छापखान्यावरून जातांना त्याला एका पोलिस सबइन्सपेक्टरानें पाहिलें, पुन्हां जेव्हां तो छापखान्यावरून जाऊ लागला तेव्हां त्या इन्स्पेक्टराला थोडासा त्याचा संशय आला. तिसऱ्या खेपेला मात्र दिनेशचंद्रबाबूला जातांना पाहून त्याचा संशय दृढ झाला. तो आपल्या जाग्यावरून उठला आणि बरोबर दोन पोलिस घेऊन दिनेशचंद्र बाबूसमोर जाऊन उभा राहिला.

" तूं कोण आहेस ? मला तुझा संशय आला आहे. उभा रहा. आम्हांला तुझी झडती घेतली पाहिजे. "

हें नवीन उपस्थित झालेलें नवें लचांड पाहून दिनेशचंद्र बाबू गोंधळून गेला. इन्स्पेक्टरसाहेबाची आज्ञा होतांच मग तेथें उशीर कसला ! पोलिस शिपायांनीं त्याला घेरलें आणि झडतीचें काम सुरू केलें. झडतींत एक घड्याळ, एक पत्र आणि कांहीं पैसे शिपायांनीं त्याच्या खिशांतून बाहेर काढले. सब इन्स्पेक्टरानें तें पत्र वाचून पाहिलें. परंतु त्या पत्राचा त्याला कांहींच अर्थ कळेना. तेव्हां तो म्हणाला, " ह्या पत्रावरून असें दिसतें कीं, तुम्हांला आज सुबोधचंद्र पाल नांवाच्या गृहस्थानें येथें बोलाविलें आहे आणि त्याप्रमाणें तुम्ही येथें आलां आहांत परंतु सध्यां तुम्हीं ज्या जागेसभोंवतीं फिरतां त्या जागेचा सरकारला संशय आल्यावरून तेथें सध्यां जप्ती बसली आहे, तेव्हां तुम्हाला सोडतां येत नाहीं. "

"पण साहेब, मी येथें सहज—"

"तुम्हांला जें कांहीं सांगावयाचें असेल तें उद्यां मॅजिस्ट्रेट साहेबांपुढें सांगा. सांगा तुमचें नांव काय?"

दिनेशचंद्र बाबूनें पुष्कळ रीतीनें त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. पोलिस सब इन्स्पेक्टरानें त्याचें नांव आपल्या नोटबुकांत लिहून घेऊन त्याला गेटावर नेण्याविषयीं शिपायांस सांगितलें.

काय बिचाऱ्याची ही दैना! दुसऱ्या दिवशीं दिनेशचंद्र बाबूला मॅजिस्ट्रेट साहेबापुढें उभें करण्यांत आलें परंतु त्या दिवशीं खटल्यांची गर्दी असल्यामुळें त्याचा खटला पुढल्या दिवसावर ढकलला. बिचाऱ्याला जाणखी एक दिवस गेटावर रहावें लगलें. पुनः दुसऱ्या दिवशीं त्याचा खटला मॅजिस्ट्रेट साहेबांपुढें उभा राहिला. उलटसुलट फेरतपासणी करून जंग जंग पछाडलें परंतु त्याच्यावर पिनलकोडाचें कोठलेंच कलम लागू पडेना, त्यामुळें नाइलाज होऊन दिनेशचंद्र बाबूला सोडून देणें मॅजिस्ट्रेट साहेबांना भाग पडलें. परंतु जातां जातां आपल्या खासगी पिनलकोडाचा एक स्पेशल नियम यांनीं बजावलाच. 'तुम्हीं पुनः अशा संशयाच्या कृत्यांत सांपडला तर खुब याद राखून ठेवा.'

ता. ५ ला आपण परत येतों असें घरीं सांगून ठेविलें होतें खरें परंतु मध्यंतरी हें अकल्पित लचांड उपस्थित झाल्यामुळें दिनेशचंद्र बाबूला पुण्यांत येण्याला दोन दिवस विलंब झाला. बिचाऱ्यानें ज्या कामाकरितां इतका त्रास भोगला तें काम जर झालें असतें तर त्या कामाबद्दल त्याला कांहींच वाटतें ना. परंतु तेंहि नाहीं. शेवटीं त्याला सुबोधचंद्र पालची भेट न होतां परत यावें लागलें. आपला पति सुखरूप परत घरीं आलेला पाहून शीतलेचा जीव शांत झाला. हेमचंद्र बाबू आपल्या पित्याच्या आज्ञेप्रमाणें तो परत घरीं येईपर्यंत दहा अकरा दिवस घराच्या बाहेर देखील पडला नाहीं. नलिनीला भेटण्याविषयीं त्याचें मन फार उत्कंठित झालें होतें, परंतु करतो काय पितृआज्ञा. पित्याच्या वचनांत तो गुंतला होता. घरांतून जातां येईना म्हणून चार दिवसांपूर्वी त्यानें नलिनीच्या नांवें एक पत्र अनाथबालिकाश्रमांत पाठविलें होतें परंतु अद्यापि त्या पत्राचें उत्तर आलें नव्हतें. त्यामुळें त्याच्या मनाला एकसारखी हुरहुर लागली होती. आपल्या पत्राच्या उत्तराला नलिनी इतके दिवस लावील असें त्याला वाटलें नव्हतें. शेवटीं चार दिवस लोटले

तेव्हां तिनें सांगितल्याप्रमाणें कोणी तरी तिचा पालक येऊन तिला घेऊन गेला असेल असें त्याला वाटूं लागलें. खरोखरच ती आपल्या पालकाबरोबर गेली असेल तर जाण्यापूर्वी निदान पत्रद्वारें आपणाला कळवावयाचें तरी होतें, असे विचार त्याच्या मनांत येतांच आपल्या घरचा पत्ता नलिनीला माहित नाहीं. याची त्याला आठवण झाली. अशी स्थिति जर होती तर तिनें पत्र लिहावें कसें ? आणि पाठवावें तरी कोठल्या पत्त्यावर ! आपण नलिनीला पत्ता दिला नाहीं त्याबद्दल हेमचंद्र बाबूला फार वाईट वाटलें. पित्याच्या आज्ञेवरून दहा अकरा दिवस आपणाला घराबाहेर पडतां येणार नाहीं असें जर त्याला पूर्वीच कळतें तर आपणाकडून शक्य तितकी व्यवस्था त्यानें करून ठेविली असती. परंतु आतां काय ? वेळ निघून गेली. तो आपल्या पित्याची रात्रंदिवस मार्गप्रतिक्षा करीत होता. शेवटीं एकदाचा त्याचा पिता दिनेशचंद्र बाबू घरीं आला.

दिनेशचंद्र बाबू कलकत्त्याहून आला त्याच दिवशीं संध्याकाळीं हेमचंद्र अनाथबालिकाश्रमांत नलिनीच्या भेटीकरितां गेला. बागेंत नेहमींच्या जागेवर नलिनी त्याला कोठेंच दिसेना. तेव्हांच त्याचें मन कचरलें. आपल्याला जो संशय आला तो खरा असें त्याला वाटूं लागलें. नलिनी कोठें आहे ? तिला कोणी नेलें ? केव्हां नेलें ? हें आश्रमांतील बाईला भेटल्याशिवाय कळण्याला दुसरा मार्गच नव्हता. त्यानें आश्रमांत जाऊन चौकशी केली तेव्हां व्यवस्थापक बाईनें ' नलिनी ता. ४ ला आपल्या पालका बरोबर गेली ' असें सांगितलें.

" तिच्या पालकानें तिला कोठें नेलें ? "

" तें कांहीं माहिती नाहीं. "

" तिनें आपला पत्ता दिला आहे काय ? "

" नाहीं. शिवाय तुमचाहि पत्ता माहित नसल्यामुळें तुमचें हें पत्र तुम्हीं नलिनीला लिहिलेलें, ती गेल्यामुळें परत तुम्हांला पाठवावयाचें राहिलें आहे. " असें म्हणून तिनें टेबलाच्या खणांतून पत्र काढून हेमचंद्र बाबूच्या स्वाधीन केलें.

" पत्ता देण्याविषयीं तुम्हीं तिला विचारलें—"

" हो, विचारलें तर ! परंतु तिचा पालक म्हणाला कीं, मी आजच फार लांबच्या प्रवासाहून आलों आहें. अद्यापि माझी नीट व्यवस्था लागलेली नाहीं. त्यामुळें मला पत्ता देतां येत नाहीं. म्हणून मी फार दिलगीर आहें. जागेसंबंधीं

माझी नीट व्यवस्था लागतांच आपणाला नलिनीचा पत्ता मी अवश्य कळवितों."

"बरं पण ती कोठें गेली असावी असा आपला तर्क आहे." थोड्या वेळानें हेमचंद्र बाबू म्हणाला.

"छे. यांत माझा कांहींच तर्क चालत नाहीं. तिचा पत्ता न मिळाल्यामुळें मलाहि फार वाईट वाटतें. कारण आश्रमांतील ती पहिली मुलगी. शिवाय इतकीं वर्षें राहून आश्रमाला तिचा कांहींही उपयोग न होतां ती गेली हें त्यांत विशेष. यंदा ती खात्रीनें प्रवेश परीक्षा पास झाली असती आणि त्यामुळें आश्रमाचें नांव झालें असतें."

हेमचंद्र बाबूची अगदीं निराशा झाली. तो आश्रमाच्या बाहेर पडला त्या वेळीं निशानाथ चंद्रमा बराच वर आला होता. चहूंकडे मनाला आल्हाद देणारा चंद्रप्रकाश पडला असून त्याच्या प्रकाशामुळें तारकांचें तेज मंद झालें होतें. सृष्टीची ही शोभा अत्यंत रमणीय असून ती कोणाही मनुष्याचें चित्त वेधणारी होती. परंतु ह्या सृष्टिसौंदर्याच्या मधुरतेचा उपभोग घेणें सगळ्यांच्याच सारख्या नशिबीं असतें असें नाहीं. सृष्टीच्या माधुर्याचा अनुभव हा नेहमीं चित्ताच्या स्थिरतेवर पुष्कळ अंशीं अवलंबून असतो. एखाद्या वस्तूच्या अवलोकनानें एखाद्याचें अंतःकरण प्रसन्न होतें आणि त्याच वस्तूच्या अवलोकनानें दुसऱ्या एखाद्याच्या अंतःकरणाला खेद होतो. आज हेमचंद्र बाबूची स्थिति तशीच झाली होती. त्यानें अशा प्रसन्न व चित्ताला आनंद देणाऱ्या चंद्रप्रकाशांत नलिनीबरोबर कितीएक संध्याकाळचे क्षण आनंदांत घालविले होते. सृष्टीची ती अत्यंत मनोहर शोभा नलिनी नसल्यामुळें आज त्याला तापदायक वाटत होती. सुंदर चंद्रप्रकाशहि त्याला काळोख्या रात्रीच्या घोर अंधकाराप्रमाणें वाटत होता. ही त्याची बाह्य स्थिति झाली. त्याचप्रमाणें त्याच्या हृदयरूपी सागरांत अनेक विचारांच्या लाटा उसळत होत्या.

चार दिवस तो रोज सकाळ-संध्याकाळ पोष्टाच्या बटवड्यावर अनाथबालिकाश्रमांत नलिनीचें पत्र आलें आहे किंवा काय हें पाहण्यासाठीं जाई. पण बिचाऱ्याची निराशा होई. आपणाला नलिनी खात्रीनें विसरली हाच विचार एकसारखा आतां त्याच्या मनांत येऊं लागला. आज तो नलिनीच्या पत्राबद्दल पूर्ण निराश झाला होता. बिचारा ह्या निराशेच्या विचारांत एकटाच भ्रमण करीत पर्वतीपर्यंत गेला. त्या वेळीं संध्याकाळ झाला होता.

---

बाबूला भेटण्याकरितां आलेला मनुष्य बंगाली भाषेंत म्हणाला, " दिनेशचंद्र बाबू आहेत का घरांत ? "

" होय आहेत. " शीतलेनें उत्तर दिलें.

त्या मनुष्याच्या पेहरावावरून तो मनुष्य दक्षिणेचा राहणारा दिसत नव्हता. त्यानें डोक्याला वेडावांकडा फेंटा गुंडाळला होता. त्यावरून त्याला फेंटा बांधण्याचा अभ्यास नसावा असें दिसत होतें. वयानें जरी तो उतार वयाचा दिसत होता तरी चालण्याच्या ऐटीवरून तो बराच चपळ असावा असें वाटे. त्यानें अंगांत गुडघ्याला लागेइतका लांब बनातीचा आंगरखा घातला होता. परंतु आंगरख्याच्या हातांत हात न घालतां फक्त वरचें बटन लावून घेतलें होतें. शीतलेनें ' होय ' म्हणतांच तो एकदम आंत शिरला. माडीवर दिनेशचंद्र बाबू वाट पहात होता. दरवाजा वाजतांच " यावें शशि—" इतके अर्धे शब्द त्यानें उच्चारले आणि आंत येणारा मनुष्य दृष्टीस पडतांच एकदम त्याची जिव्हा अडली. त्याच्या छातींत धक्का बसला. तो ज्याची वाट पहात होता तो कांहीं हा मनुष्य नव्हता हें खास. कारण दिनेशचंद्र बाबू त्याला पाहून कलाहीन् काळा ठिक्कर पडला. थोड्या वेळानें जणूंकाय झोंपेंतून जागे झाल्याप्रमाणें तो उठला आणि त्या मनुष्याला बसण्याकरितां त्यानें आपल्याजवळ खुर्ची दिली.

दोन तास त्यांच्या एकांतांत गोष्टी चालल्या होत्या. संध्याकाळच्या सुमारास तो मनुष्य दिनेशचंद्र बाबूच्या घरांतून बाहेर पडतांना दिसला. थोडें दूर जाऊन त्यानें एकदां मागें वळून पाहिलें. क्षणभर तेथें उभा राहून तो पुनः मागें फिरला अशा रीतीनें दिनेशचंद्र बाबूच्या घरापासून थोड्या अंतरावर त्यानें दोन चार येराझारा घातल्या. दहा मिनिटें झालीं असतील इतक्यांत दिनेशचंद्र बाबूच्या माडीवर मोठा आवाज झाला. तो ऐकतांच पुनः एकदां त्यानें मागें वळून पाहिलें आणि ' वचन तर पाळलें ' असें आपल्याशींच पुटपुटत झपझप् पावलें टाकीत क्षणांत तो मनुष्य दिसेनासा झाला.

माडीवर आवाज होतांच घरांतील सर्व नोकर चाकर घाबरून माडीवर धांवले. तेथील प्रकार फारच भयंकर होता. दिनेशचंद्र बाबू कोचाखालीं अस्ताव्यस्त पडला होता. त्याच्या छातींतून रक्ताचा प्रवाह सुरू असून सर्व कपडे, जाजम रक्तानें भरून गेलें होतें. जवळच एक पिस्तूल पडलें होतें.

तो डिटेक्टिव्ह घिरट्या घालतांना दृष्टीस पडूं लागला. कलकत्त्याहून परत आल्यापासून दिनेशचंद्र बाबू घरांतून मुळींच बाहेर पडला नाहीं. हेमचंद्र बाबू मात्र बाहेर हिंडता फिरता होता. परंतु त्याची वृत्ति कशी झाली होती ती वाचकांनीं गेल्या प्रकरणांत वाचलीच आहे. तो मात्र त्या डिटेक्टिव्हाच्या संशयाला बळी पडला. परंतु त्यापासून त्याला कांहींच निष्पन्न झालें नाहीं. एका अनाथबालिकेच्या प्रेमामुळें तो भ्रमिष्ट झाला आहे इतकेंच त्या डिटेक्टिव्हाला शेवटीं कळलें. चार दिवस पुण्यांत येऊन झाले तरी त्याला कोठल्याहि गोष्टीचा शोध लागेना, तेव्हां त्याचें मन जरा खट्टू झालें. परंतु निराश मात्र झालें नाहीं. डिटेक्टिव्ह लोक किती चेंगट असतात याची आपणाला कल्पनाहि होणार नाहीं.

कलकत्त्याहून आल्यापासून दिनेशचंद्र बाबू आपल्या प्रेमळ सुशील पत्नीसह गृहस्थाश्रमांतील अत्युच्च आनंदाचा मनसोक्त लाभ घेत होता. आपणावरील भयंकर संकट टळलें. आतां आपण खरे सुखी आहों असें त्याला वाटत होतें, परंतु दैवगति किती विचित्र आहे पहा ! प्रत्यक्ष मृत्यु आ पसरून आपल्या दरवाजाजवळ उभा आहे हें बिचाऱ्याच्या स्वप्नीं देखील नव्हतें.

' मनसा चिंतयेत् एकं देवो अन्यत्र चिंतयेत् ' परमेश्वरानें मनुष्यप्राण्यांत केवढें व्यंग ठेविलें आहे कीं, त्याला आपल्या भवितव्यतेची गति कळूं नये. या क्षणीं आपण बोलत आहों पण पुढील क्षणीं आपलें काय व्हावयाचें आहे याचें ज्ञान नसल्यामुळें दिनेशचंद्र बाबूप्रमाणें आपण सुखी असें समजून अज्ञानाच्या भरांत भावी आशेच्या इमारतीवर इमारती उठवीत असतों. पण हाय हाय ! एका निमिषार्धांत ती स्थिति पालटते. आणि भावी आशेच्या हवेंत बांधलेल्या इमारतीचा चक्काचूर होऊन जातो.

दुपारच्या प्रहरीं जेवणखाण आटोपून दिनेशचंद्र बाबू शीतलेसह आनंदांत गोष्टी बोलत बसला होता इतक्यांत एक नोकर आंत आला आणि म्हणाला " बाबूसाहेबांस भेटण्याकरितां कोणीं मनुष्य खालीं आला आहे. " कोण आलें आहे तें दिनेशचंद्राला माहिती होतें. तो पत्नीकडे वळून म्हणाला. " तूं जरा खालीं जा. कांहीं वेळानें मी तुला वर बोलावीन. "

पतीची आज्ञा होतांच शीतला खालीं गेली. तिला पाहतांच दिनेशचंद्र

# ५ वचन तर पाळलें

प्लेगच्या जुलमी नियमामुळें कित्येक तरुण मंडळीचीं माथीं भ्रणाणून त्यांनीं रँडसाहेबाचा १८९७ त खून केला. तेव्हांपासून महाराष्ट्राचें वातावरण बिघडलें. सरकारच्या वृत्तीस महाराष्ट्रीय जनाविषयीं संशय पिशाचिकेनें पछाडलें. त्याचें पर्यवसान आतां किती भयंकर झालें आहे तें येथें देण्याची मुळींच जरूरी नाहीं. परंतु ह्या पर्यवसानाविषयीं ‘ लेखक व वक्ते हे साहसिक कर्मास उत्तेजन देतात ’ हें सरकारनें केलेलें विधान किती आश्चर्याचें आहे बरें ! दुर्दैव बिचाऱ्या त्या लेखक आणि वक्त्यांचें ? परंतु इतकी गोष्ट खरी कीं सांप्रतची चळवळ ही कांहीं विवक्षित घडलेल्या कारणांची कृती होय. असें कोणीहि समंजस मनुष्य कबूल करील. असो. माणिक स्ट्रीटमध्यें सुशील छापखान्याच्या आंगणांत बांब फेंकणाराचा अद्यापि कांहीं पत्ता लागला नव्हता. सर्वत्र त्या बांबमुळें एकच गडबड उडाली होती. बांब फेकणाराचा अद्यापि कांहींच तपास लागत नाहीं हें पाहून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पोलीसखात्याला सणसणीत दपटशा देण्यांत आला. तेव्हां मोठमोठे नांवाजलेले पोलिस, गुप्त पोलिस गुन्हेगार पकडण्याकरितां काय क्लृप्ति लढवावी याबद्दल आपलीं विशाल डोकीं खाजवूं लागले.

बांब गोळा फेंकला त्या दिवशीं सायंकाळीं एक मनुष्य माणिक स्ट्रीटमध्यें घिरट्या घालतांना पोलिसनें पाहिला होता आणि संशयावरून त्याला मॅजिस्ट्रेटपुढें उभेंहि करण्यांत आलें होतें असें एका विशाळ डोक्याच्या डिटेक्टिव्हला कळलें—मग काय ! त्याचें मन सुतावरून स्वर्गाला भराभर चढूं लागलें. जो मनुष्य सायंकाळीं माणिकस्ट्रीटमध्यें घिरट्या घालीत होता. त्याचा त्या बांबप्रकरणांत मुळाशीं कांहींतरी खात्रीनें संबंध आहे असें त्याला वाटलें. ताबडतोब त्यानें कोर्टांत जाऊन त्या मनुष्याचा सर्व पत्ता लिहून घेतला.

आपल्यामागें एक पिशाचमनुष्य लागलें आहे. याची बिचाऱ्या दिनेशचंद्र बाबूला कल्पनाहि नव्हती. विश्राम बागेजवळ दिनेशचंद्र बाबूच्या घराजवळ

असा हा हृदयविदारक देखावा पाहून शीतलेनें भयभीत होऊन मोठ्यानें किंकाळी फोडली आणि आपल्या पतीच्या मृत देहावर बेशुद्ध होऊन पडली. थोड्या वेळापूर्वी आनदानें गजबजलेल्या त्या घरांत घटकेंत सर्वत्र शोकाचें आणि दुःखाचें साम्राज्य झालें. हां हां म्हणतां ही बातमी पोलिस गेटावर जाऊन धडकली. अशा अस्वस्थतेच्या दिवसांत दिवसाढवळ्या पुण्यांत एका बंगाली गृहस्थाचा खून ! मग काय ? सर्व पुणें शहर गजबजलें !

पोलिस सुपरिंटेन्डन्टच्या काळ्या फौजेनें दिनेशचंद्र बाबूच्या घरांत एकच धुमाकूळ मांडली. शीतलेला दिनेशचंद्राच्या प्रेतावरून उचलून दुसऱ्या खोलींत नेलें. सर्व घरभर पोलीस नाचूं लागले. दिवाणखान्यांत असलेल्या चांगल्या चांगल्या वस्तू आपल्या स्थानाला कंटाळून त्यांच्या काळ्या कोटाच्या आंतील खिशांत जाऊन लपून बसूं लागल्या. दोन तासांनीं पोलिससाहेब मजकुरांचा रिपोर्ट तयार झाला. कोरोनर साहेब येईपर्यंत दिनेशचंद्र बाबूचें प्रेत ज्या स्थितींत होतें त्याच स्थितींत, त्या ठिकाणीं ठेविलें होतें. रात्रीं आठ वाजतां कोरोनर साहेब सरकारी डॉक्टर वगैरे अंमलदारांची तपासणी झाली. अद्यापि हेमचंद्र बाबू परत घरीं आला नव्हता. आपल्या घरीं कांहींतरी अनिष्ट प्रकार झाला आहे याची बिचाऱ्याला वार्ताहि नव्हती. तो नलिनीच्या विचारांत पर्वतीवर भ्रमण करीत होता. परत येत असतां वाटेंत ‘ आज एका बंगाली बाबूचा खून झाला ’ असें त्यानें येणाऱ्या जाणाऱ्यांच्या तोंडून ऐकलें. परंतु नलिनीच्या विचारांत त्याचें डोकें गुंतल्यामुळें दुसऱ्या विचारांना त्याच्या डोक्यांत जागा मिळेना. आज त्याची इतकी निराशा झाली होती कीं, नलिनीच्या विचारांनीं त्याला पूर्ण वेडा बनविलें. भ्रमिष्टासारखा तो एकदाचा घराजवळ आला तों त्याच्या खांद्यावर एका पोलिस शिपायानें हात ठेऊन म्हटलें “ महाराज, कृपा करून पांच मिनीटें मजबरोबर चला. ”

“ कुठें ? ”

“ येथें जवळच ज्युरी भरली आहे. आणि त्यांत एका मनुष्याची उणीव आहे. ”

“ ज्युरी ! कशाबद्दल ? ”

“ विश्राम बागेजवळ रहात असलेल्या बंगाली बाबूचा आज पांच वाजतां खून झाला—”

" काय ! खून !—विश्राम बागेजवळ—"

हेमचंद्र बाबूनें वरील शब्द भयभीत होऊन अर्धवट उच्चारले आणि तडक घराकडे धांव ठोकली. त्यावेळीं त्याच्या स्थितीचें वर्णन करणें अगदीं अशक्य आहे. तो एकदम वाड्यांत शिरला त्यावेळीं वाड्यांत सर्वत्र पोलिस आणि प्रेक्षकांची धांदल उडाली होती. त्याला असा बावरले आंत प्रवेश करतांना पाहून पोलिसनें मज्जाव केला; त्यांत कांहीं विशेष नवल नाहीं ! आंत सोडण्याविषयीं त्यानें पोलिसची कितीतरी मनधरणी केली पण अशा वेळीं शिपायाची कोण मिजास ! अडलेला मनुष्य पाहिला—मग तो कितीहि मोठा—श्रीमंतीनें हुद्यानें, किंवा वयानें—असो त्याला ते आपल्या सोटा पट्याच्या अधिकारावर मुद्दाम जास्त अडवितात. परंतु हें कितपत ' लांच, दक्षिणा आणि तत्क्षणा ' हातीं पडेपर्यंतच. असो. आपणाला आंत जाण्याला मिळत नाहीं हें पाहून बिचारा हेमचंद्र बाबू अगदीं रंजीस झाला. इतक्यांत एक पोलिस कॉन्स्टेबल त्याच्या जवळून जाऊं लागला. त्याच्याकडे दीनवाण्याप्रमाणें पाहून तो म्हणाला. " साहेब कृपा करून मला आंत जाऊं द्याल तर मोठी मेहरबानी होईल."

" आंत ! काय काम आहे ? "

" साहेब माझ्या बापाला मला पहावयाचें आहे. "

" कुठें आहे तुझा बाप ? "

" त्याचाच खून झाला आहे. "

कॉन्स्टेबलनें त्याला कोरोनर पुढें उभें केलें.

दोन चार प्रश्न विचारून कोरोनर साहेबानें त्यास आंत जाण्याची परवानगी दिली. थोड्या वेळानें जुरीला सुरवात झाली. शीतलेला पुढें आणण्याचा हुकूम झाला. नुकतीच ती बिचारी शुद्धीवर आली होती.

" बाई तुमच्या पतीच्या मृत्युविषयीं तुम्हांला जी जी खरी हकिकत माहीत असेल ती सांगा !"

कोरोनरनें विचारलेला प्रश्न तिनें ऐकला असेल काय ? आपल्या पतीच्या मृत्यूची हकिकत ती काय सांगणार बरें ? मृतपतीजवळ जाऊन मोठ्यानें शोक करून आपलें हृदय हलकें करावें असें तिला वाटत होतें परंतु जुरीचें काम आटोपल्याशिवाय तिला आंत जाऊं देतो कोण ? त्यामुळें एकत

वैधव्यानलाचा भडका व त्यावर विटंबनारूपी ज्युरीच्या जबानीचें तैल! त्यायोगें बिचाऱ्या शीतलेचें दुःखित हृदय पोळून गेलें. ती दुःखातिशयानें एखाद्या पुतळीप्रमाणें स्तब्ध उभी होती. कोरोनरनें विचारलेला प्रश्न तिनें ऐकला देखील नाहीं. तिच्या नेत्रांतून सारख्या दुःखाश्रूंच्या धारा चालल्या होत्या. दोन चारदां कोरोनरनें तोच तोच प्रश्न तिला केला; परंतु त्याच्या प्रश्नाला उत्तर मिळेना. तेव्हां तिची ती दयार्द्र स्थिति पाहून त्या समजूतदार कोरोनरनें तिची जबानी शेवटीं घेण्याचें ठरविलें आणि घरांतील एक एक नोकर जबानीकरितां पुढें आणण्याचा हुकूम केला. सर्वांच्या जबानींत सारख्याच गोष्टी बाहेर आल्या. त्यांपैकीं शीतलेची शेवटीं घेतलेली एकच जबानी येथें देऊन हें प्रकरण संपवूं.

"बाई, जो मनुष्य तुमच्या पतीला भेटण्याकरितां आला होता त्याबद्दल कांहीं जास्त हकिकत तुम्ही सांगू शकाल काय?"

"नाहीं."

"त्या मनुष्यानें तुमच्या पतीबरोबर केलेलें भाषण तुम्ही ऐकलें काय?"

"नाहीं. तो येण्यापूर्वी पतीनें मला खालीं जाण्यास सांगितलें."

"तो मनुष्य किती वेळ घरांत होता?"

"जवळ जवळ दोन तास."

"जातांना त्याला तुम्हीं पाहिलें काय?"

"होय."

"तो मनुष्य निघून गेल्यावर पतीबरोबर तुमचें काय भाषण झालें?"

"त्यानंतर आमची भेट झाली नाहीं. खालीं मी पतीकरितां चहा तयार करीत असतां एकाएकीं मोठा आवाज झाला. तेव्हां मी चहा टाकून तशीच धांवत वर गेल्यें. तेथील तो भयंकर प्रकार पाहून मला एकदम चक्कर आली."

"ह्या पूर्वीचा तुमच्या पतीचा दिनक्रम तुम्हीं सांगू शकाल काय?"

"होय, एक महिन्यापूर्वी व्यापारांत त्यांना बरीच खूट आली असें ते म्हणत होते. त्यावेळेपासून नेहमीं ते उदास असत."

"ह्या आठ दहा दिवसांत तुमच्या पतीविषयीं विशेष सांगण्यासारखी कांहीं हकीकत आहे काय?"

" बांकपूरच्या एका व्यापाऱ्याला भेटण्याकरितां ते एकदां कलकत्त्यास गेले होते. "

" तुमच्या घरांत पिस्तुलाशिवाय दुसरीं काय हत्यारें आहेत ? "

" कांहीं नाहीं. "

" तें पिस्तूल घरांत किती दिवस आहे ? "

" तें पिस्तूल मी आजच पाहिलें आमच्या येथें कुठलेंच हत्यार नाहीं. "

" तुमचा पती बांकपुराहून केव्हां परत आला ? "

" आज सहा दिवस झाले. "

शीतले नंतर हेमचंद्र बाबूची जबानी झाली.

" व्यापारांत तोटा आल्याबद्दल तुमच्या पित्यानें कधीं दुःखोद्गार काढले होते काय ? "

" होय. "

" त्यामुळें ते आपल्या जिवाला त्रासले आहेत असें तुम्हांला कधीं वाटलें काय ? "

" नाहीं. ते आपल्या जिवाला बिलकुल त्रासले नव्हते आणि त्यांच्या मृत्यूला कारण झालेलें पिस्तूल तेंहि आमचें नाहीं. तेव्हां मला वाटतें त्यांचा खू—"

" तुम्हांला काय वाटतें तें मी विचारीत नाहीं. " असें म्हणून कोरोनरनें पिस्तूल पुढें आणण्यास पोलिसला सांगितलें.

" हें कोणाचें आहे तुम्हीं ओळखूं शकाल काय ? " पिस्तूल पुढें करून कोरोनर म्हणाला.

" नाहीं हें पिस्तूल माझ्या माहितीचें नाहीं. "

" तुम्हांला दुसरी कांहीं माहिती असेल ती सांगा ? "

कोरोनरला कळली होती त्यापेक्षां जास्त माहिती हेमचंद्र बाबूकडून मिळाली नाहीं. रात्र बरीच झाली हें पाहून कोरोनरनें सर्जनचा रिपोर्ट जुररना वाचून दाखविण्यास सुरवात केली—' गोळी बरोबर छातींत घुसून पाठीमागें निघाली. छातीला तीन इंच घेराची जखम पडली आहे. गोळी लागतांच प्राणवायु निघून गेला ' त्यानंतर पोलिसचा रिपोर्ट वाचण्यांत आला. ' एकंदर गोष्टी लक्षांत आणल्यावर मयतानें आत्महत्या केली असें म्हणतां येत नाहीं. परंतु

उलट बाजूनें व एकंदर बाह्य पुराव्यावरून मयतानें स्वतःच्या हातानेंच तें पिस्तूल आपल्या छातींत झाडलें आहे.'

पोलिसचा रिपोर्ट वाचून कोरोनरनें पोलिस साहब मजकुरांस प्रश्न केला,

"हा आपला दुहेरी रिपोर्ट उपयोगी नाहीं. ह्या रिपोर्टापासून जुरर्सची समजूत पडणार नाहीं. रिपोर्टांत एकाच गोष्टीचा उल्लेख करा."

पोलिस मजकुरानें आपल्या रिपोर्टामधलें पहिलें वाक्य खोडून 'मयतानें स्वतःच्या हातानेंच तें पिस्तूल आपल्या छातींत झाडलें आहे' हें एकच वाक्य ठेवलें, तें पाहून कोरोनर म्हणाला, "आत्महत्या केली नाहीं हें जर आपलें मत आहे तर खुनी कोण ? हा एक प्रश्न तुमच्यापुढें आहे."

"होय. हा एक प्रश्नच आहे खरा !"

नंतर कोरोनरनें जुररपुढें सर्व गोष्टींचा पूर्ण खुलासा केला. पंचांनीं 'आत्महत्या करून मेला' असा आपला अभिप्राय दिला.

# जाजमाखालीं सांपडलेलें पत्र

गेल्या प्रकरणांत घडलेल्या गोष्टीला आजचा तिसरा दिवस. दिनेशचंद्र बाबूच्या मृत्यूबद्दल निरनिराळ्या वर्तमानपत्रांत निरनिराळे रिपोर्ट येऊं लागले. त्यांपैकीं प्रसिद्ध 'गपाटा गॅझेट' मध्यें आलेली हकीकत मुद्दाम वाचकांकरितां पुढें देतों—

'पुण्यांत ता० १३ मे १९०८ रोजीं विश्राम बागेजवळ राहणाऱ्या बाबू दिनेशचंद्र बोसच्या मृत्यूबद्दल आपच्या खास बातमीदाराकडून असें कळतें कीं, कलकत्यात बांकपूर येथें मांणिकस्ट्रीटमध्यें बॉंबगोळे व इतर ज्वालाग्राही पदार्थ करण्याचा कारखाना फार गुप्तरीतीनें कांहीं मंडळींनीं स्थापन केला होता. त्या कारखान्याचा थोड्या दिवसांपूर्वी पोलिसनें मोठ्या चातुर्यानें शोध लाविला. पोलिसला आपल्या कृष्णकारस्थानाच्या कारखान्याचा तपास लागला आहे असें त्या मंडळींना कळतांच त्यांनीं तेथल्या सर्व वस्तू मोठ्या हुषारीनें लांबविल्या. त्यांना हुलकावणी दाखविण्याकरितां त्या कारखान्या-जवळ असलेल्या सुशील छापखान्यावर वारंट काढून गुप्तरीतीनें बॉंब तयार करण्याच्या कारखान्याचा शोध चालविला, परंतु त्या कामांत पोलिसला यश आलें नाहीं. ह्या बॉंब कारखान्याचा मुख्य चालक वरील बंगाली गृहस्थ होता. आपला कोणाला संशय येऊं नये म्हणून तो नेहमीं पुण्यांत रहात असे. पुण्यांतील बडी बडी मंडळी त्याला अनुकूल होती असें म्हणतात. नेमलेल्या दिवशीं तो बांकपुरास गेला होता परंतु पोलिसच्या पहाऱ्यामुळें त्याला आंत जातां येईना. त्याच्याच कटांतील एकानें बॉंबगोळा फेंकला परंतु अद्यापि त्या मनुष्याचा शोध लागला नाहीं. आपल्या कारखान्याची गुप्त गोष्ट फुटली हें पाहून वरील बंगाली गृहस्थ घाबरला आणि आपला जीव बचावण्याकरितां त्यानें सर्व खरी हकिकत मॅजिस्ट्रेटपुढें जाऊन सांगितली. असें त्याच्या कटांतील मंडळींना कळतांच त्यांच्यापैकीं एकानें पुण्यांत जाऊन त्याचा खून केला.'

वरील हकिकतींत कितपत तथ्यांश आहे हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. कित्येक वर्तमानपत्रकर्त्यांना राईचा डोंगर कसा करावा हें जणूं

बाळकडूच मिळालेलें असतें, एखाद्या ठिकाणीं सभा भरली आणि तेथें पांच पंचवीस मंडळी गोळा झाली असली तर त्या सभेचा रिपोर्ट खालील प्रमाणें प्रसिद्ध व्हावयाचाच —' * * येथें जंगी सभा भरली होती. * * यांनीं अध्यक्ष-स्थान सुशोभित केलें होतें. हिंदु व मुसलमान मिळून दोन हजार श्रोत्यांसमोर रा. * * यांचें उत्तम व्याख्यान झालें. इ यादि, इत्यादि. आमच्या खास बातमीदारांकडून समजतें. वाचकहो ! असा रिपोर्ट लिहीण्यापासून फायदा होतो कीं तोटा होतो हें ठरविणें मी तुमच्यावरच सोंपवितों.

'गपाटा गॅझेट' मध्यें प्रसिद्ध झालेली हकिकत वाचून हेमचंद्र बाबू आणि शीतला आश्चर्यचकित झाले. दुसऱ्या दिवशीं शीतला एकटीच अश्रू गाळीत बसली असतां हेमचंद्र बाबू तिच्या जवळ जाऊन म्हणाला, "काल वाचलेल्या हकीकतीवरून मला कांहींच सुचेनासें झालें आहे. गॅझेटमध्यें प्रसिद्ध झालेल्या हकिकतीचा पुरा छडा लावून प्रसिद्ध झालेली हकिकत खोटी ठरल्यास त्या पाजी रिपोर्टरवर फिर्याद करावी, असें मला वाटतें."

शितलेचेंहि मत त्याच्याच प्रमाणें पडलें. आपल्या पतीचें नांव अशा रीतीनें वाईट मंडळींत गोंवल्याबद्दल तिलाहि फार वाईट वाटत होतें. बराच वेळ दोघांच्या गोष्टी झाल्यावर हेमचंद्र बाबू म्हणाला, "माई, माझा बेत असा आहे कीं, मुंबईत रघुनाथराव नांवाचा एक खासगी पण फार प्रसिद्ध गुप्त पोलिस आहे. त्याचा ह्या बाबतींत सल्ला घ्यावा. आणि माझी खात्री आहे तो खुनी मनुष्याचाहि पत्ता लावील; पण तुझा रुकार —"

"माझा रुकार काय ! त्या मेल्या चांडाळाचा पत्ता लावून मेल्याचं निसंतान करावं असं मला वाटतं—"

"मग मी आजच जाऊन रघुनाथरावाला भेटतों तर—"

"पण जाण्यापूर्वी तुझ्या नांवाचें तें सील केलेलें पत्र तूं वाचून त्यांत कांहीं गोष्टीचा खुलासा आहे का तें पहावेंस अशी माझी इच्छा आहे—"

'माई, खरं विचारशील तर तें पत्र मुळीं वाचूंच नये असें मला वाटतें."

"कां कां पण!" असें म्हणून शीतलेनें पेटींतून एक मोठें कागदाचें सील केलेलें पुडकें बाहेर काढलें. पुडक्यावर हेमचंद्र बाबूचें नांव लिहिलें होतें. कांपऱ्या हातानें हेमचंद्र बाबूनें शीतले कडून तें पुडकें घेतलें. क्षणभर त्या पुडक्याकडे त्यानें पाहिलें. आंत काय लिहिलें आहे तें जाणण्याची

शीतलेला फार उत्कंठा लागली होती. हेमचद्र बाबू सील केव्हां फोडतो असें तिला झालें होतें परंतु हेमचद्र बाबूची स्थिति तशी नव्हती. आपल्या हातांतील पुडकें आपल्या मनाला चिंतेंत टाकील असें त्याला वाटत होतें. आपण सध्यां तें पुडकें उघडूं नये असेंहि त्याचें मन त्याला सांगूं लागलें.

"हेमचद्रा, फोड ना सील, त्यांत काय लिहिलें आहे तें ऐकण्याची मला फार—"

"माई काय असेल तें असो. आतां हें पुडकें फोडूं नये असें माझें मन मला सांगतें."

शीतलेचा जास्त आग्रह होतांच हेमचंद्र बाबूला तें पुडकें फोडावें लागलें. सील फोडतांच आंतून त्यानें एक बँकबूक आणि उईल बाहेर काढलें. पुनः त्याचें मन चलविचल झालें. उईलपत्र वाचूं नये असेंच त्याचें मन त्याला सांगत होतें. आपल्या मनांत असे कां विचार येतात तेंच त्याला कळेना. शेवटीं त्यानें उईलचें सील फोडलें. तें उईलपत्र अगदीं थोडक्यांत लिहिलें होतें. फक्त तीनच कलमें! पहिल्या कलमान्वयें एकंदर ७० हजार रुपयांच्या इस्टेटीचा मालक हेमचंद्र बाबू झाला. शिवाय शीतला जिवंत असेपर्यंत तिच्या सर्व इच्छा हेमचंद्र बाबूनें पुऱ्या कराव्या आणि तिनें त्याच्याच आश्रयाखालीं रहावें. दुसऱ्या कलमांत—'श्रीमती रोहिणीचंद्रकिरण राय या कुमारिकेबरोबर हेमचंद्र बाबूनें लग्न करावें, आणि तिसऱ्यांत 'वरील दोन इच्छा पाळाव्या हीच एक तिसरी इच्छा' असें होतें.

उईलपत्र वाचतांच तें तसेंच हेमचंद्र बाबूच्या हातून गळून खालीं पडलें. तें वर न उचलतां एक हात कपाळावर देऊन त्या पडलेल्या उईलकडे पहात तो तसाच चिंताक्रांत बसला. क्षणभरानें तो हळू हळू सुस्कारा टाकूं लागला. उईलांत असें काय लिहिलें आहे कीं त्यामुळें हेमचंद्र बाबू इतका चिंताक्रांत झाला याची शीतलेला कांहींच कल्पना होईना. एकंदर तीन कलमें तीं देखील अगदीं साधीं. असें असून तीं वाचून त्याची अशी कां स्थिती झाली. माझ्या नांवें कांहींच रकम ठेविली नाहीं असें वाटून त्याला वाईट वाटत असेल काय? होय! असेंच असावें असें वाटून ती म्हणाली, "हेमचंद्रा त्यांत तुला इतकं वाईट तें काय वाटतं! माझ्या नांवें कांहींच लिहून ठेविलें नाहीं त्याचा मला कांहींच विषाद नाहीं. तुला सर्व इस्टेट दिली आहे त्यांत मला आनंदच आहे. उगाच कां असें वेड्यासारखं करतोस!"

" छे छे, त्याबद्दल मला कांहींच वाटत नाहीं. सर्व इस्टेट जरी पिताजींनीं धर्मार्थ दिली असती तरी मला वाईट वाटतें ना. पण हें दुसरें कलम—माझ्या सर्व सुखांचा शेवट—हाय हाय ! आतां नलिनीची आशा—"

" नलिनी ! नलिनी कोण " आश्चर्यचकित होऊन शीलतेनें विचारिलें. हेमचंद्र बाबूचें एखादें प्रेमस्थान असेल अशी तिला कल्पनाहि नव्हती. ती गोंधळल्यासारखी होऊन त्याच्याकडे पाहूं लागली. हेमचंद्र बाबू खुर्चीवर डोकें टेंकून स्तब्ध पडला. त्याच्या नेत्रांतून अश्रू वाहूं लागले. त्यानें नेत्र मिटून घेतले तेव्हां त्याच्यापुढें नलिनीची मूर्ति येऊन उभी राहिली. अशा रम्य रत्नाला सोडून द्यावें लागणार एक किंवा आपल्या प्रियकर पित्याचें वचन तरी मोडावें लागणार एक ! असे विचार त्याच्या मनांत येऊं लागले. शीतलेनें पुनः तोच प्रश्न केला; तेव्हां तो म्हणाला—" माई काय सांगूं ग ! तिच्या सारखी सुस्वभावी सुंदर मुलगी कोठेंहि सांपडावयाची नाहीं. तिची हकिकत ऐकून तुला देखील तिची कींव येईल. "

" पण ती कोण ? कोणाची मुलगी ? राहते कुठें ? "

" तें मला कांहींच माहित नाहीं "

" म्हणजे ! ती कोण हें देखील तुला माहीत नाहीं ? "

" थोड्या दिवसांपूर्वी ती अनाथबालिकाश्रमांत होती. दोन वर्षांपूर्वी तिची माझी ओळख झाली. तिचा सर्व इतिहास चमत्कारिक आहे. परंतु माझी खात्री आहे. ती कोणा तरी चांगल्या थोरामोठ्याच्या घराण्यांतील असावी. "

बराच वेळ विचार करून शेवटीं शीतला म्हणाली, " ती कितीही सुंदर असली—कितीहि श्रीमान् घराण्यांतली असली तरी तुझ्या पिताच्या इच्छे-प्रमाणें तिचा नाद सोडून देऊन उईलांत लिहिलेल्या मुलीबरोबरच तुला लग्न केलं पाहिजे आणि त्यांची शेवटची इच्छाही तीच आहे. "

हेमचंद्र बाबू स्तब्ध बसला होता. त्यावेळीं त्याच्या मनांत काय विचार चालले होते तें समजणें कठीण होतें. आपल्या इच्छेआड आपला पिता कधींहि येणार नाहीं अशी त्याची पक्की खात्री असून शेवटीं त्याच गोष्टींत त्याची निराशा झाली ह्या परतें आणखी दुर्दैव तें कोणतें ! तो क्षणभर टेबलाकडे पाही, क्षणभर खुर्चीकडे पाही, क्षणभर खिडकीकडे पाही, अशी त्याची दृष्टी प्रत्येक वस्तूवर निरीक्षण करूं लागली. जणूं काय आपल्या मनांत

चाललेल्या विचारांना तो त्या प्रत्यक्ष वस्तूकडून अनुमोदनच घेत होता. इतक्यांत खालीं पसरलेल्या जाजमाचें एक टोंक वाऱ्यानें थोडें बाजूला झालें. साहजिक त्याची दृष्टी त्या जाजमाच्या टोंकाकडे गेली. पुन्हां वाऱ्यानें तें टोंक थोडें जास्त बाजूला झालें; तों त्या खालीं कांहीं तरी कागद असावा असा त्याला भास झाला. इतक्यांत पुन्हां वाऱ्यानें तें जाजम पूर्ववत् केलें. वाऱ्यानें ह्या साहजिक घडलेल्या कृतीचें त्याला क्षणभर कौतुक वाटलें. मुद्दाम आपणास तो कागद दाखवावा म्हणून यक्षिणीनें कांडी फिरविली कीं काय ? असें वाटून खरोखरच त्याच्या खालीं कागद आहे किंवा काय तें पाहण्यासाठीं उठला. जाजम बाजूला सारतांच तेथें एक कागद त्याच्या दृष्टीस पडला. त्यानें घाई घाईनें तो कागद उचलला. तो कागद एक पत्र होतें. पत्र आहे असें पाहतांच शीतलाहि उठून त्याच्या जवळ गेली.

" लागला पत्ता—" पत्र वाचतां वाचतां मध्येंच तो मोठ्यानें म्हणाला.

" खरं कीं काय ? "

" होय. हें पहा मी वाचतों " असें म्हणून तो तें पत्र वाचूं लागला—

'सावध रहा. बारा वर्षांचें वचन पुरे करण्याचा संकटाचा दोनदां टळलेला दिवस जवळ येऊन ठेपला. कारण * * येथें आला आहे. सावध रहा. ता. १३ ला मी येऊन भेटतों. घरांतून कोठल्याहि सबबीवर बाहेर जाऊं नको सावध रहा.

" मग हाच मनुष्य तो. ह्याच मेल्याचें तें काम—"

" माई, आतां अगदीं खात्रीनें पत्ता लावूं. इतकी माहिती मिळाल्यावर माझी खात्री आहे, रघुनाथराव हां हां म्हणतां सर्व तपास लावील. मग मला मुंबईंत जाण्याचें कांहीं कारण उरलें नाहीं. तार करून त्याला येथेंच बोलावूं म्हणजे त्या दिवशीं येणाऱ्या मनुष्याचें तूं स्वतः त्याला नीट वर्णन देऊं शकशील—काय ! "

परंतु शीतलेचें त्याच्या भाषणाकडे लक्ष्य होतें कोठें ? वरील पत्रामुळें तिच्या पुढें पतीच्या खुनाचा तो भयंकर देखावा जणूं तो आतांच घडला आहे असा उभा राहिला. ती वेड्यासारखी आजूबाजूला पाहूं लागली. आपल्या पतीचा खून होऊन तो अस्ताव्यस्त ज्या जाजमावर पडला होता त्याच जाजमाखालीं त्याचा खून करणाऱ्या खुनी मनुष्याचें पत्र, त्याच्या खुनी दुष्ट कृत्याची साक्ष देण्यासाठीं, आपला मृत पती रक्तानें भरलेल्या आपल्या हातानें आपणास दाखवीत आहे

असें वाटून तिच्या अंगावर भीतीचे शहारे आले. ती भीतीनें कांपूं लागली. हेमचंद्र बाबूनें तिच्याकडे पाहतांच तिच्या स्थितीवरून तिच्या मनांत चाललेले विचार त्यानें ओळखले. क्षणभरानें त्याचीहि तिच्याप्रमाणेंच स्थिति झाली. त्या दिवसाचा तो दारुण आणि दुःखदायक देखावा त्याला दिसूं लागला. आपल्या प्रियकर पित्याला मारण्याचें अघोर कृत्य ज्या दुष्टानें केलें त्याला यथायोग्य प्रायश्चित्त मिळालेंच पाहिजे, मग त्याकरितां हवा तो प्रयत्न करावा लागला, कितीहि दगदग, कितीहि त्रास सोसावा लागला तरी सोसण्यास यत्किंचितहि माघार घ्यावयाची नाहीं असा त्यानें निश्चय केला. मनुष्याचें हृदय ही खरोखरच एक आश्चर्यकारक वस्तु आहे. ह्या हृदयांत अहर्निश हजारों व्यापार सुरू असतात; त्यांचा विचार केला म्हणजे मनास अतिशय विस्मय वाटतो. मनुष्याच्या हृदयाचा सर्व बाजूंनीं परिपूर्ण विचार करणें हें बुद्धीसहि अशक्य आहे. मनुष्य हा भवितव्यतेचा बंदा गुलाम आहे. भवितव्यतेचे तरंग जसे त्याच्या हृदयांत उठतील त्याप्रमाणें वर्तण्यास तो प्रवृत्त होतो. हेमचंद्राचें हृदय जें क्षणापूर्वीं उईल वाचून नलिनीविषयीं निराशेनें शोकाच्या भाराखालीं दडपून गेलें होतें, त्याच हृदयांत आतां पित्याच्या खुनाबद्दल सूड उगविण्याची भावना उत्पन्न झाली. आतां त्याची मुद्रा पूर्ण निश्चयी दिसूं लागली. दिनेशचंद्र बाबूच्या खुनाचें त्यांना जें गूढ पडलें होतें, तें सोडविण्याचें त्याच्या हातीं एक साधन आलें. त्यानें तें पत्र पूर्ववत् बंद करून खिशांत टाकलें.

संध्याकाळ झाला होता. हेमचंद्र बाबू कपाळावर हात देऊन दिवाणखान्यांत एका आरामखुर्चीवर विचार करीत बसला होता. बाहेर गाडीचा आवाज होतांच तो वरचेवर दरवाजाकडे पाही. परंतु बागेच्या दरवाजाजवळ गाडी उभी न रहातां पुढें जाई. आणि त्यामुळें त्याची निराशा होई. त्या त्याच्या वर्तनावरून तो कोणाची तरी वाट पहात होता असें दिसतें. रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या गाड्यांनीं त्याची पुष्कळ वेळ निराशा केली. परंतु शेवटीं एक गाडी खरोखरच त्याच्या बागेच्या दरवाजाजवळ उभी राहिली याही खेपेस आपली निराशा होईल म्हणून त्यानें मुद्दाम दरवाजाकडे पाहिलें नाहीं. परंतु तो ज्याची वाट पहात होता तो गृहस्थ आंत येऊन त्याच्या पुढें उभा राहिला.

" आपली तार मला पोहोंचली. त्याप्रमाणें मी आपल्या सेवेला हजर आहें. आपलें काय काम असेल तें मला सांगा, मी होतां होईल तों शक्य तितका प्रयत्न करून आपणाला मदत करीन. " तो मनुष्य म्हणाला.

बाहेर कोण आलें आहे तें पाहण्याकरितां शीतलेनें दिवाणखान्यांत डोकावून पाहिलें. तिला आंत येण्याविषयीं खूण करून हेमचंद्र बाबू म्हणाला, " रघुनाथराव तुम्हांला त्रास देण्या—"

" छे, छे, असं बोलूं नका. माझा आपणाला थोडा जरी उपयोग झाला तरी त्यांत मला आनंदच आहे. "

रघुनाथरावांची ती आनंदी मुद्रा, त्याचें तें लीनतेचें भाषण ऐकून, आपलें काम होणें असेल तर तें खात्रीनें ह्याच मनुष्याकडून होईल असें हेमचंद्र आणि शीतलेला वाटूं लागलें.

" रघुनाथराव, तुम्हांला येथें मी कां बोलाविलें असेल असें तुम्हांला वाटतें ?"

" ता. १३ ला येथें दिनेशचंद्र बोस नांवाच्या गृहस्थाचा खून झाला—"

" मग तुम्हांला ती गोष्ट माहिती आहे तर ! खून झालेले गृहस्थ ते माझे वडील आणि त्यांचा खून करणाऱ्या मनुष्याचा पत्ता लावण्याकरितां मी तुम्हांला मुद्दाम बोलाविलें आहे. तुम्ही खुनी मनुष्याचा पत्ता लावून द्याल तर त्याबद्दल दहा हजार रुपये मी तुम्हांस देईन. आतां मी आपणाला एका महिन्या-पूर्वीपासूनची हकीकत क्रमाक्रमानें सांगतों. मग तुम्हीं काय तो निर्णय करा."

" ठीक आहे. आपल्या लक्ष्यांत येईल त्याप्रमाणें सांगा. माझें लक्ष आहे. "

" एक महिन्यापूर्वी माझ्या वडीलांना एक पत्र आलें होतें. त्या पत्रावर मोठ्या अक्षरांत एका कोपऱ्यांत लाल शाईनें ' १ मे १९०८ ' तारीख लिहिली होती. पत्र येण्यापूर्वी पंधरा दिवसांपासून त्यांची वृत्ति बरीच बदलली होती. नेहमीं ते चिंताक्रांत असत. पत्र आलें त्यादिवशीं सकाळीं ते अन्नपाण्यालाहि शिवले नाहींत. रात्रीं आम्हीं दोघांनीं त्यांना पुष्कळ विनवून विचारलें. तेव्हां ते म्हणाले, ' व्यापारांत बराच तोटा आला आहे त्यामुळें अलीकडे चित्ताला स्वस्थता नाहीं. शिवाय कांहीं व्यापारासंबंधानें ता. १ ला बांकपूरच्या एका सावकारानें मुद्दाम बोलाविलें आहे. '—"

" तें तारीख लिहिलेलें पत्र कोठें आहे. मला दाखवितां का ? "

" नाहीं तें पत्र वडिलांनीं जाळून टाकलें. "

" हरकत नाहीं— बरं पुढें ? "

" त्या पत्रांत लिहिल्याप्रमाणें ते बांकपूरास गेले होते. तेथून बारा दिवसांनीं म्हणजे ता. ७ ला परत आले. त्या दिवसापासून ते नेहमीं आनंदी होते. " आतां मजसारखा कोणीहि सुखी नाहीं, असें त्यांनीं दोन चार वेळां जेवतांना बोलून देखील दाखविलें होतें. पुढें ता. १२ ला त्यांना एक दुसरें पत्र आलें तें हें. " असें म्हणून हेमचंद्र बाबूनें खिशांतील पत्र काढून रघुनाथाच्या हातीं दिलें.

पत्रावरून दृष्टि फिरवून रघुनाथ म्हणाला " बरं पुढें ? "

" ह्या पत्राचा त्यांच्यावर कितपत परिणाम झाला तें मला सांगतां येत नाहीं. कारण ते नेहमींप्रमाणें आनंदी दिसत होते. "

" बरं पण ह्या पत्रांत लिहिल्याप्रमाणें ता. १३ ला तो मनुष्य येथें आला होता का ? "

" होय. "

" त्या मनुष्याचें तुम्हीं वर्णन देऊं शकाल काय ? "

" होय. " असें म्हणून हेमचंद्र बाबूनें शीतलेकडे पाहिलें.

शीतलेनें त्या मनुष्याचें वर्णन केल्यावर रघुनाथ म्हणाला, त्याचा वर्ण कसा होता ? "

" साधारण काळा सांवळा. "

रघुनाथ पुनः आपल्या हातांतील पत्र वाचूं लागला. दोन चारदां तें पत्र नीट लक्षपूर्वक वाचून तो म्हणाला, " आपण सांगितलेली सर्व हकीकत माझ्या पूर्ण लक्ष्यांत आली. परंतु ह्या पत्राविषयीं आपलें काय मत आहे ? हें पाठविणारा कोण ? इतकें सांगा म्हणजे झालें.

" आमचें मत ! " क्षणभर विचार करून हेमचंद्र बाबू म्हणाला, " त्याच मनुष्यानें खून केला असला पाहिजे. "

" छे, छे, हें आपलें मत अगदींच चुकलें. खुनाचा आणि पत्र पाठविणाराचा मुळींच संबंध नाहीं. बरं पण हा मनुष्य तुम्हीं ओळखतां कां ? "

" नाहीं म्हणून तर आपल्याला बोलाविलें. पण हा मनुष्य खून करणारा नव्हे हें कशावरून ? "

" तें मी सांगतों. परंतु पहिल्यानें तुमचे वडील बांकपुरास जाण्यापूर्वी तुमच्याबरोबर त्यांचें काय भाषण झालें तें सांगा. "

दिनेशचंद्र बाबू कलकत्त्याला जाण्यापूर्वी व त्याच्या आधल्या दिवशीं घडलेल्या सर्व गोष्टी, तसेंच आपल्या सर्व शंका आणि शीतलेला त्यावेळीं वाटत असलेलें भावी संकट वगैरे सर्व क्रमाक्रमानें हेमचंद्र बाबूंनें सांगितलें. तें ऐकून बराच वेळ रघुनाथ विचार करीत होता. शेवटीं तो म्हणाला,

" तुमच्या वडिलांच्या खासगी खोलींत कुलुपांत ठेवलेलें डायरीबुक एकवेळ मला पाहण्यास मिळतें तर बरें होतें. "

" ह्या एका पत्राशिवाय दुसरें कांहींएक नाहीं. कलकत्त्यास जाण्यापूर्वी त्यांनीं सर्व कागदपत्र जाळून टाकिले. हें पत्र जाजमाखालीं चुकून राहून गेलें; म्हणून तर इतक्या गोष्टी कळल्या. "

" बरं असो. पहिल्यानें मी त्या मनुष्याचा मुंबईत—भायखळ्यावर शोध करून पहातों— "

" म्हणजे! भायखळ्यावर कां? " आश्चर्यानें हेमचंद्र बाबूनें विचारलें.

नोटबुकांत ठेवलेलें पत्र बाहेर काढून रघुनाथ म्हणाला " हें पहा पत्रावर भायखळ्याच्या पोष्टाचा स्टाम्प आहे. बाकी माझी खात्री आहे कीं, हा शोध अगदीं व्यर्थ आहे. कारण खून झाला असल्यास त्या खुनाचा आणि ह्या मनुष्याचा अर्थाअर्थी कांहींच संबंध नाहीं. उलट हा मनुष्य तुमच्या वडिलांचा साहाय्यकर्ता म्हणा, अगर मित्र म्हणा असला पाहिजे.

" मग खून केला कोणी? "

" खून झाला आहे किंवा तुमच्या वडिलांनीं आत्महत्या केली आहे हेंच पहिल्यानें पाहिलें पाहिजे. आणि खून जर झालाच असेल तर खून करणारा व तुमच्या वडिलांना बांकपुरास बोलविणारा हा एकच मनुष्य असला पाहिजे. "

रघुनाथच्या भाषणावरून हेमचंद्र बाबूला ज्युरीच्या वेळीं पोलिसनें दिलेल्या रिपोर्टाची आठवण झाली. आत्महत्या किंवा खून ह्याबद्दल पोलिसला देखील संशय आला होता असें त्याला आठवलें. तो कांहीं बोलत नाहीं हें पाहून रघुनाथ म्हणाला " आतां मी आपली रजा घेतों. तुम्हीं कांहीं काळजी करूं नका. आठ दिवसांच्या आंतच कांहीं तरी ज्यास्त महत्त्वाच्या गोष्टींचा खुलासा करून कळवितों. "

म. ग्र. सं. ठाणे,
क्र. २६४९

## ७ अकल्पित भेट

संध्याकाळ झाला होता. शीतला एकटीच दिवाणखान्यांत अश्रु गाळीत बसली होती. हेमचंद्र बाबू नलिनीच्या पत्राची चौकशी करण्याकरितां अनाथ-बालिकाश्रमांत गेला होता. मुद्दाम आशेनें आलेला कोण वंग डिटेक्टिव्ह कांहीं तरी शोध लागावा म्हणून विश्रामबागेजवळ घिरट्या घालीत होता. इतक्यांत एक टपालाचा शिपाई हेमचंद्र बाबूच्या वाड्याचा दरवाजा उघडूं लागला. वंग डिटेक्टिव्ह जवळच होता. राजरोसपणें हेमचंद्र बाबूच्या घरीं जाऊन चौकशी करण्याचा तो पुष्कळ दिवसांपासून योग पाहात होता, तेव्हां अनायासें आलेली ही संधी पाहून पुढें होऊन तो म्हणाला, "कोणाचें पत्र शिपाई बुवा ?"

"हेमचंद्र दिनेशचंद्र बोस."

"द्या मजजवळ."

हा कोणीतरी घरांतील नोकर आहे असें समजून पोष्ट शिपायानें त्याच्या-जवळ पत्र दिलें आणि आपण चालता झाला. कोणी पहात नाहीं असें पाहून डिटेक्टिव्हनें तें पत्र खिशांत टाकिलें. पुनः एकदा आजुबाजूला पाहून आपल्या मनाची खात्री करून घेऊन त्यानें आपल्या ठिकाणाचा रस्ता धरला. रस्त्यानें चालत असतां खिशांत असलेल्या पत्रावरून आपणांस कांहीं तरी शोध लागेल असाच विचार त्याच्या मनांत चालला होता. ठिकाणावर आल्यावर तें पत्र उघडण्याला त्याला फारसे प्रयास पडले नाहींत. तें पत्र रघुनाथानें हेमचंद्र बाबूला खालील प्रमाणें लिहिलें होतें.

'पत्र पाठविणाराचा शोध लागला. पत्र पाठविणारा आपल्या वडिलां-बरोबर बांकपुरास गेला होता असें कळतें. कामाच्या गर्दीमुळें मला आपणाकडे येतां येत नाहीं. करितां आपण ता. २४ ला येथें येऊन सायंकाळीं ४ वाजतां व्हिक्टोरिया गार्डनमध्यें माझी वाट पहावी. विशेष भेटी अंतीं—

रघुनाथ'

'पत्र पाठविणारा हा रघुनाथ कोण?' वंग डिटेक्टिव्ह पत्र वाचून आपल्याशींच म्हणाला, "आणि बांकपुरास जाणारा हा दुसरा कोण? त्यानें

काय पत्र लिहिलें ?—हें प्रकरण बरेंच खोल जाऊं लागलें. आतां असें करून उपयोग नाहीं. हेमचंद्र बाबूलाच आतां हातीं धरला पाहिजे. पण पहिल्यानें तेथें काय होतें तें तर पाहूं, मग पुढल्या गोष्टी. उद्यां चार वाजतां व्हिक्टोरीया गार्डनमध्यें त्याला बोलाविलें आहे काय ? तें पत्र पूर्ववत् बंद करून त्यानें आपले कपडे बदलले आणि पोष्टमनला साजे असा पोषाख चढविला. गळयांत एक ब्याग अडकवून हातांत थोडे रद्दी कागदाचें पुडकें घेऊन स्वारी परत निघाली. पोष्टमन या नात्यानें दरवाजा उघडून राजरोसपणें घरांत जाण्याचा त्याला आतां पूर्ण अधिकार आला होता. शीतला दिवाणखाण्यांत बसली होती. दरवाजा वाजतांच "कोण आहे ?" म्हणून तिनें विचारिलें.

"बाबूसाहेबांचें एक पत्र आहे."

शीतला उठली. तिनें पत्र घेतलें आणि पुनः येऊन आपल्या खुर्चीवर बसली. छद्मवेषी पोष्टमन दरवाजांत उभा होता.

"शिपाई बोवा, काय पाहिजे तुम्हांला" त्याच्याकडे पाहून शीतलेनें विचारलें.

"कांहीं नको—सहज—आ–प–ल्या महाशयांना काय झालें ?" कळकळीचा पूर्ण आविर्भाव दाखवून तो म्हणाला, "च्‌-च् त्यांचा स्वभाव किती दयाळू म्हणून सांगावा ! अशा सज्जन मनुष्यावर वाला पडण्याचें कारण तरी काय झालें ?"

पोष्टमननें आपल्या पतिविषयीं दाखविलेली सहानुभूति पाहून शीतलेला एकदम रडूं कोसळलें. "दुर्दैव माझें, दुसरं काय !" इतकेंच म्हणून तिनें डोळयावर पदर धरला. तिचे हुंदके ऐकून तिच्याकडून कांहीं जास्त स्फोट होईल असें त्याला वाटेना. इतकी धडपड करून कांहींच अर्थ झाला नाहीं हें पाहून त्याची निराशा झाली. शेवटीं हेमचंद्र बाबूच्या पाळतीवर राहण्याचा निश्चय करून निराशेनें तो तेथून चालता झाला.

रघुनाथानें बोलाविल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं अकरा वाजतां हेमचंद्र बाबू भायखळयाच्या स्टेशनवर येऊन उतरला. रघुनाथानें चार वाजतां व्हिक्टोरिया गार्डनमध्यें वाट पहाण्याविषयीं त्याला लिहिलें होतें. इतका वेळ गार्डनमध्येंच घालविण्याच्या उद्देशानें तो स्टेशन बाहेर पडला. रहदारीच्या मोठ्या रस्त्याच्या वळणावर तो वळसा घेत असतां दुसरी एक व्यक्ति त्याच वेळीं समोरून वळसा

घेऊन येत होती. तेव्हां सहजासहजीं परस्पर सन्मुख होऊन परस्परांची दृष्टादृष्ट झाली; त्याबरोबर दोघेही जागच्याजागीं थबकले. आपण पाहतों तें स्वप्न तर नाहींना! असा दोघांनाही क्षणभर भ्रम पडला. त्या भ्रमांत 'नलिनी' असे शब्द हेमचंद्र बाबूच्या मुखांतून बाहेर पडले.

होय. ती नलिनीच होती! क्षणभरानें हेमचंद्र बाबू आश्चर्यानें म्हणाला, "नलिनी, तूं येथें कशी?"

त्याच्या प्रश्नाला काय उत्तर द्यावें हेंच तिला सुचेना. ती हेमचंद्र बाबूकडे आश्चर्यानें टकमका पाहत होती. ह्या अकल्पित भेटीमुळें दोघेहि आश्चर्यानें गोंधळून गेले होते.

"नलिनी, आश्रम सोडण्यापूर्वी मला कळवायचें तरी होतेंस!"

उत्तर नाहीं.

"माझा पत्ता तुला माहिती नव्हता तरी आश्रमाचा पत्ता तुला माहिती होताना, मग तेथें तरी एखादें पत्र लिहावयाचें होतेंस.

उत्तर नाहीं.

"मजवर इतका भयंकर प्रसंग आला होता तरी तुझ्या पत्राचा शोध करण्याकरितां आश्रमांत मी नित्य नियमानें जात होतों. तूं गेल्यावर एक दोन दिवसांत तुझें पत्र अवश्य येईल असें आश्रमांतील बाईला देखील वाटत होतें—नलिनी, तूं पत्र कां नाहीं लिहिलेंस? येथें तुला कोणी आणलें?

उत्तर नाहीं.

आपल्या इतक्या प्रश्नांपैकीं एकहि प्रश्नाचें नलिनी उत्तर देत नाहीं असें पाहून क्षणभर थांबून तो पुढें म्हणाला, "नलिनी, तूं मला इतक्या लवकर विसरशील—"

नलिनीनें त्याच्याकडे अशा कांहीं विलक्षण मुद्रेनें पाहिलें, कीं त्यामुळें हेमचंद्र बाबूचें वाक्य अपुरेंच राहिलें.

"तुम्हांला मी विसरलें असं कां तुम्ही समजतां? मी—मी—तरी काय करूं, माझा अगदीं नाइलाज झाला आहे." हें वाक्य बोलत असतां तिच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले.

"नाइलाज कसला! माझा पत्ता माहित नव्हता तर आश्रमांत पत्र पाठवावयाचें होतेंस!"

" होय. सगळी गोष्ट खरी ! पण बाबा नको म्हणाले—"

" बाबा ! बाबा कोण ? "

"बाबा कोण! सांगत्यें. पण येथें काय रस्त्यांत. घरीं चला म्हणजे सर्व सांगतें."

सडकेवर ठिकठिकाणीं केरकचऱ्यांचा ढीग, दोन्ही बाजूंनीं गटाराची दुर्गंधी, आजुबाजूला गलिच्छ लोकांची वस्ती. अशा त्या गल्लींत साधारण लहानशा एका घरांत नलिनीनें त्याला नेलें. तिच्या त्या राहत्या घराची बाह्य व अंतर शोभा पाहून हेमचंद्र बाबूचे मनःसंबधी सर्व व्यापार बंद पडले. मुकाट्यानें तो तिच्या मागून चालला होता. माडी चढून वर गेल्यावर त्याला बसण्याकरितां नलिनीनें एक लहानशी चटई पसरली.

" हा येथील सर्व प्रकार पाहून आपण बुचकळ्यांत पडलां असाल, पण माझी हकिकत ऐकून—"

" सांग, सांग, हा सर्व प्रकार पाहून माझ्या मनाची काय स्थिति झाली आहे याची तुला कल्पनाहि होणार नाहीं."

" खरंच. अशी स्थिति होणं शक्य आहे. मी जेव्हां येथें आलें त्यावेळीं देखील माझी अशीच स्थिति झाली. परंतु आतां मला त्याचें कांहींच वाटत नाहीं. कारण मी आतां येथें बाबांचें दुःख कमी करण्याला आलें आहें. " .

" पण तुझे बाबा कोण ? "

" तेंच सांगत्यें—पहिल्या पासूनच सांगत्यें. आश्रमांतून तुम्हीं मला घेऊन जाल त्या आनंदांत मी होतें परंतु मध्यें सहा सात दिवस तुम्हीं आलाच नाहीं. त्यामुळें मला काळजी वाटूं लागली. सर्व दिवस मी तुमच्या वाटेकडे पहात बसावें पण काय ! बाईनीं मला तुमच्याविषयीं कितीदां तरी विचारलें. तुम्हीं पालक व्हाल या आशेनें तिनें तें पत्र देखील पहिल्या तारखेला माझ्या स्वाधीन केलें नाहीं. कारण त्या पत्रांत कांहीं तरी अशुभ असावं असें बाईला वाटत होतें. पण इतक्यांत चवथ्या तारखेला माझे बाबा आले. "

" पुन्हां बाबा ! "

" होय, माझे बाबाच ते ! त्यांची दुःखकहाणी ऐकून तुम्हांला कितीतरी वाईट वाटेल. आज किती वर्षे ते दुःखांत दिवस काढतात. ते एका वचनांत गुंतले आहेत म्हणून त्यांना उघड रीतीनें जगांत वावरतां येत नाहीं. परंतु पश्चाताप होण्यासारखें त्यांच्या हातून एकहि कृत्य झालं नाहीं. त्या मेल्या

दुष्ट वचनानें माझे प्रियकर बाबा बांधले गेले आहेत. आणि तेवढ्याच करितां आपल्या जिवाच्या भीतीनें ते अशा ठिकाणीं राहातात. मला येथें आणल्यावर ते मला म्हणाले, " बाळे, ह्या तुझ्या दुर्दैवी बापामुळें तुला अशा ठिकाणीं रहावें लागतें. मी तुला आतांच आश्रमांतून आणलें ही मोठी चूक केली, तुला आणखी थोडे दिवस तेथेंच ठेवायचें होतें, कारण अद्यापि मजवरचें संकट टळलें नाहीं. तें केव्हां येऊन मजवर कोसळेल हें सांगतां येत नाहीं. आज बारा वर्षें मी तुला दूर ठेविलें पण आतां तुझें कन्याविरह दुःख मला सहन होत नाहीं. तुझी आई वारल्यापासून माझं धन, सुख, आनंद सर्व कांहीं तें तूंच होतीस, पण ईश्वराला पहावेना म्हणून कीं काय एका असाध्य वस्तूबद्दल मला वचन देण्याची कुबुद्धी झाली. त्या दिवसापासून मी जगाच्या सुखाला आणि स्वतःच्या स्वतंत्रतेला मुकलों. "

" अशा कोठल्या वस्तूबद्दल त्यांनीं वचन दिलं आहे ? "

" तेंच सांगत नाहींत. संकट संकट मात्र करीत असतात. त्यांना त्या संकटाची आठवण झाली कीं, एखाद्या लहान मुलाप्रमाणें ते मनसोक्त शोक करितात. त्या दिवशीं माझ्या गळ्याशीं गळा लावून त्यांनीं कितीतरी शोक केला. ' आतां मी तुला निराश्रित ह्या दुष्ट जगांत सोडून जाणार ' असा सारखा ते त्या रात्रीं शोक करीत होते. मी त्यांची किती प्रकारें तरी समजूत केली. मीहि त्या दिवशीं फार घाबरलें. मला त्या दिवशीं झोंप देखील आली नाहीं. बाबा मात्र सर्व रात्र दिव्याजवळ चिंताक्रांत बसून होते. रात्रीं मी निजलें असें पाहून त्यांनीं आश्रमांत मजबरोबर होती ती मोठी पेटी उघडली आणि त्यांत कांहीं जिन्नस ठेवले—"

" त्या पेटींत काय होतें तें तूं पाहिलेंस काय ? "

" छे, पहाणार कोठून ! मी निजलें किंवा नाहीं तें पाहूनच त्यांनीं पेटी उघडली. आणि ते जिन्नस ठेवतांच पुनः पूर्ववत् ती पेटी बंद केली. "

" बरं पण तें पत्र—पहिल्या तारखेला आश्रमांतील बाईनीं दिलेलें पत्र ? "

" तें पत्र बाबांनीं येथें आल्यावर मजजवळून घेतलें आणि न उघडतां फाडून टाकिलें. "

" मग आतां तूं ह्या ठिकाणीं—अशा घाणेरड्या ठिकाणीं किती दिवस राहणार ? "

"तेवढ्याचकरितां मी आज आश्रमाच्या पत्त्यावर पत्र लिहिलें आहे. मला पत्र लिहिण्याची बाबांनीं मनाई केली आहे. ते म्हणतात, 'तूं जर कोणाला पत्र लिहिलेंस तर त्या पत्रावरून देखील माझे शत्रू माझा सुगावा लावतील.' शेवटीं आज मी मनाचा धडा करून असा विचार केला कीं, आश्रमाच्या नांवावर पत्र लिहून तुम्हांला येथें बोलवावें. आणि आपला पूर्वीं झालेला विचार तुम्हीं येथें आल्यावर बाबांना सांगून सुरक्षितपणाविषयीं त्यांची काळजी दूर करावी. त्याप्रमाणें आज ते बाहेर गेले आहेत, असें पाहून मी आपणास पत्र लिहिलें आणि टाकण्याकरितां दुसरें कोणी नसल्यामुळें स्वतः स्टेशनवर जात होतें तों आपली भेट झाली. 'असें म्हणून तिनें आपल्या पोलक्यांतून पत्र बाहेर काढलें' हें तें पत्र. आतां बाबा येईपर्यंत तुम्ही थांबा."

हेमचंद्र बाबूनें तें पत्र वाचलें आणि म्हणाला, "बरं—पण मी येथें कोठल्या कामाकरितां आलों आहे याची तुला कांहीं कल्पना होते का?"

"कल्पना! हो—होते. माझ्या दैवामुळें आलांत."

"अ—सं तर खरंच! पण तुला काय सांगूं! मजवर असा प्रसंग आला आहे कीं—" हेमचंद्र बाबूला पुढें बोलवेना. त्याच्या डोळ्यांतून खळकन् पाणी आलें.

", हें—हें काय! असं काय करतां बाबू!" नलिनीनें हेमचंद्र बाबूचा हात धरून म्हटलें.

बऱ्याच वेळानें हेमचंद्र बाबू कंपित स्वरानें म्हणाला, "नलिनी, तूं आतां मला विसरावेंस हेंच चांगलें."

"बाबू, तुम्हीं काय हें भलतंच बोलतां! मी पत्र पाठविलं नाहीं—तुम्हांला कळविलं नाहीं म्हणून तुम्हीं मजविषयीं असा संशय घेतां का? पण काय सांगूं! माझ्या मनाची काय स्थिति झाली—"

"लाडके, खरोखरच तसा प्रसंग आला आहे. मी दुसऱ्या मुलीबरोबर लग्न करावें अशी पिताजीची इच्छा आहे."

"छे, माझं मन पाहण्याकरितां—"

"नाहीं. मी अगदीं खरं सांगतों."

"मग पिताजीना आपली खरी हकीकत सांगून—"

" पिताजीना खरी हकीकत—हाय हाय ! आतां खरी हकीकत कोणाला सांगूं ! माझ्या प्रियकर पित्याचा खून झाला—"

" काय ! खू—ऽ—ऽ—ऽ न्—"

" नलिनीची बोबडी वळली. हेमचंद्र बाबूनें अश्रू पुसून तिचे थरथर कांपणारे हात आपल्या हातांत धरून हळु हळू पिताजीच्या खुनासंबंधीं सर्व हकीकत तिला सांगितली. मुद्दाम बंगल्यांतील हाल हवाल कळण्याकरितां नलिनीचा पिता कोठलें ना कोठलें तरी वर्तमानपत्र रोज घरीं घेऊन येत असे, पण त्या वर्तमानपत्रांत दिनेशचंद्र बाबूच्या खुनाची हकीकत तिनें कोठेंच वाचली नव्हती. तीं वर्तमानपत्रें वाचून तिच्या कोवळ्या मनावर निराळाच परिणाम झाला होता. त्यांत हेमचंद्र बाबूच्या पित्याच्या खुनाची हकीकत ऐकून तिच्या मनांत निरनिराळे विचारतरंग येऊं लागले. ती म्हणाली, " आपल्या बंगाली बाबूंवरच सरकारनें कां असा कटाक्ष ठेविला आहे ! असं काय त्यांनीं सरकारचं केलं आहे."

" सरकारचा आणि पिताजीचा मुळींच संबंध नव्हता. सध्यांच्या चालू चळवळीच्या भानगडींत ते कधींहि पडले नाहींत."

" मग इतक्या पुण्याच्या लोकांत तुमच्या पिताजीचाच कां खून झाला ! तें कांहीं नाहीं—आपण बंगाली म्हणूनच सरकार—"

" वेडी आहेस तूं झालं ! आपण बंगाली म्हणून काय झालं ! सरकारनें पिताजी बंगाली म्हणून त्यांचा खून केला असें कां तुझें म्हणणें ! म्हणजे तें दयाळु सरकार आपल्या रयतेला आपणच होऊन मारतें असें होईल ! तसं नव्हे—बंगल्यांतील बाबू स्वदेशी चळवळीच्या नांवाखालीं कांहीं तरी थोतांड करितात; वर्तमानपत्रांतून राजद्रोही लेख लिहित, तसेंच राजकीय चळवळींत पडून कायद्याचें उल्लंघन करितात आणि आपल्या स्वतंत्रतेचा दुरुपयोग करून शांततेचा भंग करितात म्हणून सरकारला त्यांच्या पारिपत्यासाठीं अशी वृत्ति धारण करावी लागून हे कडक नियम अमलांत आणावे लागले. हेंच पहाना, परवां बॉम्बगोळा फेंकला, काय त्यापासून अर्थ निघाला ! व्यर्थ फांशी जाईल कीं नाहीं—"

" मग तुमच्या पिताजींचा कां खून झाला ? "

" तेंच उघडकीला आणण्याकरितां माझा हा सारा प्रयत्न चालू आहे. खुनाचा पत्ता लावण्याचा मी अगदीं निश्चय केला आहे."

" खरंच गडे लावा त्या मेल्या दुष्टाचा पत्ता. "

आपल्या पित्याचा आणि त्या खुनाचा कांहीं संबंध आहे अशी तिला कल्पना तरी होती का? खुनी मनुष्याचा पत्ता लावण्याविषयीं ती मोठ्या आग्रहानें आपल्या प्रियकराला सांगत होती परंतु त्यामुळें स्वतःच्या पित्यावर संकट ओढवत आहे हें तिला काय माहीत! बऱ्याच वेळानें हेमचंद्र बाबू तिला म्हणाला, " पण नलिनी, आपल्या दोघांच्याहि आशा आतां भंग होणार— नाहीं तर पिताजीची तरी आज्ञा मला मोडली पाहिजे. "

हेमचंद्र बाबूचें भाषण ऐकून नलिनीनें एकदम त्याच्या गळ्याला मिठी मारून ती स्फुंदत स्फुंदत म्हणाली " सांगा एकदां, तुमच्या पिताजीची तुम्हांला काय आज्ञा आहे ती तरी मला एकदां सर्व ऐकूं द्या, म्हणजे माझ्या दैवांत काय काय आहे तें तरी कळेल. "

आपल्या भावी सुखाच्या आड येणारी आपल्या पित्याची शेवटची इच्छा हेमचंद्र बाबूनें दुःखित मनानें नलिनीला सांगितली; परंतु ती ऐकण्याकडे तिचें कितपत लक्ष्य होतें हा एक प्रश्नच आहे! तिच्या डोक्यांत निराळयाच विचा-रांचें काहूर माजून राहिलें होतें. हेमचंद्र बाबू मृत्युपत्राची हकीकत सांगून पुढें म्हणाला, " रोहिणी चंद्रकिरण कोण? ती राहते कोठें? हें मला कांहीं सुद्धां माहीत नाहीं. आणि मृत्युपत्रांतहि तिच्या नांवाशिवाय जास्त उल्लेखहि केलेला नाहीं. रोहिणी चंद्रकिरण कोण आहे? कोठें आहे? हें जरी सध्यां आपणांस माहित नाहीं तरी ज्याअर्थी तिच्याच बरोबर मी लग्न करावें असें पिताजीनीं मृत्युपत्रांत लिहून ठेविलें आहे त्याअर्थी योग्यवेळीं ती मुलगी कोण आहे वगैरे सर्व गोष्टी आपणांस आपोआप कळतील असें माईचें म्हणणें आहे. "

नलिनी स्तब्धमनानें खिडकीजवळ उभी राहून बाहेर पहात होती. इतक्यांत तिचा पिता परत येत असतांना तिच्या दृष्टीस पडला. खरोखर त्या वेळीं तिचा पिता तिच्या दृष्टीस पडला तें एका अर्थी फार बरें झालें, कारण तिच्या विचारांचें पर्यवसान तिला भ्रमिष्ट करण्यापर्यंत आलें होतें, परंतु पिता दृष्टीस पडतांच तिच्या विचारांचा ओघ एकदम बदलला. ती हेमचंद्र बाबू-कडे पाहूं लागली तेव्हां तो म्हणाला, " नलिनी, मला फार तहान लागली आहे—"

" तहान लागली आहे? " असें म्हणून ती खालीं गेली.

पुष्कळ वेळ झाला. नलिनी वर येईना. हेमचंद्र बाबू चटईवर बसून कंटाळला, शेवटीं उठून तो खिडकीजवळ जाऊन उभा राहिला. नलिनी आतां वर येईल, मग वर येईल अशाखालीं एक तास लोटला. रघुनाथानें नेमून दिलेला चारांचा वेळ भरत आला. शेवटीं नलिनी कांहीं वर येत नाहीं असें पाहून तो खालीं उतरला. खालच्या दोन्हीं खोल्या त्यानें पाहिल्या, परंतु नलिनी कांहीं दिसेना. घरांत कोणी नाहीं असें पाहून तो चपापला. उतक्यांत नलिनी गेली असेल कुठें! कदाचित् आपणाकरितां कांहीं जिन्नस आणण्याकरितां बाहेर गेली असेल असें वाटून तिची वाट पहात तो दरवाजाजवळ उभा राहिला. क्षणभरानें बाजूच्या बिऱ्हाडांतील एक मनुष्य त्याच्याजवळ येऊन म्हणाला—" तुम्हीं बाबूसाहेबांना पहातां काय ? "

" हो–य–ना–हीं–मी–नलिनीला—"

होय, होय. ती बाबूसाहेबांची मुलगी. आतांच बाबूसाहेब तिला घेऊन गेले—"

" कोठें ? "

" तें कांहीं मला माहित नाहीं. पण जातांना ते म्हणाले कीं मला जर कोणी भेटण्याकरतां आले तर मी बाहेरगांवीं गेलों असें त्यांना सांगा. "

" पण हें घर असें उघडें टाकून—"

" मग त्यांत काय आहे! दोन रुपयांचा देखील माल नाहीं. आणि घर उघडं टाकलं म्हणून काय झालं! त्यांच्या मालाला कोणीहि हात लावणार नाहीं. "

" त्यांची मुलगी आतां येथें होती ना पण ? "

" होय. बाबूसाहेब आतांच बाहेरून आले आणि गडबडीनें तिला आपल्या बरोबर त्यांनीं नेलें. त्यांची पेटी देखील अद्यापि स्टेशनवर पोहोंचली नसेल. "

हें ऐकतांच हेमचंद्र बाबू तेथून झपाट्यानें निघाला. स्टेशनवर नलिनीची व तिच्या पित्याची आपणाला अवश्य भेट होईल असें त्याला वाटत होतें. परंतु स्टेशनवर येतांच एक प्यासेंजर गाडी सुटलेली पाहून त्याची निराशा झाली. शोध करतां, एक बंगाली गृहस्थ बरोबर एक बाई आणि पेटी घेऊन नुकत्याच सुटलेल्या गाडीनें गेला असें कळलें. परंतु तो कोठें गेला तें मात्र कळलें नाहीं. पुन्हां त्याला नलिनीचा वियोग झाला. आतां ती पुन

आपणाला भेटेल किंवा नाहीं अशा निराशेच्या विचारांत तो परत व्हिक्टोरिया गार्डनमध्यें जाण्याकरितां मागें फिरला. वाटेंत त्याच्या मनांत नाना तऱ्हेचे विचार येत होते. पालक म्हणून नलिनी ज्याला समजते तो तिचा खरा पालक नसून कोणीतरी कार्यसाधू ढोंगी मनुष्य असून त्यानें त्या भाबड्या निराश्रित नलिनीवर आपला कार्यभाग साधण्यासाठीं तिच्या अपक्क मनावर आपण तिचे पालक असा ग्रह केला असेल असें एक ना दोन, हजारों विचारांत भ्रमिष्टासारखा तो एक एक पाऊल टाकीत चालला होता. व्हिक्टोरिया गार्डनच्या मोठ्या दरवाजांत येतांच बाजूनें जाणाऱ्या एका मनुष्याकडे त्याची एकदम दृष्टी गेली त्याबरोबर गोंधळलेला होऊन तो क्षणभर तेथेंच उभा राहिला. बाजूनें जाणारा मनुष्य आपल्या ओळखीचा आहे असें त्याला वाटलें. इतक्यांत त्याला कांहीं गोष्टीची आठवण झाली, त्याबरोबर त्याचें सर्वांग कंपित होऊन त्यावर भीतीचे शहारे आले. पिताजीचा खून झाला त्या दिवशीं पिताजीला भेटण्याकरितां आलेल्या मनुष्याचें माईनें केलेलें वर्णन त्या मनुष्याला तंतोतंत जुळत होतें. कारण माईनें केलेल्या वर्णनांत व त्या मनुष्याच्या पेहरावांत, ऊंचींत आणि रंगांत बरीच साम्यता होती. हेमचंद्र बाबूनें मागें वळून पाहिलें तों तो मनुष्य थोड्या अंतरावर उभा असलेला त्याच्या दृष्टीस पडला. पुनः तो मनुष्य दृष्टीस पडतांच त्याला दुसरी आठवण झाली—आपण नलिनीबरोबर तिच्या घरीं जात असतां तो मनुष्य आपल्या मागून येत होता. ही आठवण होते न होते तों, ह्या आठ दहा दिवसांत त्याला आपल्या घरांवरून जातां येतां आपण पुष्कळदां पाहिलें आहे अशी तिसरी आठवण झाली. आपणामागून खुनी मनुष्य फिरत आहे ही कल्पना त्याच्या मनांत येतांच त्याचें काळीज थरारलें. त्यानें पुनः भीत-भीत अस्वस्थ मनानें मागें वळून पाहिलें परंतु त्या मनुष्याच्या ऐवजीं रघुनाथ त्याच्या दृष्टीस पडला. रघुनाथाला पाहतांच त्याच्या भीतिग्रस्त मनाला पुष्कळ धीर आला.

" काय बापूसाहेब, आमच्या पूर्वींच तुम्हांला शोध लागला म्हणावयाचा ! " रघुनाथ हेमचंद्र बाबूजवळ जाऊन म्हणाला.

" कसला शोध ! "

" खुनी मनुष्याचा—"

" तेंच तेंच मी तुम्हांला सांगणार आहें." असें म्हणून हेमचंद्र बाबूनें थोंडया वेळापूर्वी आपल्या मनांत खुनी मनुष्याविषयीं घोळत असलेले सर्व विचार त्याला सांगितले.

" तुम्हांला जसा त्या मनुष्याचा संशय आला तसा मला देखील आला आहे. परंतु तो निव्वळ संशयच आहे. बरं पण तुम्ही नलिनी नांवाच्या मुलीबरोबर—"

" तुम्हांला कसं कळलं!"

" हीच तर मुळीं आमच्या धंद्यांत मजा. आहे " रघुनाथ हांसत हांसत म्हणाला, " ज्या मनुष्यानें तुमच्या वडिलांना ता. १२ ला पत्र लिहिलें त्याच मनुष्याची ती मुलगी—"

" काय त्या मनुष्याची ती मुलगी!"

" छे, हा अगदीं तुमचा चुकीचा ग्रह आहे. तो मनुष्य खुनी नसून उलट तुमच्या पित्याचा खरा हितचिंतक होता. त्यानें त्याच्याकडून शक्य तितका प्रयत्न केला परंतु तुमच्या वडिलांना म्हणा अगर त्याच्या म्हणा दुर्दैवामुळें त्याच्या मदतीला तुमच्या वडिलांना कांहींच फायदा झाला नाहीं. आज त्याच्यावर कोठलें संकट डोकावून पाहूं लागलें हरी जाणें, त्यानें आपल्या मुली-सह येथून पलायन केलें. तुम्ही माझी येथें वाट पहात बसाल म्हणून मला येथें यावें लागलें, नाहींतर त्याच्यावर काय संकट आलें आहे? तो कोठें गेला? वगैरे सर्व गोष्टीचा मी शोध केला असता. आतां तुम्हींच सांगा कीं, त्या मनुष्याला जर तुम्हीं खुनी म्हणतां तर दुसरा मनुष्य ज्याचा तुम्हांला व मला संशय आला आहे तो कोण?"

हेमचंद्र बाबू स्तब्ध उभा होता. रघुनाथ पुढें म्हणाला बरं पण तुमची आणि त्या मुलीची ओळख कुठली?"

हेमचंद्र बाबूनें त्याला आपली प्रेमकहाणी सांगितली.

" मृत्युपत्रांत रोहिणी चंद्रकिरण कोण? त्याविषयीं कांहींच लिहिलें नाहीं म्हणतां, आणि तुम्हांलाहि तिची कांहीं माहिती नाहीं म्हणतां. असो त्याचाहि ोग्य वेळीं आपण शोध लावूं. पण पहिल्यानें त्या संशय आलेल्या मनुष्याच्या मला मागें लागलें पाहिजे."

एक गुप्त पोलिस दुसऱ्या एका गुप्त पोलिसाच्या मागें लागला.

राष्ट्रीयसभा, संमेलन, प्रदर्शन, यात्रा, बहिष्कार वगैरे निरनिराळ्या पंथाचा शेंकडा नव्वद डोकीं आपली वरकांती स्वदेशभक्ति व्यक्त करण्याकरितां स्वीकार करतात. परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, त्या प्रत्येकांत स्वार्थत्याग मात्र नसतो. शेजारचा करतो म्हणून आपण करायचें इतकेंच ! एखादा उठतो आणि परदेशी वस्तूंवर बहिष्कारशस्त्र उचलतो. एक महिना जेमतेम पण नेटानें स्वार्थाकडे लक्ष्य न देतां तें व्रत पाळतो. परंतु पुढें खिशाला खार लागूं लागला कीं आपोआप त्याच्या व्रतांत टंगळ मंगळ होऊं लागते. तसेंच चौघे एकत्र जमले, कीं झाली स्वदेशीला सुरवात. प्रत्येक जण आपण किती स्वदेशी भक्त आहों तें दाखविण्याचा जारीनें प्रयत्न करतो. तर दुसरीकडे एखाद्या वेड्या पीर देशभक्ताच्या मनांत स्वतःच्या देशभक्तीचा इतका ऊत येतो कीं, आपलें नांव देशभक्तांत अमर होण्यासाठीं आपल्या खवचटलेल्या मेंदूतून अशी एक शक्कल तो काढतो कीं, शाबास ! एकंदरीनें ह्या स्वदेशीनें कमीजास्त विचारांच्या डोक्यावर त्यांच्या विचारांच्या वळणावर आपला पुरा अंमल बसविला आहे. होतां होतां त्या देशभक्तीची आणि चळवळीची मजल बॉंबगोळयापर्यंत येऊन धडकली आहे. परंतु जोंपर्यंत आमच्या देशांतून जातिभेद आणि स्वार्थ गेला नाहीं तोंपर्यंत वरील चळवळीसारख्या शेंकडों चळवळीनें आपल्या राष्ट्रीय किंवा सामाजिक अगर कोठल्याही उन्नतीची आम्ही आशा करणें व्यर्थ आहे. जातिभेद आणि स्वार्थ हीं दोन पिशाच्चें आमच्या मधून घालविण्याला ‘ वंदेमातरम् ’ हा एकच मंत्र आहे. जें कराल तें स्वतःकरितां न करतां मातृभूमीकरितां करा आणि तिच्यावर वास्तव्य करणारे सर्व आपण तिचींच लेंकरें आहोंत असें समजून एकमेकांबरोबर बंधुत्वाच्या नात्यानें वागा म्हणजे पुढील दिवस आपण खात्रीनें चांगले पाहूं. पण छे ! उलट कोट्यवधी संकटाच्या भारानें वांकलेल्या आमच्या प्रिय मातृभूमीच्या पाठीवर कांहीं वेडे पीर देशभक्त बॉंबगोळे फेंकूं लागले आहेत. बॉंबगोळयाचा दणका म्हणजे तिच्या दुःखाचा कडेलोटच होय. याचा आमचे देशबांधव केव्हां विचार करतील तो करोत.

परंतु इतकी गोष्ट खरी कीं, त्या बॉम्बगोळयाच्या दणक्यानें आमच्या आंग्ल बंधूचें धाबें मात्र दणाणलें. तें इतकें कीं, त्यांच्या विचारी मेंदूतून जे अनेक तर्क वितर्क बाहेर पडतात ते पाहून त्यांच्या विचारी डोक्यांची कींवच कराविशी वाटते. एखादा आंग्ल लेखक उठतो तो आपली लेखन तरवार कलकत्त्यावर फिरवितो. तों दुसरा उठतो तो पुण्याकडे वळतो. परंतु :पुण्याची वस्तुस्थिति म्हणजे काप जाऊन भोकें राहिल्याप्रमाणें आहे. तरी देखील सर्व महाराष्ट्रांत आपलें नांव अग्रगण्य केलेल्या त्या पुण्यनगरीनें आपल्या नांवाची छाप अशी काय विलक्षण बसविली आहे कीं, जरा कोठें फट् झालें कीं, सर्वांचा डोळा पुण्याकडे लागतो.

पुण्याचें नांव निघालें, कीं आलाच संशय ! हेमचंद्र बाबूच्या मागें वंग डिटेक्टिव्ह होता हें वाचकांच्या लक्षांत आहेच. रघुनाथ कोण ? आणि हेमचंद्र बाबू बरोबर त्याचा काय संबंध ? हें जाणण्याची जरी त्याला उत्कंठा लागली होती, आणि तेवढ्याचकरितांच जरी तो त्याच्या मागें व्हिक्टोरिया गाडनपर्यंत गेला होता तरी मध्यंतरी त्यांची पाळत सोडून नलिनीच्या मागें जाणें त्याला अधिक श्रेयस्कर वाटलें. कारण हेमचंद्र बाबू नलिनी बरोबर तिच्यामागें तिच्या घरीं गेला त्यावेळीं तोहि त्याच्या मागें गेला होता. नलिनी कोण ? तेथें रहातें कोण ? वगैरे सर्व तपास तो करून चुकला होता. तपासअंतीं नलिनीच्या पित्याचा दिनक्रम समजतांच त्याला नलिनीच्या पित्याचाच जास्त संशय येऊं लागला. त्यांत त्याच्या मागें पुण्याला जाण्याला कारण नलिनीला तिच्या पित्यानें एकाएकीं तिला पुण्यांत नेलें हें होय.

मुंबई सोडल्यानंतर गाडींत असतांना, नलिनीला घेऊन तिचा पिता कोठल्या ठिकाणीं गेला असेल हा एक विचार वंग डिटेक्टिव्हच्या डोक्यांत चालला होता. बहुतेक करून हेमचंद्र बाबूच्या घरींच त्यांचा शोध लागेल असें त्याचें मन त्याला सांगूं लागलें. एक विचार संपतांच दुसरा पुढें आला —नलिनीच्या पित्यानें आपणाबरोबर नेलेल्या पेटींत असे काय जड पदार्थ होते, कीं त्यामुळें ती उचण्याला चार हमाल लागले. दिसण्यांत पेटी साधारण असून तिला दोन कुलपें, शिवाय सील करण्याचें काय कारण ? असे त्या पेटीविषयीं एक ना दोन शेंकडों विचार त्याच्या डोक्यांत लागले. कदाचित् त्या पेटींत ज्वालाग्राही पदार्थ तर नसतील ?

अशी त्याला शंका आली. ज्वालाग्राही पदार्थांची आठवण होतांच माणिक स्ट्रीटमध्यें फेंकलेल्या बाँब गोळ्याची त्याला आठवण झाली. होतां होतां माणिक स्ट्रीटमध्यें बाँब फेंकणारा दुसरा तिसरा कोणी नसून तो नलिनीचा बापच असावा असें त्याला वाटूं वाटलें. अशा शेंकडों विचारांत गर्क असतां गाडी पुण्याच्या स्टेशनवर थांबली. त्यावेळीं पूर्व दिशा नुक्तीच आरक्त दिसूं लागली होती. गाडींतून उतरल्यावर मनाला तरतरी आणणारा चहा घेण्यासाठीं वंग डिटेक्टिव्ह स्टेशननजीकच्या एका उपहारगृहांत गेला.

चहा घेऊन बाहेर आल्यावर दुर्दैवामुळें शहरांत जाण्याकरितां त्याला एकहि टांगा मिळाला नाहीं. त्या दिवशीं नवीन नंबर घेण्याकरितां पुष्कळ टांगे पोलिसकचेरीवर अडकून राहिले होते. व थोडे बहुत जे होते ते उतारू लोकांना घेऊन केव्हांच शहरांत गेले. त्यामुळें वंग डिटेक्टिव्हला पायींच रस्ता तुडविण्याचा प्रसंग आला. सदाशिव पेठेच्या नाक्यावर येतांच रस्त्यांत पडलेल्या एका कागदाच्या गोळयावर त्याची दृष्टी गेली. घाईघाईनें तो कसला गोळा आहे तें पाहण्याकरितां जाणार इतक्यांत समोरून एक टांगा आला आणि त्याचें एक चाक त्या गोळयावरून गेलें. त्याबरोबर त्या गोळ्याचा भडका होऊन मोठा आवाज झाला. आवाजाबरोबर चारी बाजूंनीं पोलिस धांवले व 'बाँबगोळा' 'बाँबगोळा' असा एकच ओरडा झाला. गाडी थांबविण्यांत आली. 'आपण गाडी घेऊन येत असतां हा जवळच उभा होता' असें वंग डिटेक्टिव्हाकडे बोट दाखवून गाडीवानानें सांगितलें. त्यावेळीं त्याच्या जवळपास त्याच्याशिवाय दुसरें कोणीं नसल्यामुळें पोलिसांनीं वंग डिटेक्टिव्हाला कैद केलें.

शिपायांनीं पकडतांच क्षणभर त्याला कौतुक वाटलें. आपण कोण ? हें समजतांच आपली तत्काळ सुटका होईल अशी त्याची खात्री होती. परंतु पोलिस स्टेशनवर गेल्यावर बिचाऱ्याचा तो पोकळ भ्रम दूर झाला. आपण गुप्तपोलिस आहों हें शाबीत करण्याला त्यावेळीं त्याच्याजवळ कांहींच साधन नव्हतें. शेवटीं आपण खरोखरच गुप्तपोलिस आहों अशी खात्री करून देण्याकरितां त्याला कलकत्त्याच्या पोलिसखात्याला तार करावी लागली. वाचकहो ! त्या तारेचें उत्तर येईपर्यंत चला आपण हेमचंद्र बाबूला भेटूं.

रघुनाथाला भेटून हेमचंद्र बाबू रात्रीं अकराच्या गाडीनें पुण्यास आला.

सकाळीं सहाच्या सुमारास त्याचा टांगा बागेच्या फाटकाजवळ येऊन उभा राहिला. रघुनाथाच्या भेटीपासून त्याच्या अस्वस्थ मनाला जास्तच अस्वस्थता आली होती. शिवाय गाडीच्या त्रासामुळें व सर्व रात्र झोंप न मिळाल्यामुळें तो अधिकच त्रासला होता. गाडीवानाचे पैसे चूकवून आंत जाण्याकरितां तो मागें फिरला तों दरवाजांत उभी असलेली नलिनी त्याच्या दृष्टीस पडली. त्यावेळीं त्याची काय स्थिती झाली असेल बरें ! पुनः आपण नलिनीला स्वप्नांत पाहतों कीं काय, असें वाटून तो तेथेंच दरवाजांत एक पाय आंत आणि एक पाय बाहेर असा दगडी पुतळ्याप्रमाणें स्तब्ध उभा राहिला. त्याची ती स्थिति पाहून नलिनी हलकेंच पुढें होऊन म्हणाली, "बाबू असे गोंधळूं नका. आंत चला पण तुमची माझी ओळख आहे असें तुमच्या मातेला कळूं देऊं नका. रात्रीं मी आपणांस सर्व सांगत्यें—" इतक्यांत आंतून कोणी तरी येत असल्याचा तिला भास झाला त्याबरोबर ती चटकन् दरवाजाआड झाली.

गाडीचा आवाज ऐकून शीतला बाहेर येत होती. हेमचंद्र बाबू मुंबईस गेल्यापासून तिच्या मनाला बिलकुल स्वस्थता नव्हती. खुनी मनुष्याचा रघुनाथानें कांहीं तरी पत्ता लावला असेल म्हणून हेमचंद्र बाबूला मुंबईत भेटण्याकरितां बोलाविलें असें तिला वाटत होतें. परंतु हेमचंद्र बाबूचा निस्तेज गोंधळलेला चेहेरा पाहून तिची निराशा झाली. खुनाचा जर कांहीं शोध लागला असता तर आंत येतांच हेमचंद्र बाबू कांहींतरी आपल्याबरोबर बोलता ! परंतु तसा कांहीं प्रकार झाला नाहीं. ती मुकाट्यानें त्याच्या मागून आंत गेली. कपडे काढीत असतां हेमचंद्र बाबू "मुंबईत जाऊन कांहीं विशेष निष्पन्न झालें नाहीं" इतकेंच म्हणाला.

थोड्या वेळानें नोकरानें चहा आणून टेबलावर ठेवला.

"मग तुला मुंबईत बोलविण्याचें काय कारण ?" चहा घेत असतां शीतला म्हणाली.

"कारण काय ! पिताजीला ज्यानें पत्र पाठविलें तो पिताजीचा खरा हितकर्ता होता असें त्याला खात्रीलायक कळलें—"

"आणि माझीहि त्या मनुष्याविषयीं आतां खात्री झाली आहे. कारण तो मनुष्य काल येथें आला होता."

" तो मनुष्य आला होता ? " आश्चर्यानें हेमचंद्र बाबूनें विचारलें. इतक्यांत त्याला कांहीं स्मरण होऊन तो स्वर बदलून पुढें म्हणाला, " तो मनुष्य येथें आला होता काय ? "

" होय. काल संध्याकाळीं आपल्या मुलीला घेऊन तो तुझें नांव विचारीत येथें आला. त्यानें ज्या कांहीं गोष्टी सांगितल्या त्या सर्व खऱ्या आहेत अशी माझी खात्री आहे. "

" मी आलों त्या वेळीं बागेंत उभी होती ती—ती—"

" होय. तीच असेल ती. बागेंत होती का ? मला वाटलं ती अद्यापि निजली असेल ! काय बिचारीची दशा ! आपल्या सारखं तिच्यावरहि संकट आलं आहे—"

" संकट ! तिच्यावरहि संकट आलं आहे ? "

" तिच्यावर नाहीं तिच्या पित्यावर ! म्हणजे तिच्यावर नाहीं का ? "

" हो असें तर खरेंच. पण काय संकट आलें आहे ? "

" त्या विषयीं त्यानें नीटसा उल्लेख केला नाहीं. परंतु आपल्या घरावर जसा प्रसंग आला तसा त्याच्यावरहि आला आहे. त्यानें सांगितलेल्या हकिक-तीवरून असं दिसतं कीं, आपणावर संकट आणणारा मनुष्य तो चांगला ओळखतो. आणि त्या दिवशीं आपणाकडे आलेल्या मनुष्याचें त्यानें बरोबर वर्णन केलें. त्याचा आणि आपल्या घरांतला चांगला स्नेह होता. म्हणून सुरक्षित ठिकाण असें समजून त्यानें माझ्या सोबतीला आपल्या मुलीला आणून ठेविलें. जातानां तो म्हणाला, मी एक दोन दिवसांत त्या मनुष्याचा शोध करून येथें येतों. मग आपण सर्व मिळून पुढें काय व्यवस्था करायची ती करूं. '—पण हेमचंद्रा, त्या मुलीविषयीं तुझें काय मत आहे ?"

" माझं—म--त—" एकाएकीं शीतलेनें विचारलेला प्रश्न ऐकून हेमचंद्र बाबू थोडा गोंधळला. इतक्यांत 'माईला ओळख देऊं नका' अशा अर्थाची नलिनीनें केलेल्या सूचनेची त्याला आठवण झाली. तो पुढें म्हणाला, " माई, मला जर तिची कांहींच माहिती नाहीं तर मी मत तरी काय देऊं ? इतकं मात्र खरं कीं, सध्यां तुला सोबतीची फार जरूरी होती आणि ती अनायासें मिळाली. "

" खरंच. मला अलीकडे अगदीं एकटं वाटत होतं. "

इतक्यांत नलिनी आंत येतांना हेमचंद्र बाबूच्या दृष्टीस पडली तेव्हां तिला चुकविण्याकरितां तो म्हणाला, " ती पहा आंत येत आहे. बसा आतां तुम्हीं दोघीजणीं गोष्टी बोलत. मी जाऊन जरा पडतों, गाडीचा आणि जागरणाचा मला फार त्रास झाला आहे. " असें म्हणून तो उठला.

वाचकहो! रात्रीं आपण आनंदानें नाटक पाहून येतों, परंतु दुसऱ्या दिवशीं आपणाला त्या जागरणाचा :किती बरें त्रास होतो! मग हेमचंद्र बाबूला सर्व रात्र जागरण, मनाची चलबिचल स्थिति आणि गाडीचा गडगडाट या सर्वांचा किती बरें त्रास झाला असेल! तर थोडा वेळ विश्रांति घेण्याकरितां त्याला रजा देऊन नलिनी तेथें कशी आली तें पाहूं. नलिनीचा पिता कोण? हें आतां वाचकांच्या बहुतेक लक्षांत आलेंच असेल? तिसऱ्या प्रकरणांत बांकपुरच्या स्टेशनवर दिनेशचंद्र बाबूला फार दिवसांनीं भेटलेला त्याचा मित्र शशिभूषण हाच नलिनीचा पिता होय ता. १२ ला कोणी पत्र पाठविलें त्याची चौकशी करण्याकरितां हेमचंद्र बाबूनें रघुनाथाला सहाव्या प्रकरणांत सांगितलेलें वाचकांना आठवत असेलच, त्याप्रमाणें त्यानें शोध चालविला. तें जेव्हां शशिभूषण बाबूला कळलें तेव्हां तो अतिशय घाबरला. आपल्या शत्रूपैकीं कोणी तरी आपल्या पाळतीवर आहे असें वाटून तो दुसरी सुरक्षित जागा पाहूं लागला. परंतु नलिनी जवळ असल्यामुळें तिला एकटीला कोठेंहि जरी ठेवलें तरी धोक्याचेंच आहे असें वाटून त्यानें आपल्या मित्राच्या म्हणजे दिनेशचंद्र बाबूच्या घरीं पुण्यांत आणून ठेविलें. नलिनीची नीट व्यवस्था झालेली पाहून त्याचा जीव शांत झाला.

नुकतेच दिवे लागले होते. हेमचंद्र बाबू माडीवर स्वस्थ पडला होता. नलिनी आपल्या येथें आली आहे अशा अर्थाचें एक पत्र त्यानें रघुनाथाला लिहिलें. मध्यंतरीं नलिनी कोठें आहे तें माहित नसल्यामुळें त्याला जी निराशा वाटत होती, ती नलिनी जरी प्रत्यक्ष त्याच्या घरीं येऊन राहिली होती तरी कमी न होतां उलट ज्यास्तच वाढत जाऊन शिवाय त्याच्या चेहऱ्यावर उदासीनता आणि विचारामुळें येणारी निस्तेजताहि जास्त जास्त वाढत चालली. आपली ओळख आहे तें मातेला कळूं न देण्याविषयीं नलिनीनें कां सांगितलें असावें हें त्याला कांहींच कळेना. रात्र केव्हां होते आणि नलिनी ह्या गोष्टीचा उलगडा केव्हां करते असें त्याला झालें होतें.

कोणाच्याहि मनाला रुखरुख देणाऱ्या गोष्टीविषयीं लवकर उलगडा झाला नाहीं तर त्याच्या मनाची फार चमत्कारिक स्थिति होते. मग ती गोष्ट मनाला सुख देणारी असो किंवा दुःख देणारी असो. एखाद्या गोष्टीच्या उलगड्यापासून मनाला खात्रीनें आनंदच होणार असें जरी त्याला पक्कें ठाऊक असलें तरी देखील मनाची रुखरुख जात नाहीं. उलट त्या गोष्टीचा उलगडा होण्यास एक क्षण जास्त लागला तर तो घटकेप्रमाणें वाटतो. जर आनंद देणाऱ्या गोष्टीच्या उलगड्याची अशी रुखरुख लागते तर मग हेमचंद्र बाबूला अकल्पित गोष्टीच्या उलगड्याची किती रुखरुख लागावी !

पुष्कळ वेळां त्याच्या मनांत नलिनीला बागेंत अगर एखाद्या एकांत ठिकाणीं नेऊन सर्व गोष्टींचा उलगडा करून घ्यावा असें आलें. परंतु असा विचार अमलांत आणण्याचा त्याला धीर होईना. कारण नलिनीनें आगाऊ सूचना दिली असल्यामुळें त्यांत कांहींतरी विशेष असावें असें वाटून त्याला मुकाट्यानें रात्रीची वाट पहात बसावें लागलें. होतां होतां रात्रीचीं जेवणें झालीं; नऊ वाजले; साडे नऊ वाजले, सर्वत्र सामसूम झालें तरी नलिनी येण्याचीं चिन्हें दिसेनात. हेमचंद्र बाबू बिछान्यावर विचार करीत तळमळत पडला होता. इतक्यांत अकरा वाजले. तेव्हां मात्र त्याच्यानें स्वस्थ रहावेना. त्यानें उठून दरवाजा उघडला. तों नलिनी बाहेर उभी असलेली त्याच्या दृष्टीस पडली.

“ केव्हांपासून मी दरवाजाची बाहेरून कडी वाजवितें. ”

“ वाः ! उलट मी केव्हांपासून तुझी एकसारखी वाट पहातों. शेवटीं तूं येत नाहींस असें समजून मीच आतां खालीं येत होतों. ”

“ येणार कशी ! तुम्हीं दरवाजा आंतून बंद करून घेतलेला ! मी इतक्यानें धक्के दिले तरी तुम्ही ऐकलं नाहीं ! ”

आपण आंतून दरवाजा बंद करून घेतला होता याची त्याला आठवणहि नव्हती. त्याच्या डोक्यांत चाललेल्या विचारांच्या बंडाच्या आवाजांत नलिनीनें दरवाजावर दिलेल्या धक्क्यांचा आवाज त्याला बिलकुल ऐकूं आला नाहीं. आपली चुकी लक्षांत येतांच तो खिन्न होऊन म्हणाला “ मी आंतून दरवाजा लावला असेल असें माझ्या स्वप्नींहि नव्हतें. उलट इतका वेळ झाला तूं कां सुचणार ! हाच एक माझा विचार चालला होता. ”

असें म्हणून त्यानें नलिनीचा हात हात धरिला आणि तिला आपल्याजवळ एका खुर्चीवर बसविलें. वाचक हो ! पाहिलात का ? दिव्याचा प्रकाश तिच्या तोंडावर लख्ख पडला आहे. अरेरे ! काय हें स्वरूपांत आणि चर्येंत भयंकर रूपांतर झालें आहे ! पहिल्या प्रकरणांत आश्रमाच्या बागेंत हेमचंद्र बाबूबरोबर बोलत असतां आपण पाहिलेलें तिचें हास्यविनोदप्रतिबिंबित मुख कोणीकडे, आणि आतांचें निस्तेज आणि चिंतायुक्त मुख कोणीकडे ! त्यावेळची ती उज्वल गौर-कांती कोणीकडे आणि आतांचा तिचा मलिन आणि फिकट वर्ण कोणीकडे एका दिवसापूर्वी तिच्या वर्णांत इतका फरक पडला नव्हता. फक्त आपल्या प्रियकराची फार दिवस भेट न झाल्यामुळें तिची चर्या थोडी उदास दिसत होती. परंतु आधल्या दिवशीं हेमचंद्र बाबूच्या तोंडून तिच्या सर्व भावी सुखाची उच्छेद करणारी त्याच्या पित्याची मृत्युपत्रांत लिहिलेली इच्छा ऐकून एका दिवसांत निराशेमुळें तिच्या चर्येंत आणि वर्णांत वर लिहिलेलें रूपांतर झालें.

"काल मी वर येत नाहीं असें पाहून सर्व घरांत तुम्ही माझा शोध केला असाल नाहीं का ?" नलिनी खुर्चीवर बसल्यावर म्हणाली.

"होय. तुझी मी पुष्कळ वेळ वाट पाहून शेवटीं खालीं गेलों तेव्हां शेजारच्या एका मनुष्यानें तुम्हीं स्टेशनवर गेलां असें सांगितलें. त्या बरोबर मी स्टेशनवर धांव मारिली. परंतु स्टेशनवर पोहोंचण्यापूर्वीच तुमची गाडी गेली—पण नलिनी, मला वर बसवून न विचारतां—"

"मग काय करूं ! बाबा घाई घाईनें आले आणि मला एका क्षणाचाहि अवकाश न देतां तसेच घेऊन स्टेशनवर आले. तुम्हीं वर बसलां आहांत असेंहि मी त्यांना सांगितलें. तुमचें नांव ऐकतांच क्षणभर ते विचारांत पडले आणि म्हणाले, 'हेमचंद्र बाबू येथें असला तर त्याच्या केसाला धक्का नाहीं पण मी जर येथें एक मिनिट जास्त राहिलों तर माझ्या प्राणाशीं गांठ येईल. शत्रूला माझी चाहूल लागली आहे.' तेव्हां माझा नाइलाज झाला. तुम्हांला तशा रीतीनें न विचारतां मी आल्यें त्याचें मला कितीतरी वाईट वाटलें. पण गाडींत जेव्हां आम्हीं तुमच्याच घरीं जाणार आणि बाबा मला तुमच्याच घ ठेवणार असें त्यांच्या तोंडून मला कळलें तेव्हां मला बरं वाटूं लागलं. तु आणि माझी कशी ओळख झाली तें सर्व बाबांनीं मला विचारिलें. शेवट इतकेंच म्हणाले कीं, 'ईश्वराची लीला अगाध आहे.'"

"बरं पण तुझी माझी ओळख आहे तें माईला कळूं देऊं नका असें तूं सकाळीं कां सांगितलेंस ?"

"कारण काल आम्हीं येथ आल्यावर बाबांचें आणि तुमच्या मातेचें बराच वेळ भाषण झालें. बोलतां बोलतां तुमच्या वडिलांच्या मृत्युपत्राविषयीं बाबांनीं विचारलें. तेव्हां तुमची माता म्हणाली, " आमच्या हेमचंद्रानें रोहिणी नांवाच्या मुलीबरोबर लग्न करावें अशी एक त्यांनीं आपली शेवटची इच्छा लिहिली आहे. आणि त्याचें मन तर दुसऱ्याच एका नलिनी नांवाच्या मुलीवर जडलं आहे." —बाबू, तुमच्या मातेचें तें भाषण ऐकतांच माझी कशीशीच स्थिति झाली. पुढें तुमच्या मातेच्या म्हणण्यांत असं आलं कीं, मृत्युपत्रांत लिहिलेल्या मुली-बरोबर तुम्हीं लग्न केलं पाहिजे. त्यावेळीं बाबा क्षणभर हासलें, परंतु कांहींएक म्हणाले नाहींत. शेवटीं जातांना त्यांनीं मला जवळ बोलाविलें आणि सांगितलें, ' नलिनी , तुझें आणि हेमचंद्र बाबूचें प्रेम आहे हें त्याच्या मातेला कळूं देऊं नको. कारण तूं आतांच तिच्या तोंडून ऐकलें आहेस कीं, मृत्युपत्रांत लिहि-लेल्या मुलीशिवाय त्यानें दुसऱ्या मुलीबरोबर लग्न करूं नये आणि ती दुसरी मुलगी जिच्यावर त्याचें प्रेम आहे ती तूंच असें जर तिला आतां कळलें तर ती क्षणभरही तुला घरांत राहूं देणार नाहीं. म्हणून म्हणतों मी सांगितल्या-प्रमाणें आणखी आठ दहा दिवस येथें काढ. तितक्यांत मी तुजबद्दल कांहींतरी चांगली व्यवस्था करतों. पण इतकें लक्षांत असूं दे कीं तुझ्या पुढच्या सर्व सुखाकडे माझें पूर्ण लक्ष आहे. ' असें म्हणून त्यांनीं माझें नांव बदललें आणि मला ' कुसुम ' ह्या नांवानें तुमच्या मातेच्या स्वाधीन केलें."

नलिनीचें भाषण हेमचंद्र बाबू मुकाट्यानें ऐकत होता. थोड्या वेळानें तो म्हणाला, " एका अर्थी तुझ्या पित्याचें सांगणें योग्य आहे. नलिनी ती तूंच असें जर मातेला कळलें तर ती तुझ्याबरोबर आतांसारखी मोकळ्या मनानें वागणार नाहीं पण नलिनी हें असें किती दिवस चालणार ? ह्याच्यापुढें आपण काय करावें ? तुला कांहीं उपाय सुचतो का ?"

हा प्रश्न ऐकतांच नलिनीनें क्षणभर हेमचंद्र बाबूकडे पाहिलें. आणि " बाबू तुम्हींच कांहीं तरी उपाय सांगा " असें म्हणून तिनें स्फुंदत स्फुंदत त्याच्या गळ्याला मिठी मारिली.

वाचकहो ! ह्या शिवाय तिला दुसरा तरी काय विचार अशा स्थितींत सुचणार ! दुर्दैवी जोडपें दुसरें काय !

## ९

## गुप्त मंडळ

पांच वर्षांपूर्वी, पन्नास वर्षांपूर्वी, शंभर वर्षांपूर्वी अनुक्रमें जर आपण नजर दिली तर सध्यांच्या स्थितींत कसकसा फरक पडत गेला आहे तो खरोखरच मनन करण्यासारखा आहे असें दिसून येईल. जें लख् लख् दिसतें तें सर्वच सोनें नसतें, अशी आतां सर्वांची बालंबाल खात्री झाली आहे. सामाजिक, नैतिक, धार्मिक वगैरे बाबतींत झालेल्या स्थित्यंतराची म्हणा अगर क्रांतीची म्हणा येथें जास्त वाच्यता करण्याची कांहींच जरूरी नाहीं. आमची बाह्यस्थिति कितीहि सुधारली तरी त्याचा उपभोग सध्यां आम्हीं कितपत घेत आहोंत हा एक प्रश्नच आहे ! परंतु आमची अंतःस्थिति कशी आहे, याचा जर विचार केला तर गेले दिवस ते जेमतेम समाधानाचे गेले आणि पुढें येणार ते अत्यंत चिकट असेंच आपणाला दिसून येईल. पांच रुपयांपासून तों पांचशें रुपये मिळविणाऱ्याला देखील हाच नियम लागू आहे. आमची अशी खालावलेली स्थिति होण्याला डामडौल, छानछकोरपणा, फाजील वस्तूंची आवड वगैरे शेंकडों कारणें असतील, त्याला कांहीं इलाज नाहीं कारण आजच्या सुधारलेल्या काळाला तो एक मनुष्यस्वभावच बनला आहे. परंतु त्यांतल्या त्यांत अंथरूण पाहून पाय पसरले तर पुढें येणारे दिवस तरी इतके बिकट वाटणार नाहींत अशी निदान माझी तरी समजूत आहे. कदाचित् ह्या सुधारलेल्या काळांत माझी ही समजूत चुकिचीहि असेल. असो. एकंदरीनें कांहीं जरी कारणें असलीं तरी सांप्रत आपली स्थिति फारच शोचनीय झाली आहे खरी ! प्राप्ती-पेक्षां खर्च जास्त, त्यामुळें वरचेवर नवे नवे सावकार पाहण्याचा प्रसंग ! आजचा दिवस गेला उद्यांचा कसा जाईल ही काळजी ! अशामुळें प्राप्तीकरितां नीतिमत्तेस फांटा मिळूं लागला आहे.

जास्त प्राप्तीकरितां जे कांहीं निरनिराळे मार्ग असतील त्यांत अलिकडे संपाचा मार्ग बराच पुढें आला आहे. ह्या मार्गाच्या मुळाशीं ' नाक दाबलें कीं तोंड उघडतें ' हें तत्त्व आहे. त्याबद्दल येथें जास्त न लिहितां कथानकाला जितका भाग लागतो तितकाच घेऊन बाकीचा सोडून देऊं. गेल्या प्रकरणांत

वंग डिटेक्टिव्हानें आपण पोलिस खात्यांत आहोंत हें शाबित करण्याकरितां कलकत्त्याच्या पोलिसखात्याला तार केली होती हें वाचकांना आठवत असेलच, परंतु दुर्दैवामुळें त्याच संधीला कलकत्त्याच्या तार ऑफीसमध्यें संप झाल्यामुळें पुण्याहून गेलेली तार दोन दिवस उशीरां पोहोंचली. त्यामुळें बिचाऱ्या वंग डिटेक्टिव्हिाला दोन दिवस फुकटचा कारागृहवास भोगावा लागला. त्यानें सुटकेकरितां शक्य तितका प्रयत्न केला परंतु सध्यांच्या दिवसांत त्याच्या शब्दावर विश्वास ठेवतो कोण! तरी देखील त्यानें जर पुण्यांत येण्याचें खरें कारण सांगितलें असतें तर कदाचित् त्याची सुटका झाली असती. परंतु आपण इतके श्रम करून बांकपुरास फेंकलेल्या बॉंबगोळ्याचा शोध लावला तें सर्व दुसऱ्याला सांगून त्याचें श्रेय दुसऱ्याला द्यावें त्यापेक्षां दोन दिवस तारेची वाट पाहावी असें वाटून त्यानें पुण्यास येण्याचें खरें कारण कोणासहि कळूं दिलें नाहीं. तारेचें उत्तर येण्याला जसजसा वेळ लागूं लागला तसतसें त्याचें मन उतावीळ होऊं लागलें. दोन दिवसांत हेमचंद्र बाबूचे आणि रघुनाथाचे काय काय बेत झाले असतील त्यानीं काय काय व्यूह रचले असतील याची त्याला कल्पना होईना. त्या दोन दिवसांत नलिनीच्या पित्यापेक्षां हेमचंद्र बाबूचाच त्याला जास्त संशय येऊं लागला. हेमचंद्र बाबू नलिनीला भेटला म्हणूनच ते तांतडीनें मुंबई सोडून पुण्यास आले. तेव्हां नलिनीच्या पित्याचा—त्या वृद्ध मनुष्याचा संशय घेण्यापेक्षां ह्या सर्व नाटकाचा हेमचंद्र बाबूच सूत्रधार असावा असें त्याला वाटूं लागलें. तथापि त्याच्या विचारांत कितपत तथ्यांश होता हें वाचकांस माहित आहेच.

पहिला दिवस हेमचंद्र बाबूला आणि नलिनीला बराच त्रासदायक गेला. ओळख असून ओळख द्यावयाची नाहीं, परकेपणा दाखवायचा म्हणजे दोघांनाहि निव्वळ सासुरवास! एक दिवस दोघांनींहि जेमतेम सासुरवास काढला. परंतु दुसऱ्या दिवशीं दोघांच्याहि वर्तणुकींत थोडा फरक पडला. नेत्रखुणा, हस्तसंकेत, हास्य, तसेंच शीतलेच्या परोक्ष एखाद दुसरा शब्द येईपर्यंत त्यांची मजल आली. प्रणयी जोडपें एकत्र असल्यावर असा कांहीं तरी प्रकार सुरू व्हावयाचाच. तिसऱ्या दिवशीं सकाळीं शीतला, हेमचंद्र बाबू आणि नलिनी एकत्र चहा घेत बसलीं असतां हेमचंद्र बाबूच्या नांवाची एक तार आली. पत्र

येण्याचा क्वचित संभव तों तार आलेली पाहून शीतला थोडी घोटाळयांत पडली. हेमचंद्र बाबू तार घेण्याकरितां उठला.

" कोणाची तार ? " शीतलेनें विचारलें.

" रघुनाथाची तार आली आहे. " तार वाचीत वाचीत हेमचंद्र बाबू म्हणाला, " तो म्हणतो, सर्व शोध लागला. रात्रीं १० वाजतां स्टेशनवर यावें. मनुष्य दाखवितों.

" खुनी मनुष्याचा शोध लागला वाटतं ! " नलिनी एकदम मध्येंच म्हणाली. परंतु क्षणभरानें आपण इतक्या उघड रीतीनें हेमचंद्र बाबूबरोबर शीतले समक्ष बोललों याचें आश्चर्य वाटून ती अगदीं खजील झाली. तिचा तो उघड प्रश्न ऐकून हेमचंद्र बाबूहि थोडा गोंधळला. शीतलेला मात्र तिनें उत्सुकतेनें विचारलेल्या प्रश्नाचें कौतुक वाटून म्हणाली, " होय. लागला असं दिसतं म्हणून तर त्यानें तार केली. "

हेमचंद्र बाबूनें रात्रीं दहा वाजतां रघुनाथानें बोलविल्याप्रमाणें कल्याणला जाण्याची गाडी पाहिली. पुण्याहून संध्याकाळीं पावणे सहाला एक गाडी सुटून ती बरोबर दहाला कल्याण स्टेशनवर पोहोंचते. त्याच गाडीनें जाण्याचा त्यानें विचार केला. इतक्या लवकर रघुनाथानें सर्व शोध लावला; इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष खुनी मनुष्यहि तो आपणास दाखविणार हा विचार त्याच्या मनांत येऊन फ्रान्सच्या प्रख्यात लिकॉक डिटेक्टिव्हाची आणि इंग्लंडच्या प्रख्यात सेक्शन ब्लाक डिटेक्टिव्हाची त्याला आठवण झाली. रघुनाथ हा खासगी गुप्त पोलिस होता. त्यानें आपल्या अचाट बुद्धिसामर्थ्यानें आजपर्यंत चांगलें नांव मिळवून पुष्कळ पैसा मिळविला होता. मोठमोठे गुंतागुंतीचे खटले पोलिसच्या हातून सुटले नाहींत कीं ते सर्व रघुनाथाकडे येत. त्याच्या अलौकिक गुणावरून एक वेळ पोलिस कमिशनरनें त्याला दरमहा दोनशें रुपयांवर गुप्त खात्यांत मुख्याची जागा घेण्याची भीड घातली होती, परंतु रघुनाथानें आपला स्वतंत्रपणा दोनशें रुपयांला विकला नाहीं. नाहींतर अलीकडे 'हेर' ह्या शब्दाची विटंबना करणारे, आपलें स्वातंत्र्य आठ दहा रुपयांला विकणारे गल्लोगल्लींत भिक्षान्देही करतांना कितीतरी दृष्टीस पडतात. अशांना डिटेक्टिव्ह—हेर म्हणण्यापेक्षां ' चहाड खोर ' हेंच नांव जास्त शोभतें.

रात्रीं दहा वाजतां हेमचंद्र बाबू कल्याण स्टेशनवर उतरला. त्यावेळीं

कलकत्त्यास जाणारी मेल येण्याचा वेळ झाला असल्यामुळें पोर्टर लोकांची एकच गर्दी उडली होती. हेमचंद्र बाबूनें रघुनाथाचा सर्व स्टेशनवर तपास केला, परंतु रघुनाथ कांहीं त्याला दिसेना. इतक्यांत कलकत्ता मेल आली. सेकंड क्लासचा डबा उघडून रघुनाथ खालीं उतरला.

" बाबूसाहेब, तुम्हांला खुनी मनुष्य पाहिजे आहेना ? चला तर. " हेमचंद्र बाबूजवळ जाऊन रघुनाथ म्हणाला, " मजबरोबर तुम्हांला बांकपुरास आलें पाहिजे. पण फक्त मजबरोबर येऊन भागावयाचें नाहीं. थोडावेळ तुम्हांला मजप्रमाणें डिटेक्टिव्ह बनलें पाहिजे. "

" बांकपुरास ! इतक्या लांब—"

" होय चला. गाडींत सर्व सांगतों. पण पहिल्यानें तुम्हांला घरीं कळविलें पाहिजे. "

चार दिवस आपली वाट पाहूं नये अशा अर्थाची हेमचंद्र बाबूनें घरीं तार केल्यावर दोघेहि एका सुट्या सेकंड क्लासांत येऊन बसले. ते ज्या डब्यांत बसले त्याच डब्यांत दुसरा एक मनुष्य अंगावर ब्लांकेट घेऊन निजला होता. थोड्या वेळानें गाडी चालू झाली.

" बाबूसाहेब आतां आपण थोडावेळ विश्रांती घेऊं. रात्र फार झाली आहे. बांकपुरास जाण्यापूर्वी आपणापुढें सबंध एक दिवस आहे. सकाळीं आपण खांडवा जंक्शनवर उतरूं. तेथें थोडा उपहार करूं आणि मग ताजेतावाने झाल्यावर सावकाश चित्तानें मी आपणाला सर्व हकिकत सांगतों. पडा तर आतां. थोडी विश्रांती घ्या. "

असें म्हणून रघुनाथ एका बांकावर लवंडला. रघुनाथानें आपणाला सर्व हकिकत आतांच सांगावी असें त्याच्या मनांत फार होतें. परंतु रघुनाथानें नुकतेच उच्चारलेले शब्द आणि त्याचें शांत वर्तन पाहून त्याच्यापुढें एकहि अक्षर उच्चारायाचें त्याला धैर्य होईना. तोहि मुकाट्यानें रघुनाथाच्या बाजूला खिडकीच्या तावदानावर डोकें टेंकून स्वस्थ पडला. त्याचें शरीर मात्र हालचाल केल्याशिवाय स्तब्ध होतें. परंतु डोक्यांत गाडीच्या इंजिनापेक्षांहि जास्त वेगाचें विचारांचें इंजिन चालू होतें. हळू हळू थळघाटाचा थंड वारा त्या इंजिनाला लागतांच त्याचीं यंत्रें शिथिल पडूं लागलीं.

सकाळीं सात वाजतां गाडी खांडवा जंक्शनवर उभी राहिली. आमचा

कथानायक आणि रघुनाथ खालीं उतरले. स्टेशनवर तोंड धुवून दोघांनीं रिफ्रेशमेंट रूममध्यें थोडा उपहार केला. आणि पुनः ते गाडींत येऊन बसले. थोड्या वेळानें त्याच डब्यांत बसलेला तिसरा प्यासेंजर तोंड वगैरे धुवून आपल्या जागेवर येऊन बसला. त्याच्या अंगांत बनातीचा लांब आंगरखा होता. खिडकीजवळ बसतांच त्यानें आपला आंगरखा काढून ठेवला. त्यानें डाव्या हाताला फडका गुंडाळला होता त्यावरून त्याचा हात मोडला असावा अगर हाताला कांहीं तरी जखम झाली असावी असें वाटतें. एकवेळ त्यानें हेमचंद्र बाबूकडे पाहिलें आणि तोंड फिरवून तो खिडकीबाहेर पाहूं लागला.

" रात्रीं मी आपणाला कांहींच गोष्ट सांगितली नाहीं त्यामुळें तुमचें मन अस्वस्थ झालें असेल. खरेंना ? " कोपऱ्यांत बसलेल्या त्या तिसऱ्या प्यासेंजरकडे पाहून रघुनाथ म्हणाला, " पण बाबूसाहेब काल मी इतका दमलों होतों, कीं मी केव्हां विश्रांति घेईन असें मला झालें होतें. आणि काल रात्रीं जर मी सर्व हकिकत सांगण्यास सुरवात केली असती तर ती आतांपर्यंत सांगण्याची संपली नसती. " पुन्हां रघुनाथानें त्या कोपऱ्यांत बसलेल्या इसमाकडे पाहिलें. हेमचंद्र बाबू मुकाट्यानें बसला होता. रघुनाथ केव्हां हकिकत सांगतो याची तो वाट पहात होता.

" बाबूसाहेब, ज्या मनुष्यानें तुमच्या पित्याचा खून केला असं तुम्ही म्हणतां तो मनुष्य खरोखरच फार घोरणी आणि धूर्त आहे, यांत कांहीं शंका नाहीं. तुम्हांला मी ज्या दिवशीं मुंबईत बोलविलें होतें त्याच्या दुसऱ्या दिवशीं म्हणजे मंगळवारीं रात्रीं मी नलिनीच्या घरीं गेलों होतों. तों आंत कोणीतरी कुजबुजतात असें मला आढळून आलें. दरवाजा आंतून बंद केला असल्यामुळें त्यांचें भाषण मला स्पष्ट ऐकूं आलें नाहीं. तरी माझ्या कामापुरतें मला त्यांचें भाषण कळलें. आवाजावरून त्या पैकीं एक नलिनीचा बाप होता. दुसरा आवाज मात्र माझ्या ओळखीचा नव्हता. परंतु त्या दुसऱ्या मनुष्याच्या आवाजावरून तो मनुष्य हुकमी असावा अशी माझी खात्री झाली आहे. कारण नलिनीचा बाप शशिभूषण बाबू त्याच्यापुढें अगदीं लीनतेनें बोलत होता. " रघुनाथानें कोपऱ्यांत बसलेल्या मनुष्याकडे पाहिलें. तो मनुष्य त्याचें भाषण चित्त देऊन ऐकत होता परंतु तें रघुनाथाच्या

लक्ष्यांत आलें नाहीं. तो पुढें म्हणाला, " तो मनुष्य शशिभूषणाला म्हणाला " हें पहा, दिनेशानें आपलें वचन मोठ्या धैर्यानें पाळलें त्याप्रमाणें तूंहि पाळलें पाहिजे. तुमच्या म्हणण्याप्रमाणें तुमच्या मुलाबाळांवर लक्ष्य देऊन मी तुम्हांला बारा वर्षांची मुदत दिली. तेव्हां आतां जर तूं स्वसंतोषानें वचन पाळण्यास खुषी नसलास तर मग मलाच तें काम केलें पाहिजे. तुझें पत्र मी बांकपुरास गेल्यावर पहिल्यानें—गाडींतून उतरतांच पहिल्यानें पोष्टांत टाकतों. हें घे वचन — बोल, तुझें काय म्हणणें आहे. मला येथून गुरुवारीं रात्रींच्या कलकत्ता मेलनें गेलेंच पाहिजे. ' हें त्याचें भाषण ऐकून बऱ्याच वेळानें शशिभूषण म्हणाला ' बरें आहे मजकडून सर्व तयारी आहे. इतके दिवस मी चुकवाचुकव केली परंतु तो माझा मुर्खपणा होय ! मला फक्त मुलीचीच काळजी होती पण आतां तिच्याविषयीं काळजी करण्याचेंही कांहीं कारण नाहीं. फक्त आतां इतकेंच कीं, तें पत्र होतां होईल तितकें लवकर तिला मिळालें पाहिजे. " त्यावर तो मनुष्य म्हणाला, ' तुला सांगितलें ना—तूं पत्राविषयीं काळजी करूं नको म्हणून. मी कसा मनुष्य आहें—' इतकेंच त्याचें भाषण मी ऐकलें. पुढें एकदम सर्वत्र सामसुम झालें. ते दोघेजण तेथून केव्हां पळाले, कसे पळाले, तें देखील मला कळलें नाहीं. मी पुष्कळ शोध केला परंतु कांहींच पत्ता लागला नाहीं. त्यांत जर मी त्या दुसऱ्या मनुष्याचा चेहरा पाहिला असता तर हा बांकपुरास जाण्याचा द्राविडी—प्राणायाम करण्याची मुळींच जरूरी नव्हती. त्यांतूनहि हे श्रम मी टाळले असते परंतु मध्यंतरी इतर कामामुळें त्याच्याकडे ढुंकुनहि पहावयास मला वेळ मिळाला नाहीं. नाहींतर हरप्रयत्न करून तो कोण ? काय ? वगैरे सर्व शोध केला असता. "

" मग आतां बांकपुरास जाऊन तरी तो मनुष्य तुम्हीं कसा ओळखूं शकाल ?"

" फक्त खुणेवरून. त्याशिवाय दुसरा इलाज नाहीं ! बांकपुरास उतरल्यावर त्या मनुष्याचें पहिलें काम पोष्टांत पत्र टाकण्याचें ! आतां ह्या गाडींत कोण कोण आहेत ते सर्व मी पाहून ठेविले आहे. त्यांपैकीं कोण मनुष्य बांकपुरास उतरतो तेवढें पहावयाचें म्हणजे झालें. तेव्हां बांकपूर स्टेशनवर उतरून जो मनुष्य पहिल्यानें पोष्टांत पत्र टाकील तोच मनुष्य आपला."

" मला नाहीं वाटत अशा रीतीनें आपण तो मनुष्य ओळखूं शकूं म्हणून ! " हेमचंद्र बाबूनें निराशयुक्त उद्गार काढले.

रघुनाथाची हकीकत सांगून संपल्यावर ते दोघेजण कांहीं वेळ स्तब्ध बसले. परंतु इतका वेळपर्यंत स्तब्ध बसलेला कोणऱ्यांतील तिसरा मनुष्य आतां हालचाल करूं लागला. आमचा कथानायक स्तब्ध बसलेला पाहून तो मनुष्य हळूच उठला आणि त्याच्याजवळ जाऊन म्हणाला, " तुमचें नांव हेमचंद्र दिनेशचंद्र बोस का ? "

अनोळखी मनुष्यानें आपलें नांव घेतलेलें पाहून हेमचंद्र बाबू आश्चर्यानें थक्क झाला.

" तुमचें सर्व भाषण मी ऐकिलें. " तो मनुष्य रघुनाथकडे वळून म्हणाला, " तुम्हीं ज्या मनुष्याला भेटण्याकरितां म्हणा अगर पकडण्याकरितां जात आहांत तोच मनुष्य मी. " असें म्हणून तो त्यांच्या समोरच्या बाकांवर बसला. " तुमच्या एकंदर भाषणावरून तुम्हीं मला पकडण्याकरितां जात नाहीं असें दिसतें. असें जर आहे तर इतक्या लांबचा प्रवास करण्याचें तुम्हांला काय कारण ? "

हा त्याचा प्रश्न खरोखरच फार चमत्कारिक होता. त्याचें काय उत्तर द्यावें तेंच हेमचंद्र बाबूला सुचेना. इतके दिवस खुनी मनुष्य कोण तें समजण्याची त्याला फार उत्कंठा लागली होती, परंतु आतां जेव्हां प्रत्यक्ष खुनी मनुष्य त्याच्यापुढें येऊन उभा राहिला तेव्हां तो अगदीं भांबावल्यासारखा झाला. रघुनाथाच्या मनांत कांहीं निराळेच विचार चालू होते. पुढचें स्टेशन येतांच त्याला पकडण्याचे त्याचे विचार चालू होते. दोघांची ती गोंधाळलेली स्थिती पाहून तो मनुष्य म्हणाला, " तुमच्या दोघांच्या मनांत काय काय विचार चालले आहेत ते मी जाणले. " रघुनाथाकडे वळून तो म्हणाला, " तुमच्या मनांत मला चतुर्भुज करावें असें आहे. " आणि हेमचंद्र बाबूकडे वळून म्हणाला—" तुमच्या मनांत तुमच्या पित्याच्या मृत्युबद्दल खरी हकीकत काय आहे तें समजून घेण्याचें आहे. खरें ना ? असें जर आहे, तर बांकपुरास जाण्याचे मी तुम्हांला व्यर्थ श्रम देत नाहीं. आतां येणाऱ्या इटारसी जंक्शनवर आपण सर्वजण उतरूं. तेथें मी तुम्हांला सर्व खऱ्या गोष्टीचा उलगडा करतों. आणि मग तुमच्याच परवानगीनें—तुम्ही स्वसंतोषानें दिलेल्या परवानगीनें मी पुढें जाईन आणि तुम्ही परत घरीं जा. "

त्या मनुष्याचें भाषण ऐकून चकितमुद्रेनें ते दोघेजण त्याच्याकडे पहात

राहिले. विचारतरंगांत दोघांचीं मनें इतकीं गुरफटून गेलीं होतीं कीं, त्याला काय उत्तर द्यावें हेंच त्यांना सुचेना. थोड्या वेळानें गाडीचा वेग कमी कमी होत जाऊन शेवटीं ती उभी राहिली. तेव्हां तो मनुष्य म्हणाला " आतां विचार नका करूं. चला हें इटारसी स्टेशन आलें. "

तिघेजण गाडींतून खालीं उतरले. स्टेशनच्या रिफ्रेशमेंट रूममध्यें बसल्यावर त्या मनुष्यानें खालील हकीकत सांगण्यास एकदम सुरवात केली.

" पुढें दोन तासांनीं मला एक गाडी आहे तेव्हां आतां व्यर्थ वेळ घालविण्यांत अर्थ नाहीं. मी, क्रमाक्रमानें सर्व हकिकत सांगतों ऐका—"

" बारा वर्षांपूर्वी मी * * आफीसमध्यें मोठा कारभारी होतों. माझ्या हाताखालीं तुझा बाप—दिनेशचंद्र बाबू काम करीत असे. निरनिराळ्या कचेऱ्यांमधून येणाऱ्या रिपोर्टावर मी मुख्य कारभारी असल्यामुळें योग्य शेरा मारून ते रिपोर्ट वरिष्ठ अधिकाऱ्यापुढें मी पाठवीत असें. परंतु माझे शेरे छेक छेक करून सरकारच्या फायद्याचे असे नवे शेरे मारुन आमचा अधिकारी ते रिपोर्ट मंजुरीकरितां पाठवी. अर्थात् ते रिपोर्ट मंजूर होत आणि त्यामुळें आपल्या गरीबगुरीब लोकांचें हजारों रुपये नुकसान होई. तें पाहून माझ्या जिवाची आग होत असे. आणि त्यावरून अधिकाऱ्याबरोबर माझें कडाक्यानें बोलणें होई. आमच्या लोकांना—अर्थात् गरीब लोकांना योग्य न्याय कसा मिळेल याचा मी नेहमीं विचार करीत असें. आमच्या गरीब शेतकरी लोकांना ह्या अधिकारी वर्गापासून कसा त्रास पोंचतो याचा आम्ही वरवर विचार न करतां अगदीं मुळाशीं जाऊन शोधक दृष्टीनें विचार करून पाहिला तर त्या गरीब लोकांना भोगावा लागणारा त्रास पाहून आपल्या अंतःकरणाचे शतशः तुकडे होतील. एके दिवशीं वरील विचारांनीं माझें डोकें अगदीं भणाणून गेलें होतें. तो दिवस रजेचा होता. मी एकटाच विचार करीत घरीं बसलों असतां तुझा बाप आणि त्याच्या हाताखालचा एक कारकून मजकडे गप्पा गोष्टी करण्याच्या उद्देशानें आले आणि माझी खिन्न मुद्रा पाहून माझ्या खिन्नतेचें कारण खोदखोदून विचारूं लागले. " इतक्यांत रिफ्रेशमेन्टचा मनुष्य 'काय पाहिजे ?' असें विचारण्याकरितां आला. त्याला कांहीं जिन्नस आणण्यास सांगून तो मनुष्य पुढें म्हणाला. " बारीक दृष्टीनें विचार केला तर आपणाला असें दिसून येईल कीं, आपलें सरकार

फारच दयाळू आहे. सरकारचे नियम, वर्तन सर्व कांहीं आपल्या हिताचें आहे. परंतु मादरचोद हे अधिकारी लोक मोठे लुच्चे आणि आतमतलबी असतात. वस्तुस्थिती असते ऐक आणि ह्यांच्या रिपोर्टावर लेखणींतून निघतें भलतेंच. तेव्हां ह्या लोकांना ताळ्यावर आणण्याची आपण पहिल्यानें खटपट केली पाहिजे. असो. मी माझे सर्व विचार आणि पुढले बेत त्या दोघांना सांगितलें. त्यावेळीं आपल्या येथें दुष्काळ पडला असल्यामुळें एकतर गरीब लोकांचे हाल होत होते. त्यांत सावकार त्यांना नाडत होते. शिवाय हा अधिकारीवर्ग तर त्यांना पिळून काढीत होता. तेव्हां अशा दुष्टांना चांगला धडा शिकविण्याकरितां आम्ही तिघांनीं मिळून एकमतानें १ एप्रील १८९६ त त्रिमंडळाची स्थापना केली. जोसेफ म्याझिनीनें ज्याप्रमाणें राजसत्तेला धाब्यावर बसवून स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न केला, त्याप्रमाणें करण्याकरितां कांहीं आम्ही त्रिमंडळाची स्थापना केली नाहीं. कारण आजपर्यंतच्या इतिहासावरून माझी पूर्ण खात्री झाली आहे कीं, क्रांतीचा काळ समीप आल्यावर ती क्रांति घडूं न देण्याची कोणत्याहि मानवी प्राण्यांत शक्ति नाहीं. ती क्रांती खुषीनें किंवा बळजबरीनें घडून यावयाचीच. आमच्या त्रिमंडळाचा मुख्य उपदेश फक्त आपल्या गरीब देशबांधवांचा इतर सत्ताधारी माणसांकडून होणारा त्रास—छळ कमी करावा हाच होता. आम्हीं पुष्कळ विचार केला. चांगल्या चांगल्या लोकांच्या साहाय्यानें सावकार लोकांना भीड घातली, सरकारला अर्ज केले, पण छे ! सावकार वळेनात, कीं सरकार जबाब देईना ! जबाब तरी मिळतील कसे ! ते अर्ज शेवटच्या पायरीपर्यंत जातील तेव्हांना ! शेवटीं त्रासून आम्हीं आमचे नियम अमलांत आणण्याचा निश्चय केला. आमच्या त्रिमंडळाचे आम्हीं तिघांनी मिळून साधक बाधक असे बारा नियम केलें. ते नियम आम्ही इतके कडक केले कीं, हातीं घेतलेल्या कामाकरितां प्राण खर्ची घालण्याचा जरी प्रसंग आला तरी मागें पुढें पहावयाचे नाहीं. अशाबद्दल आम्हीं शपथा घेतल्या. आणि नोकरीचे राजीनामे दिले. ”

आमचा कथानायक आणि रघुनाथ त्या मनुष्याचें भाषण चित्त देऊन ऐकत होते. इतक्यांत एका मनुष्यानें चहा आणि कांहीं फराळाचें आणून त्यांच्यापुढें टेबलावर ठेविलें. चहा पीत असतां तो मनुष्य पुढें म्हणाला,

" आम्ही जे नियम केले त्यांपैकीं कांहीं तुम्हांला सांगतों. जेवढे दुष्ट लोक होते त्यांचीं नांवें चिठ्यांवर लिहून सोडतीप्रमाणें त्यांतील एक चिठ्ठी उचलून त्यांत जें नांव येईल त्याला बारा तासांच्या आंत त्याच्या दुष्ट कृत्याचा जाब देण्याकरितां पाठवावें. तें काम करण्याला देखील आम्ही आमच्या नांवाच्या तीन चिठ्या करून त्यांतील दोन उचलाव्या आणि त्या दोघांनीं तें काम पार पाडावें हा एक नियम. दुसरा—त्या दोघांनीं ठरलेलें काम त्या वेळांत जर न केलें तर तिसऱ्यानें त्या दोघांना ठार मारावें. असा भयंकर नियम करण्याचें मुख्य कारण इतकेंच कीं, मरणाच्या तरी भीतीनें आम्हीं नेमलेलें काम नीट बजावूं.-परंतु हाय हाय ! ईर्षेच्या भरांत केलेल्या नियमानें उलट आमचेच बळी घेतले. असो. असे एकंदर साधकबाधक आम्हीं बारा नियम केले. आमची पहिली बैठक ता. २९ एप्रील १८९६ त झाली. त्या बैठकींत आम्हीं चिठ्या टाकल्या. पहिल्या चिठींत एका धनलोभ्या, कंजूष—दुष्ट सावकाराचें नांव आलें. आणि दुसऱ्या दोन चिठ्यांत तुझ्या बापाचें आणि त्याच्या मित्राचें नांव होतें. परंतु आमच्या इष्टकार्यास मनाची जितकी तयारी पाहिजे होती तितकी त्यांच्या मनाची नव्हती. नाहीं तर आजकाल आपल्या अविश्रांत श्रमानें, अलौकिक स्वार्थत्यागानें आणि असाधारण धैर्यानें ज्यांनीं आपलीं नांवें सर्वत्रांच्या तोंडीं केलीं आहेत. त्यांत त्यांच्या नांवाचा पहिला नंबर लागता ! पण दुर्दैवानें तें कार्य त्यांच्या हातून पार पडलें नाहीं. पुन्हां आमची दुसरी बैठक ता. १ मे १८९६ त झाली. त्या बैठकींत नियमाप्रमाणें त्या दोघांना मारण्याचें माझ्या नशीबीं आलें. हाय हाय ! त्यावेळीं आमची तिघांची स्थिति काय झाली असेल याची कोणालाहि कल्पना व्हावयाची नाहीं. आम्हांला आम्ही मूर्खपणानें घेतलेल्या शपथेचा पूर्ण पश्चात्ताप झाला; परंतु काय उपयोग ! देशहिताचीं कामें अशीं तडकाफडकीनें होत नसतात; याचा आम्हांस पूर्ण अनुभव आला. देशहितकार्याचें जें बी आम्हीं आतां पेरतों त्याचें पुढल्या पिढीला झाड होईल आणि त्या झाडाचीं मधुर फळें त्याची पुढली पिढी चाखील. इतका ह्या देशहितकार्याला वेळ लागतो. परंतु दुर्दैवानें जर त्याला मध्येंच कीड लागली तर आटोपलाच बाजार ! ज्या दिवशीं आमची ती बैठक झाली, त्याच दिवशीं दिनेशचंद्राची पत्नी म्हणजे तुझी आई वारली. एकंदरीनें त्या दिवसापासून आमच्या दुर्दैवाला सुरवात

झाली. त्या दोघांच्या विनवणीवरून मी त्यांना बारा वर्षांची मुदत दिली. बारा वर्षांत आपल्या मुलाबाळांची सर्व व्यवस्था करावी, इतक्याच करितां ती मुदत होती. बारा वर्षांनीं आपण मरणाला तयार आहोंत असें त्यांनीं मला लिहून दिलें होतें. त्यावर सह्या करतांना ‘ इतःपर अशा भानगडींत पडावयाचें नाहीं ’ अशा दुसऱ्या शपथा त्यांनीं घेतल्या. पुढें दोघांनीं आपलीं मुलें बाळें घेऊन कलकत्ता सोडला. मी मात्र आज बारा वर्षें स्वदेशकार्याला हा देह झिजविला. बारा वर्षें पूर्ण होतांच मीं दोघांना त्यांच्या वचनाची आठवण देऊन तें पुरें करण्याकरितां १ मे १९०८ ला कलकत्त्याला बोलाविलें. परंतु त्या दिवशीं नेमलेल्या ठिकाणीं जात असतां कोणी दुष्टानें बाँबगोळा फेकला, त्यामुळें मी जखमी होऊन पडलों. ही पहा अद्यापि माझ्या हाताची जखम बरी झाली नाहीं. ”

असें म्हणून त्यानें आपला डावा हात पुढें करून हेमचंद्र बाबूला आणि रघुनाथाला दाखविला. अद्यापि टेबलावर चहा आणि फराळाचें सामान तसेंच पडलें होतें. तें पाहून तो म्हणाला, “ अरेरे ! चहा तर अगदीं थंड होऊन गेला—”

“ होऊं द्या. पहिल्यानें तुम्हीं हकीकत सांगा. मग सावकाश चहा घेऊं. ” हेमचंद्र बाबू म्हणाला.

“ ह्या हाताच्या जखमेमुळें मी आठ दिवस हॉस्पिटलमध्यें पडलों होतों. तेथून सुटका होतांच मी पुण्याला गेलों आणि तुझ्या पित्याला भेटलों. वचनाप्रमाणें दिनेशचंद्र बाबू मरणाला तयार होता. त्यावेळीं वचन पाळण्यांत त्यानें दाखविलेलें धैर्य पाहून मला फार आनंद झाला. मी त्याला एक पिस्तूल दिलें. आणि घर सोडून मी दूर गेल्यावर त्यानें स्वतःवर पिस्तुल उडवावें असें ठरलें. कारण मी जर त्याला स्वतः मारलें असतें तर पोलिसनें मला तेथेंच चतुर्भुज केलें असतें. आणि शशिभूषण मरायचा राहिला असता. मी घर सोडून बराच दूर गेल्यावर पिस्तुलाचा आवाज माझ्या कानीं आला. माझें एक काम झालें. तेव्हां मी दुसऱ्या कामाला लागलों. गेल्या मंगळवार पर्यंत मला शशिभूषण बाबूचा पत्ता लागला नव्हता. तो इतका भित्रा असेल असें मला पहिल्यानें वाटलें नव्हतें. शेवटीं भायखळ्यावर एका गल्लींत त्याचा मला शोध लागला. त्यानेंहि वचन पाळलें—”

" म्हणजे त्याचाहि खून झाला ?! " आश्चर्यानें हेमचंद्र बाबूनें विचारलें.

" खून ! त्याला तूं खून म्हणतोस !—नाहीं. आपलें वचन खरें करण्याकरितां त्याला मृत्यु आला असें म्हण. आपल्या पूर्वजांनीं वचनाकरितां प्राण देखील दिले आहेत, अशीं शेंकडों उदाहरणें तुला आठवतील. त्याला देखील त्यांचे खून झाले असें म्हणशील काय ?—नाहीं. "

बराच वेळ ते तिघेही गप्प होते. वरील हकीकत कोण सांगत आहे तें आतां वाचकांच्या पूर्ण लक्षांत आलेंच असेल. हा मनुष्य सुबोधचंद्र पाल होता. थोड्या वेळानें रघुनाथकडे वळून तो म्हणाला, " मला बांकपुरास जाऊन शोधण्याबद्दल तुम्हीं योजलेल्या युक्तीवरून तुमच्या चातुर्याची चांगलीच साक्ष पटते. बाकी त्या युक्तीचा कांहींच उपयोग झाला नसता. कारण शशिभूषणानें दिलेलें पत्र मी भायखळयाच्याच पोष्टांत टाकलें. आतां तुमच्या मनांतून मला चतुर्भूज करावयाचें असेल तर मी इतकेंच सांगतों कीं, मरणाचें आतां मला भयच नाहीं. कारण हें पहा. " असें म्हणून त्यानें आपल्या खिशांतील पिस्तूल बाहेर काढून दाखविलें. " माझे मित्र वचनामुळें मला सोडून गेले, आतां मला जगण्याची इच्छा नाहीं. आणि माझ्या मागें शोक करणाराहि कोणी नाहीं. तुम्हीं मला आतां पकडण्याचा प्रयत्न कराल तर मी आतांच हें पिस्तुल स्वतःवर उडवीन. परंतु त्यामुळें तुम्हीं मात्र संकटांत पडाल. शिवाय मला पकडल्यापासून तुमचा कांहींच फायदा होणार नाहीं. मी येथून बांकपुरास पोहोंचतांच शनिवारीं दुपारीं हें पिस्तूल स्वतःवर उडवून घेईन. "

सुबोधचंद्र पालचें भाषण ऐकून बोलल्याप्रमाणें वागणारा तो मनुष्य आहे. अशी दोघांची पूर्ण खात्री झाली.

---

वंग डिटेक्टिव्हाला अटकेंतून सोडतांना पोलिस अंमलदारानें आपली पूर्ण दिलगिरी दाखविली. कारण कलकत्त्याहून तारेच्या उत्तरांत त्याचा बराच स्तुतिपाठ गाइला होता. ' आपण विचारलेला मनुष्य हा येथील एक प्रख्यात आणि हुषार डिटेक्टिव्ह असून १ मे रोजीं बांकपूर येथें फेंकलेल्या बॉंबचा शोध लावण्याकरितां तेथें गेला आहे. आमची खात्री आहे कीं, तो बॉंबचा खात्रीनें शोध लावील ' अशा अर्थाचें गौरवयुक्त तें तारेचें पत्र होतें.

गेल्या प्रकरणांत वंग डिटेक्टिव्ह अटकेंत असतां त्याचे थोडेसे विचार वाचकांस ठाऊक आहेत. अनाथबालिकाश्रमांत असणाऱ्या त्या निराश्रित मुलीच्या प्रेमामुळें हेमचंद्र बाबूंनेंच हें सर्व कृत्य केलें असलें पाहिजे असें त्याच्या रिकाम्या डोक्यानें ठाम मत बनविलें. निराश्रित मुलीबरोबर लग्न करण्यास त्याच्या बापानें संमति दिली नसेल म्हणून त्याचा कांटा काढून टाकण्याकरितां त्यानेंच हें सर्व कृत्य केलें असें त्याला खात्रीनें वाटूं लागलें. सांप्रत बंगाल्यांत बॉंबचें प्रस्थ फार माजलें असल्यामुळें तेथें बॉंब उडविल्यास आपला कोणीहि संशय घेणार नाहीं, अशा उद्देशानें आपल्या बापाची पाळत ठेवून तो कामानिमित्त बांकपुरास गेला असतां तेथें जाऊन त्याला मारण्यासाठीं हेमचंद्र बाबूंनेंच बॉंब फेंकला. परंतु दुर्दैवानें तें काम फसलें. शेवटीं दिनेशचंद्र बाबू पुण्यांत परत आल्यावर त्याचा त्यानें खून केला. त्या त्याच्या सर्व कृत्यांत नलिनी आणि तिचा बाप ह्या दोघांचें पूर्ण सहाय्य असलें पाहिजे अशा भ्रामक विचारांनीं त्या हुषार आणि प्रख्यात वंग डिटेक्टिव्हाला आपल्या अंकित केलें. अटकेंतून सुटतांच त्यानें पोलिस कमिशनरला आपला सर्व विचार कळवून हेमचंद्र, नलिनी तिचा पिता आणि शीतला, इतक्या मंडळींना पकडण्याचें वारंट मागितलें. परंतु तो विचारी कमिशनर बायकांना पकडण्याचें वारंट देण्यास कबूल होईना. शेवटीं हरप्रयत्न करून बंगाली स्त्रियांचें वर्तन सध्यां कशा प्रकारचें आहे. त्या स्त्रिया किती साहसी आहेत वगैरे बऱ्याच गोष्टी कमिशनर साहेबांस सांगतांच त्याचें मन वळलें. बंगाल्यां-

तील चळवळ इतकी जोमांत येण्याला बहुतेक स्त्रियाच कारण आहेत. घरांतील पुरुषांनीं स्वदेशी चळवळीची बाजू धरण्यास नाकारलें तर त्यांच्या बायका त्यांनाच बहिष्कार घालण्याची भीति दाखवून त्यांच्याकडून हरएक काम कसें करून घेतात वगैरे एक ना दोन—हजारों खोट्यानाट्या गोष्टी सांगून त्या नीच डिटेक्टिव्हानें आपल्या निरपराधी देशभगिनींना पकडण्याचीं वारंटें मिळविलीं. शाबास रे हरामखोरा! अशा हरामखोर लोकांचीच सध्यांच्या काळांत दहा दहा कागद भरतील इतकी शिफारस व्हावयाची. असो, हा एक कालमहिमा आहे, दुसरें काय!

वारंट वारूवर आरूढ होऊन बरोबर पांच दहा पोलिसचें लष्कर घेऊन शिफारशीनें शेंफारलेले आमचे शेंदाड वीर वंग डिटेक्टिव्ह अबलांना पकडण्याच्या मोठ्या मोहिमेवर निघाले. वरील लष्कर विश्रामबागेजवळ जाऊन पोहोंचण्यापूर्वी पांचच मिनिटें हेमचंद्र बाबू आणि रघुनाथ हे सुबोधचंद्र पालला परत बांकपुरास जाण्याची स्वसंतोषानें परवानगी देऊन परत घरीं आले होते. सर्वजण दिवाणखान्यांत एकत्र बसले होते. शीतला आणि नलिनी त्यांच्या प्रवासाची हकीकत ऐकण्यास फार उत्सुक झाल्या होत्या. इतक्यांत एक युरोपियन पोलिस इन्स्पेक्टर आणि वंग डिटेक्टिव्ह आंत आले. रघुनाथराव तेथें बसलेला पाहतांच तो इन्स्पेक्टर एकदम म्हणाला, "ओ, लो, रघुनाथराव तुम्ही येथें कोठें?"

रघुनाथानेंहि तोच प्रश्न उलट त्याला केला. इन्स्पेक्टरानें आपलें येण्याचें कारण त्याला सांगितल्यावर रघुनाथ म्हणाला, "तुम्ही वारंटच जर आणलें आहे तर सर्व गोष्टीचा उलगडा कोर्टांतच होईल. एकंदरीनें कोर्टांत आज मजाच उडणार म्हणायची!"

रघुनाथाच्या तोंडचे शब्द ऐकतांच पोलिस इन्स्पेक्टरला थोडें चमत्कारिक वाटलें. आपल्या कामांत कांहींतरी चुकी झाली असावी असें त्याला वाटूं लागलें. कारण रघुनाथाची त्याला पूर्ण माहिती होती. त्यानें आपला संशय वंग डिटेक्टिव्हाला सांगितला. शिवाय रघुनाथ कोण त्याची योग्यता काय वगैरे सर्व सांगून तो पुढें म्हणाला "वारंट काढण्यांत तुमच्याकडून कांहीं तरी चुकी झाली असावी असें मला वाटतें. कारण ज्या अर्थी रघुनाथ येथें आहे त्या अर्थी तुम्हीं सांगता तसा प्रकार ह्या घरांत झाला असेल असें मला वाटत नाहीं."

परंतु वंग डिटेक्टिव्ह आपली चुकी कबूल करीना. वारंट काढण्यांत आपणां-कडून कांहींएक चुकी झाली नाहीं असें तो म्हणूं लागला. परंतु क्षणभरानें त्याचें मन थोडें अस्वस्थ झालें. आपणाकडून ह्या कामांत घाई होत आहे असें त्याला वाटूं लागलें.

रघुनाथ जवळ असल्यामुळें हेमचंद्र बाबूला वारंटाची कांहींच भीति वाटली नाहीं. थोड्या वेळानें सर्व मंडळी मॅजिस्ट्रेट कचेरींत जाण्यास निघाले. इतक्यांत कमिशनर साहेब स्वतः घोड्यावरून तेथें आले. रघुनाथाला त्या मंडळींत पाहतांच त्याला देखील इन्स्पेक्टराप्रमाणें आश्चर्य वाटलें. त्यानें विचारलेल्या प्रश्नाला देखील रघुनाथानें 'कोर्टांत सर्व मजा दिसेल.' असेंच उत्तर दिलें.

हेमचंद्र बाबूच्या घरावर सुटलेल्या वारंटाची बातमी सर्व शहरांत पसरली. मग काय ! पुणें शहरच तें ! हजार डोक्यांतून हजार तर्क वितर्क बाहेर पडूं लागले. नलिनी आणि शीतला यांची नांवें सर्वांच्या तोंडीं झालीं. बंगाल्यांत उडणारे सर्व बॉंब गोळे ह्या दोघी बायकाच करीत असतात असें कोणीं म्हणूं लागला तर दुसरा, बांकपुरास त्या मनुष्यानें बरोबर बॉंब गोळा फेंकला नाहीं म्हणून त्या दोघींनीं त्याचा खून केला असें म्हणूं लागला. अशा शेंकडों निर-निराळ्या कंड्या पिकल्या. आमची मंडळी मॅजिस्ट्रेट कचेरींत पोहोंचण्यापूर्वींच सर्व कचेरी प्रेक्षक लोकांनीं गच्च भरून गेली. वर्तमानपत्रांच्या रिपोर्टर्स लोकांचीं तर सारखी धांदल उडाली होती. एक तर पुण्यांत बंगाली पकडले, त्यांतून दोन बायका आणि विषय बॉंबगोळा व खून ! मग कां बरें त्या रिपोर्टर लोकांची धांदल उडूं नये ! त्यांना ही एक पर्वणीच झाली. असो.

अकरा वाजतां स्पेशल मॅजिस्ट्रेटपुढें कामाला सुरवात झाली. वारंटपैकीं एक इसम पोलिसला मिळाला नाहीं आणि तो कधीं मिळणारहि नाहीं. तो इसम कोण हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. तो इसम शशिभूषण— नलिनीचा पिता होय. आरोपीवर कोर्टानें आरोप वाचून दाखविल्यावर कोर्टाच्या परवानगीनें रघुनाथ बोलण्याकरितां उभा राहिला. आपण कोण आणि सध्यांच्या खटल्यांत आपला काय संबंध आहे तें सांगितल्यावर क्रमाक्रमानें सर्व हकीकत त्यानें कोर्टापुढें जशीच्या तशी मांडली आणि म्हणाला, "बारा वर्षांपूर्वीं त्रिमंडळाची स्थापना करणारा सुबोधचंद्र पाल ह्या वेळीं बंगाल्यांत मेला असेल."

" हें तुम्हीं कशावरून सांगता ? " कोर्टानें विचारलें.

" कारण आज शनिवार आहे. आज आतां ह्या वेळीं स्वतःवर पिस्तुल उडविण्याची त्यानें शपथ घेतली आहे. "

सुबोधचंद्र पालला पकडण्याविषयीं कोर्टानें ताबडतोब कलकत्त्याला तार केली. रघुनाथनें सांगितलेली हकिकत ऐकून सर्व मंडळी आश्चर्यानें थक्क झाली. जो तो आपआपसांत त्रिमंडळविषयीं कुजबुजूं लागला. इतक्यांत कोर्टाच्या कारकुनानें दोन पत्रें कोर्टापुढें दाखल केलीं. त्यापैकीं एक हेमचंद्र बाबूच्या नांवाचें व एक नलिनीच्या नांवाचें होतें, तीं दोन्हीं पत्रें नुकतीच पोष्टानें आलीं होतीं. घरावर जप्ती असल्यामुळें पोलिसनें तीं पत्रें कोर्टांत दाखल केलीं. कोर्टानें हेमचंद्र बाबूचें पत्र फोडलें. तें पत्र सुबोधचंद्र पालनें लिहिलें होतें. त्या पत्रांत त्यानें आपली सर्व हकीकत लिहिली होती. शशिभूषणानें नलिनीच्या नांवानें दिलेलें पत्र पोष्टांत टाकतांना त्यानें तेंही पत्र भायखळ्याच्या पोष्टांत टाकलें होतें. नंतर मग त्यांची गाडींत भेट झाली. इटारसी स्टेशनवर त्यानें जी हकीकत त्यांना सांगितली होती तीच सर्व त्या पत्रांत लिहिली होती. ती वाचकांस माहित असल्यामुळें येथें देत नाहीं. दुसरें पत्र शशिभूषणानें नलिनीला लिहिलेलें मात्र वाचकांकरितां जसेंच्या तसें येथें देतों—

भायखळा मुंबई,
१६ मे १९०८

' प्रियकर बाळे,

' हा तुझा हतभागी पिता हें पत्र लिहून तुला दुःखसमुद्रांत लोटून देत आहे. आजपर्यंत पिता या नात्यानें मी तुला कांहींच सुख दिलें नाहीं, परंतु माझी दुःखकहाणी ऐकून तूं मला माझ्या वर्तनाबद्दल दोष देणार नाहींस अशी पक्की खात्री आहे. तूं चार वर्षांची असतां तुझी आई वारली, त्या वेळेपासून माझ्या दुःखाला आरंभ झाला. माझें संसारांतून मन उडालें. माझें कुठल्याही गोष्टींत चित्त रमेना. मनाच्या करमणुकीकरितां रोज संध्याकाळीं मी माझ्या मित्राच्या घरीं जात असें. तो आणि मी एकाच कचेरींत कारकून होतों. त्याचें नांव दिनेश-चंद्र बोस. एके दिवशीं आम्ही दोघेजण आमच्या वरिष्ठ कारकुनाकडे

गेलों. त्यावेळीं तो चिंताक्रांत बसला होता. आम्ही त्याला त्याच्या चिंतेचें कारण विचारल्यावर त्यानें आपल्या देशबांधवांची त्यावेळची हृदयद्रावक शोचनीय स्थिति सांगून ती सुधारण्याविषयीं आम्ही त्याला मदत करावी अशी त्यानें इच्छा दर्शविली. आपल्या देशबांधवांच्या स्थितीचें केलेल्या वर्णनाचा आमच्या मनावर असा कांहीं परिणाम झाला, कीं आम्ही त्याला मदत करण्याचें ताबडतोब वचन दिलें. पुढें आम्ही तिघांनीं मिळून त्रिमंडळ नांवाची संस्था स्थापन केली.

'आमच्या मंडळाचे नियम फारच कडक होते. मंडळ जें काम नेमून देईल त्यांत चुकी झाली तर त्या मनुष्याला देहान्त शिक्षा ठरविली होती. त्याप्रमाणें मंडळानें मला आणि दिनेशचंद्र बाबूला एक अत्यंत भयंकर काम करण्याची आज्ञा केली. तें काम कोणतें तें मी येथें लिहित नाहीं. फक्त इतकेंच लिहितों कीं, आम्ही दोघेजण तें काम करण्यास चुकलों तेव्हां नियमाप्रमाणें देहान्त शिक्षा भोगण्याचे आमच्या नशिबीं आलें, हाय हाय ! बाळे, त्या वेळच्या आमच्या स्थितीबद्दल मी काय सांगूं ! तूं लहान, तुला एकटीला सोडून कसें जावें ! तुझी कोण काळजी घेईल असे किती तरी विचार माझ्या मनांत आले. परंतु मजपेक्षां दिनेशचंद्र बाबूची स्थिति फारच वाईट झाली होती. बिचाऱ्याची त्याच संधीला पत्नि वारली. त्याचाहि मुलगा त्यावेळीं लहान बारा वर्षांचा होता. आम्ही दोघेहि मेलों तर आमचीं लहान लहान मुलें पोरकीं पडतील असें आम्हीं काकुळतीस येऊन देहान्त शिक्षा देणाराला सांगितलें. आमची शोचनीय स्थिति पाहून त्याला दया आली आणि त्यानें आम्हांला बारा वर्षांची मुदत दिली. त्यामुळें आम्हांला किती आनंद झाला म्हणून सांगूं ! मी दुसऱ्या दिवशीं दिनेशचंद्र बाबूच्या घरीं गेलों आणि त्याला सर्व पुढचे विचार कळविले आम्हीं दोघांनीं दुसऱ्याच दिवशीं कलकत्ता सोडला. आम्हीं समदुःखी असून एकाच कार्याकरितां एकाच वेळीं मरणार असल्यामुळें त्याच्या मुलानें माझ्या मुलीबरोबर लग्न करून आमचा स्नेह कायम ठेवावा असें ठरलें.

'तुझा मला विसर पडावा म्हणून मी तुला अनाथबालिकाश्रमांत ठेविलें. परंतु छे ! उलट तूं मजपासून दूर झाल्यामुळें तुझ्या चिंतेनें

माझी दिवसेंदिवस वाईट स्थिति होत गेली. तुजबरोबर जी पेटी आहे तींत तुझ्या आईचे मौल्यवान् कपडे आहेत. शिवाय वीस हजार रुपये रोकड आहेत. पेटीबरोबर जें सील केलेलें पत्र होतें त्यांत ही वरील सर्व हकीकत असून १ मे १९०८ नंतर पांच दिवसांत जो तुला नेण्याकरितां येईल त्याच्याबरोबर तूं लग्न करावेंस अशी मी माझी शेवटची इच्छा लिहून ठेविली होती. कारण त्या पांच दिवसांत तुला नेण्याकरितां येणारा मनुष्य दिनेशचंद्र बाबूचा मुलगाच असणार, अशी माझी खात्री होती. १ मे १९०८ ला आमची बारा वर्षांची मुदत भरली, परंतु कांहीं विवक्षित कारणामुळें त्या दिवशीं आमचें मरण चुकलें. म्हणून मी स्वतः तुला आश्रमांतून आणलें. पुढें थोडे दिवस गेले नाहींत तों दिनेश बाबूला वचनाकरितां पुण्यांत मरण आलें, असें कळतांच मी भीतीनें अगदीं गांगरून गेलों. त्या वेळची माझी स्थिति तूं प्रत्यक्ष पाहिली आहेसच. परंतु पुण्यास जातांना गाडींत तुझ्या तोंडून तुमच्या प्रेमाविषयीं मी ऐकलें तेव्हां मला नवा जीव आला. माझी भीति एकदम नाहींशी झाली. मी तुला त्यावेळीं इतकेंच म्हणालों, ‘ देवाची लीला अगाध आहे. ’

‘ मी जर मेलों तर तुझी काय स्थिति होईल अशी एकच चिंता मला रात्रंदिवस होती. आणि तेवढ्याच करितां मी मरण चुकवीत लपून छपून दिवस काढीत होतों. परंतु आमची इच्छा तुम्हांला कळण्यापूर्वीच तुमचें एकमेकांवर जुळलेलें प्रेम पाहून मी मरणाला ताबडतोब तयार झालों. त्याप्रमाणें तो माझा मरणाचा दिवस आजचा. हें पत्र तुला जेव्हां मिळेल त्याच वेळीं माझ्या मृत्यूची बातमी तुला कळेल. तूं आपल्या मनाला वाईट वाटूं देऊं नकोस. मी माझें वचन खरें करण्याकरितां मरत आहें. हेमचंद्र बाबूबरोबर तूं सुखानें रहा.

‘ आतां पत्र बंद करण्यापूर्वीं एकच गोष्ट लिहून हें भीतियुक्त पत्र पुरें करतों. आजपर्यंत मरणाच्या भीतीनें मी माझें आणि तुझें नांव बदललें होतें. माझें खरें नांव चंद्रकिरण राय आणि तुझें रोहिणी असें आहे. ह्याच नांवाचा दिनेशचंद्र बाबूनें आपल्या मृत्युपत्रांत उल्लेख केला आहे.

' तुमचे पुढले सर्व दिवस पूर्ण सौख्यांत आणि आनंदांत जातील हा माझा तुम्हांला अंतःकरणपूर्वक आशीर्वाद आहे.

तुझा दुर्दैवी पिता,
चंद्रकिरण राय,

कोर्ट वरील पत्र वाचून दाखवीत असतां सर्व कोर्टात पूर्ण शांतता वास करीत होती. पत्र वाचून सर्व गोष्टींचा स्फोट होतांच प्रेक्षक मंडळींतून ' हेमचंद्र-रोहिणी ' अशी एकच आरोळी ऐकूं आली. इतक्यांत कलकत्त्यास केलेला तारेचा जबाब आला. कोर्टानें तार फोडली. त्यांत ' तारेंत लिहिलेल्या मनुष्याचा शोध करण्याकरितां पोलिसपार्टी गेली असतां असें आढळून आलें कीं, त्या मनुष्यानें पिस्तुलाच्या साह्यानें आत्महत्या करून घेतली. ' असें लिहिलें होतें.

कोर्टाचें काम संपलें. हेमचंद्र बाबूंच्या खटल्यांत मॅजिस्ट्रेट साहेबांचें इतकें कांहीं मन वेधलें कीं, कोर्टाच्या बाहेर येतांच रोहिणीचा हात हेमचंद्राच्या हातांत देऊन ते म्हणाले, " चंद्रकिरण राय यानें लिहिल्याप्रमाणें तुम्हीं दोघेजण सुखी झालेले पाहून मला फार आनंद वाटतो. तुमच्या वडिलांनीं देशहितासाठीं जो मार्ग पत्करला तो अगदीं वेडेपणाचा होता. प्रत्येकाला आपल्या देशाचा अभिमान असला पाहिजे; परंतु देशहितासाठीं असल्या अविचाराच्या मार्गानें कधींही कोणीं जाऊं नये. देश सुधारणेचे जे कांहीं मार्ग आहेत ते अगदीं निराळे आहेत. ते तुम्हाला माहित असून तुम्हीं अशा आड मार्गानें जातां आणि उलट स्वतःचें अनहित करून घेतां. आज कोर्टापुढें आलेल्या हकीकतीवरून तुमच्या वडिलांनीं गुप्तमंडळाची स्थापना करण्याचें कारण गरीबगुरीब शेतकऱ्यांना सावकाराकडून त्याचप्रमाणें अधिकारी वर्गाकडून होत असलेला जाच हा होय. परंतु त्यांनीं तसें न करितां ह्या अशिक्षित वर्गांत शिक्षणाचा प्रसार केला असता तर ह्या बारा वर्षांत त्यांच्यांत कितीतरी सुधारणा होऊन तोच अशिक्षित वर्ग आज आपल्याच पायावर उभा राहिला असता. ह्या लोकांशीं मोठ्या प्रेमानें आणि सौजन्यानें वागून त्यांच्या महत्त्वाकांक्षा वाढविल्या तर त्यांच्या वांट्याचें काम ते स्वतः चोख रीतीनें बजावितील अशी माझी पूर्ण खात्री आहे. सुशिक्षित वर्गाच्या सद्धेतुबद्दल त्यांची खात्री पटविली पाहिजे व आपणास आपल्या समाजांत

व देशांत सारखे हक्क आहेत, अर्थात् इतरांबरोबर आपल्यावरही देशोद्धाराची जबाबदारी आहे, हें त्यांच्या मनावर बिंबविलें पाहिजे आणि हें सर्व त्यांच्या मनावर बिंबविण्यास शिक्षणप्रसारासारखें उत्तम साधन नाहीं. व्यक्तिच्या ऐहिक व पारलौकिक सुखाची वृद्धि ज्ञानप्राप्तीवर जितकी अवलंबून असते तितकी क्वचितच दुसऱ्या ह्या अशा साधनावर असेल!"

वाचक हो! संपलें.

* * * *

शीतलेच्या म्हणण्याप्रमाणें रोहिणी आपणच होऊन त्याच्या येथें चालून आली. वंग डिटेक्टिव्हाची काय स्थिति झाली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. रघुनाथाला हेमचंद्र बाबूनें त्याच्या मेहनतीबद्दल योग्य मोबदला दिला.

लवकरच हेमचंद्र-रोहिणी यांचा विवाह मोठ्या थाटानें झाला हें आमच्या सुज्ञ वाचकांस निराळें सांगण्याची कांहीं जरूरी आहे असें मला वाटत नाहीं.

अनु० २९२९८
क्रमा० १७६९

३६४८
ग्रा. ला.